नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'विदर्भ-साहित्य-संघा'चें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा



आजच्या अंकांत—

'Bee'
डॉ. के. ल. दप्तरी
डॉ. शं. दा. पेंडसे
प्रा. भा. म. गोरे
प्रा. अ. ना. देशपांडे
श्री. गो. रा. दोडके
प्रा. पु. शि. रेगे

# युगवाणी

वार्षिक वर्गणी
पांच रुपये
*
या अंकाची किंमत
एक रुपया

संपादक :
वामन नारायण देशपांडे

नोव्हेंबर डिसेंबर १९४६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी',
यवतमाळ [वऱ्हाड].

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

# यु ग वा णी

वर्गणी, जाहिराती यासंबंधी पत्रव्यवहाराचा पत्ता—
प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी एम्. ए.
सरचिटणीस,
वि. सा. संघ, अमरावती

वर्ष १ लें
अंक ११, १२ वा

नोव्हेंबर–डिसेंबर १९४६

वार्षिक वर्गणी रु. ५
किरकोळ अंकास .॥.

## अनुक्रमणिका



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# युगवाणी


वर्ष १ | संपादक | नोव्हेंबर–डिसेंबर
अंक ११–१२ | वामन नारायण देशपांडे | १९४६


## प्रतिमाभंग

ज्यांनी भारत–पुण्यभूमिवरती फोडोनि या डोंगर
लेणीं निर्मुनि दाविलें निज कलानैपुण्य लोकोत्तर
वज्रप्राय कठोर भेदुनि महायत्नें शिलाप्रस्तर
तो कैलास अगम्य आणुनि दिला आम्हांस पृथ्वीवर १

ज्यांनी मूर्ति अनेक निर्मुनि नव्या रंगावली रेखिल्या
ज्यांच्या पाहुनि त्या कलाकृति जगें सोत्कंठ वाखाणिल्या
हा नेत्रोत्सव पाहण्यास जमले ते तृप्त झाले जन
धीरोदात्त विमुक्त, ते परतले, तेथील संपादुन २

त्यांनी मूर्ति अनेक यत्न न करूनि होत्या श्रमें निर्मिल्या
गर्वोन्मादभरांत नीच यवनें येवोनि त्या भंगिल्या
हा विध्वंस समोर एक, दुसरे अद्यापिही चालतां
राष्ट्रात्मा खवळोनि जाय न कसा दुष्कृत्य हें साहतां ? ३

प्रज्ञावंत विचारशील असती आम्हांत जे संस्थित
साक्षेपें म्हणती समस्त विसरा ही दुष्टता सांप्रत
सारे यद्यपि शान्तिपाठ पढतों सप्रेम येथे सदा
आहों मानव हें कसें विसरतां आम्हांस येते वदा ! ४

* * *

ज्या सन्मूर्तिवरी मनोविहग हा फेरे असे घालित
ते अत्यंत सखोल वाच्य करितां येतें कसें ह्रद्गत !
कोणी निष्ठुर येउनी जरि तिला भंगोनि टाकीतसे !
या निर्माल्य जगांत राहुनि अशा त्याने जगावें कसें !

—Bee.


अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## एक

एक असें आहे
  एकटेंच नाही
गूढ हेंच आहे
  गूढताहि नाही !

कारण सांगाया
  न उरे कारण
होतसे दर्शन
  न होतां दर्शन !

विसर असा की
  विसर विसरे !
पुरें इतुकें की
  म्हणावें न पुरे !

भरला उजेड
  नच उजाडतां
प्रीती अशी जडे
  न जडे जडता !

—आत्माराम रावजी देशपांडे

## रस्त्याचें मनोगत

पथिका ! पहा उघडला ऊर् !
त्यावर मी झेलितों जगाचे पदाघात निष्ठूर् !
क्रूर खिळ्यांच्या खुपती टापा, आणिक सलती खूर !
रुततीं अवजड लोखण्डाचीं रथचक्रें मगरूर् !
होय होउं दे ! दाखवीन मी तुला तुझें घर दूर् !
पथिका ! पहा उघडला ऊर् !

—रा. अ. काळेले

## नेहमीच्या धांदलींत

नेहमीच्य धांदलींत
  नाहीं तुझी आठवण.
नेहमीच्या धांदलींत.
  जातों सारें विसरून.

पण कधीतरी असा
  जातों पुरा वेडावुन.
जातों सारें विसरून
  एक तुझ्याचवाचून . . .

डोळे निळेशार जेथे
  दैव अचूक भेटलें.
ओठ लहाने सोशीक
  जेथे गुज रेंगाळलें.

भुज शांत समंजस
  जेथे शिर विसावलें.
वक्ष फुंद हिमगौर
  जेथे मुख हुंदडलें . . .

नेहमीच्या धांदलींत
  नाही तुझी आठवण.
पण कधीतरी असें
  येई सारें भडकून !

—पुरुषोत्तम शिवराम रेगे.

## नको तें उणें तुला बोलणें

तुला हरपलें श्रेय गवसलें
मन्नयनीं तरि अश्रु टिबकले !
रहस्य त्यांतिल तुला न कळलें
  कशाला उणें तुला बोलणें ?

तुझिया वदनीं सुषमा खुलली
विवर्णता तरि मन्मनिं सलली !
जर ही जाणिव तुज अंतरली
  कशाला उणें तुला बोलणें ?

क्षणभर कसली सोबत अपुली ?
हृदीं चिरंतन व्यथा वसविली !
सुखें मनांतिल मनांत विरलीं
  कशाला उणें तुला बोलणें ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कशास तीं तर दुःखद वचनें ?
नकोच मजला तीं कटु स्मरणें !
परस्परा शुभ–वचन चिंतुनी
आचरुं ये पथ अपुला अपुला !
नको तें उणें तुला बोलणें !

विशाल जगतीं अनंत जीवन
क्षुद्र अणुकणचि त्यांतिल आपण !
क्षणां अधांतरिं जाऊं उधळुन
नको तें उणें तुला बोलणें !

मा. नी. गलगलीकर

# उघडें होतें दार !

१

किति दिवसांनी भेट जाहली
जगा विसरलीं मीलनकालीं !
दृढ आलिंगनिं परस्परांना कवळिति जिवलग प्यार !
धुंद लोचनें मिटतीं तीं तर,
अधरीं अधरहि जुळलें मृदुतर !
हृदयें का परि उभय यापरी धडधडतीं अनिवार ?

२

बहुत दिसांचे हृदिंचे बोल
हृदींच दडले होते खोल !
मुखिं उभयांच्या प्रगट व्हावया अधीर होति अपार !
एक बघतसे वाट दुज्याची
वदेल वचनें कोण जिवींचीं ?
आणिति कानीं प्राण त्याक्षणीं उत्कंठेने फार !

३

दंग मीलनीं दोघे ऐसे
भान भवतिचें राही कैसें ?
दुडदुड धावत जवळ येउनी कोण उभें लडिवाळ ?
विस्मय दाटे नील लोचनीं
पाहे दोघां स्तिमित होउनी !
क्षणीं दुज्या परि चिमुकल्या करीं विळखे त्यांना बाळ !

४

चटकन होती दोघे दूर,
आणिक येतीं क्षणीं भानावर !
अर्थपूर्ण मग दृष्टि टाकितीं होउनि लज्जित फार !
एकमेक तीं बघुनी हसती,
लोचनेंच निज बोलुं लागतीं––
कळुनी आलें उभयतांप्रती––उघडें होतें दार !

सौ. प्रभावती केसकर

# दोन चुटके

## १ गंमत

फुला नाही सामर्थ्य उडायातें
नसे सौरभही फुलपाखरातें
धरा वदते, "तिळभर न सौख्य मातें !"
स्वर्ग रडतो, "मज दुःख नच कसें तें !"

## २ सागर आणि क्षितीज

गर्जुनिया "मी विशाल ! मी विशाल" बोलसी
क्षितिज बघे हसत तया कांहि का न सांगसी ?

गो. रा. दोडके

# परीटाच्या टेंभीवर

१

चैत्रपालवी पालवे, करवंदी उमलली,
सकाळींच सागरांत प्रभा सोनेरी फाकली !
झडे चौघडा खालती माता दुर्गेच्या यात्रेला,
'परीटाच्या टेंभी' वर कळा पहीला लागला
—तिच्या–माझ्या गे प्रीतीला !

सनईचा गोड सूर तिच्या कानाशीं गूंजला–
"चला जत्रेला गे बाई, चला मातेच्या यात्रेला"
स्वच्छंदाने नाचावया बोलवीत सृष्टी सारी,
परि करांत गुंगुनी विलगली मम उरीं
—परीटाच्या टेंभीवरी !



मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाजे हृदयीं चौघडा, सनईचा घुमे सूर,
जत्रा फुलली प्रेमाची, जवानीला ये बहार–
–"प्रीतिसंगमीं आमुच्या झडो चौघडा-सनई,
येऊं दोघेही मिळून..." बोल उठला हृदयीं
––पडसादीं लीन होई!

* * *

परी जेव्हा श्रावणांत पावसाची झडे सर
गर्जे तुफान वादळ, काळजांत होई चर्र!–
एक दिनीं, वाजे सांजे माता दुर्गेचा चौघडा,
'परीटाच्या टेंभी'वरी मीच एकला उघडा–
––हाय! प्रीतीचा चुथडा!

'झाली सांज, चल बाई'–सनईचे येती बोल
'परीटाची टेंभी' परी भूतासारखी अबोल!
धुमसतो मसणींचा धूर गावाच्या बाहेर–
"आलों मीहि, सखे, बाई–"आरडतें आंत ऊर
––परीटाच्या टेंभीवर!

––ना. ग. जोशी

# झोपवी रे अंकावर

आतुरलें माझें मन
भेटीलागीं जीवलगा!
किती विटलें रे माझें
मन माहेरच्या जगा!

तुजविषयीं वेड्यांनी
नाही, नाही तें बोलून
माझ्या भाबड्या मनांत
भीति दिली जागवून!

बाळपणीं माहेरच्या
बळी मोहाला पडून
चिरशांति सुखस्थाना
गेलें तुला विसरून!

झालें, गेलें विसरून
कर माझा करीं धर
आणि गांजल्या जीवाला
झोपवी रे अंकावर!!

––ना. मा. सरपटवार.

# काट्यावरील फुलवेल

अवचित पडल्या वनांत गाठी,
करूं वाटलें कुसुमित जीवन.
आजवरीची हीच रहाटी
कंटकासवे रक्त सुमोत्तम! १

मी तर स्नेहाकुल स्वभावें
सुंदरतेचा तूं संरक्षक!
मिठ्या घातल्या परस्परांना
परस्परांतिल घ्याया वेचक! २.

आज कळुनि ये विकास निष्फळ!
तूं न जाणलें अंतर माझें!
कंटक भाव न तुजला सुटला!
मला तुझा सल! मी तुज ओझें! ३.

––बी. रघुनाथ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# ० डॉ. शंकर दामोदर पेंडसे

अच्युत नारायण देशपांडे, एम्. ए.

डॉ. पेंडसे यांची वाणी व लेखणी यांच्यावर सार्‍यांच झुकनत आहे. 'ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' हा ग्रंथ लिहून त्यांनी मराठी वाङ्मयांत कायमचें स्थान मिळविलें आहे. त्यांचा हा सरस परिचय त्यांचे सहकारी प्रा. देशपांडे यांनी लिहिला आहे.

त्या गौरकाय कुमाराच्या तेजस्वी व करारी मुद्रेवर प्रतिकारप्रवण त्वेषाची सौम्य व ईषत्‌स्पष्ट रेषा उमटलेली होती; त्याच्यासमोर बसलेले त्याच्या शाळेचे मुख्याध्यापक अत्यंत शांतपणें व धिमेपणाने त्याला सारी वस्तुस्थिति नीट समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होते, तरी पण त्याच्या मुखावरची ती रेषा अधिकाधिक उत्कट आणि तीव्र होत चालली होती. त्याची सारी काया कंपाकुल झाली होती; जणू कांही त्याच्या अपमानित कायेंतला कणन् कण प्रतिकारार्थ जागृत झाला होता!

"रिस्ले सर्क्युलरप्रमाणे राजकीय सभेला जाण्याची विद्यार्थ्यांना बंदी आहे, हें तुला माहित होतें ना? मग टिळकांना झालेल्या शिक्षेचा निषेध करण्याकरता भरलेल्या जाहीर सभेस तूं का बरें हजर राहिलास? आणि त्या सभेंत भाषण का बरें केलेंस? इतर मार्गांनी नव्हता का टिळकांबद्दल आदर दाखवितां येत? तूं अत्यंत बुद्धिमान व हुशार मुलगा आहेस, म्हणून मला तुझ्याबद्दल फार सहानुभूति वाटते; पण नाइलाजाने मला तुला सांगावें लागतें की, तुला यापुढे याच काय, पण कोणत्याच सरकारी शाळेंत शिकतां येणार नाही!......तुला माझा फारच राग आलेला दिसतो! पाहा ना, तुझा चेहरा रागाने किती लाल झाला आहे तो!"

"सर, मला तुमचा कशाला राग येईल! मला राग आला आहे, तो आमचा अपमान करणाऱ्या व आमचें स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या रिस्ले सर्क्युलरचा. मला स्वाभिमान आहे; मला माझ्या राष्ट्राचा अभिमान आहे; मला माझ्या राष्ट्राच्या गुरुस्थानीं असलेल्या लोकमान्य टिळकांचा अभिमान आहे. नको मला तुमची ही शाळा व या शाळेंतलें गुलामगिरीचें शिक्षण! हा मी चाललों..."

अतिरिक्त अवेशाने खोलीच्या बाहेर पडलेल्या त्या अभिमानमूर्ति कुमाराकडे ते मुख्याध्यापक कांहीशा कौतुकाच्या, कांहीशा आदराच्या व कांहीशा विस्मयाच्या भावनेने पहातच राहिले—

—वाशिमच्या सरकारी हायस्कूलांत घडलेल्या या कांहीशा रोमांचकारी, अद्भुत व भावनोत्कट घटनेनंतर त्या कुमाराच्या अंतःकरणांतील राष्ट्राभिमानाचा स्थायीभाव जरी अविचलित राहिला, तरी कालांतराने उपरिनिर्दिष्ट प्रसंगाच्या निमित्ताने आलेली देशप्रीतीच्या भावनेची ऊर्मी हळूहळू ओसरूं लागली. राष्ट्रप्रेमाच्या संजावनीने केलेल्या किमयेमुळे क्षणकाल स्वातंत्र्याच्या उन्मादक गंधाने मत्त झालेल्या दिव्य आणि भव्य सृष्टींत स्वैरविहार करूं लागलेल्या त्या केवळ द्वादश वर्षांच्या महत्वाकांक्षी कुमाराला प्रखर वस्तुस्थितीचे पाश आस्ते आस्ते आवळूं लागले; विस्मृत वास्तवाच्या व्यवहारी जगांत त्याला पुनः उतरावें लागलें.

......"भावनेच्या भरांत माझ्या हातून ही गोष्ट घडून गेली खरी; पण त्यामुळे माझ्य

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिक्षणाला पायबंद बसला, हें कांहीं बरं झालं नाही. कांहीं झालें, तरी विद्या हस्तगत केलीच पाहिजे; कारण सुविद्य झाल्याशिवाय आपल्याला समाजांत प्रतिष्ठा तरी कशी मिळणार व आपल्या मातृभूमीची सेवा तरी कशी करणार?

इंग्रजी विद्येला मुकल्यामुळे, ज्यांत आपल्या संस्कृतीचा अमोल वैचारिक ठेवा साठविलेला आहे, अशा संस्कृत विद्येचें शिक्षण घेण्याचा त्याने निश्चय केला. भगीरथाच्या निश्चयाचें भक्कम बळ जवळ असल्यामुळे त्याने एकलव्याच्या ईर्ष्येने व उत्साहाने विद्यार्जनाचा केलेला संकल्प, अखेरीस उच्चतम पदवीची शीग भरेपर्यंत, सिद्धीस नेला! प्रथम कै० सखाजीशास्त्री शुक्ल यांच्याजवळ काव्याचा अभ्यास करुन नंतर त्याने जळगांव येथे शिवरामशास्त्री शिंत्रे यांच्याजवळ तीन वर्षें सिद्धान्त कौमुदीचें आणि अंमळनेर येथील 'तत्त्वज्ञानमंदिरांत' हसूरकर शास्त्री यांच्याजवळ पुढील तीन वर्षें वेदान्ताचें अध्ययन केलें. पुढे, कलकत्त्यास जाऊन कै. लक्ष्मणशास्त्री द्रविड यांचें शिष्यत्व पत्करलें आणि 'वेदान्ततीर्थ' ही परीक्षा दिली. त्या परीक्षेंत मानाचें प्रथम स्थान मिळविलें! त्या नंतर लगेच एकाच वर्षाने, म्हणजे १९२१ सालीं, त्याने पंजाब विद्यापीठाची 'शास्त्री' हीहि पदवी, परीक्षा देऊन, प्राप्त करुन घेतली.

अशा रीतीने त्या तरुणाने संस्कृत विद्येच्या तींत पारंगता प्राप्त होईपर्यंत, चौफेर व्यासंग केला. सहाजिकच अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणाने केलेल्या संस्कृत विद्येच्या सूक्ष्म सखोल अध्ययनाचा असा परिणाम झाला कीं, हिंदु संस्कृति ज्या तत्त्वज्ञानावर, ज्या आचारविचारप्रणालीवर अधिष्ठित झाली आहे, त्या तत्त्वज्ञानाच्या साक्षात् दर्शनाचा त्याला लाभ झाला. त्या तत्त्वज्ञानाशीं तो समरस झाला. राष्ट्राभिमानाच्या जोडीला, त्याच्या अभिमानभावनेला स्वसंस्कृतीच्या अभिमानाचा नवा प्रभावी पैलू पडला. पुढे महाराष्ट्र संस्कृतीच्या सोपपत्तिक पण स्फूर्तिशाली निर्वचनाचें कार्य करण्याच्या वेळीं त्याला या पैलूच्याच प्रकाशाचें विशेष साहाय्य झालें असावें.

इतकेंच करुन, केवळ संस्कृत विद्याच हस्तगत करुन, तो थांबला नाही. कृष्णशास्त्री चिपळूणकरांप्रमाणें तो समयज्ञ होता. त्याने कालमान ओळखलें. इंग्रजी विद्येच्या संपादनाची आत्यंतिक आवश्यकता जाणली. म्हणूनच पुढे त्याने एम्. ए. व पीएच्. डी. याहि सर्वोच्च पदव्या मिळविल्या आणि सुविद्यतेचा उच्चांक गाठला! अशा रीतीने विद्यासंपादनाच्या कार्यांत

"म्हणती 'असाध्य न कांहीं
कृतनिनिश्चय जो तया' असें आर्य"

ही मोरोपंताची उक्ति डॉ. शं. दा. पेंडसे यांनी सार्थ करुन दाखविली!

* * *

डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांच्या जीवनचरित्रांतील विद्योपासनेचा उपरिनिर्दिष्ट वृत्तान्त हा जसा खऱ्या विद्याप्रेमी कुमारांना व तरुणांना स्फूर्तिदायक व्हावा इतक्या योग्यतेचा आहे, तसाच तो त्यांच्या मनोवृत्ति-विशेषांवर आणि कार्य विशेषावर स्पष्ट प्रकाश टाकण्याइतका आहे. हिंदुधर्म, हिंदुसंस्कृति, हिंदु तत्त्वज्ञान, हिंदु राष्ट्र यांच्याविषयीं डॉक्टरसाहेबांच्या मनांत वसत असलेल्या आदराच्या असीमतेची आणि अभिमानाच्या जाज्वल्यतेची आपण त्यावरुन सहज कल्पना करूं शकतों. त्यांतल्या त्यांत अखिल भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य, पण वैशिष्ट्यपूर्ण विभाग असलेली महाराष्ट्रसंस्कृति व तिच्या निर्मितीला, जोपासनेला व प्रभावी प्रचाराला सहाय्यभूत झालेली मराठी भाषा यांचे तर ते एकनिष्ठ भक्त आहेत! उद्या जर अखिल भारतीय संस्कृतीच्या जयजयकाराचा महोत्सव करण्याचें ठरलें, तर भारतमातेच्या



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पूजेकरिता महाराष्ट्र संस्कृतीतर्फे पाठवावयाच्या निवडक प्रतिनिधींत डॉक्टरसाहेबांचें स्थान निःसंशय श्रेष्ठ व मानाचें राहील!

ध्येयविशेषानें प्रस्फुरित झालेल्या डॉक्टरसाहेबांच्या मनोमीमांसकाचाच आविष्कार आपणास त्यांच्या बहुतांश वाङ्मयनिर्मितींत पहावयास सापडतो. ज्या दोन ग्रंथांमुळे मराठी वाङ्मयांत त्यांना चिरंजीव कीर्ति मिळविली आहे, ते 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' व 'ज्ञानेश्वराचें तत्त्वज्ञान' हे दोन ग्रंथ या गोष्टीची स्पष्ट साक्ष होत. यांपैकी पहिल्या ग्रंथाची थोरवी केवळ अनन्य आहे. महाराष्ट्राजवळ मौलिक प्रतिभा आहे, महाराष्ट्राजवळ स्वतंत्र अभिजात संस्कृति आहे, याची जाणीव करून देण्याचें अपूर्व सामर्थ्य या ग्रंथांत आहे. आज महाराष्ट्र अवमानित आहे, आणि, दुर्दैवाची व नामुष्कीची गोष्ट ही की, महाराष्ट्रांतल्या तरुणांना या अवमानित अवस्थेची जाणीवहि नाही, त्यांना या अवमानितत्वाची चीड येत नाही. ती जाणीव उत्पन्न करण्याकरिता, ती चीड चेतविण्याकरिता आणि महाराष्ट्र संस्कृतीच्या दुर्दम अभिमानानें नवें चैतन्य निर्माण करण्याकरिता प्रत्येक मराठी तरुणाच्या सांस्कृतिक शिक्षणाचा, या ग्रंथाचें निष्ठापूर्वक अध्ययन, हा एक अवश्यमेव भाग बनविला पाहिजे. "महाराष्ट्राच्या अंतःकरणांतून भावी सांस्कृतिक अभ्युदयासंबंधी वाटणाऱ्या निराशाजनक विचारांची अभ्रें" नाहींशीं करण्याची ताकद या या ग्रंथांत आहे, असें लो. ना. अणे म्हणतात, तें उगीच नव्हे!

स्फूर्तिदायकत्वामुळे आपणास 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' आकर्षित करतो, तर साक्षेपी संशोधनामुळे व सखोल विद्वत्तेमुळे 'ज्ञानेश्वराच्या तत्त्वज्ञाना' पुढे आपलें मस्तक नत होतें! पहिला ग्रंथ आपणास कार्यप्रवण करतो, तर दुसरा आपणास चिंतनशील बनवितो. बुद्धीला स्थैर्य आल्यानंतर दुसरा ग्रंथ लिहिलेला असल्यामुळे त्यांत आपणास सर्वत्र समतोल, अनाग्रही व पूर्वग्रहविवर्जित मनोवृत्तीचें, तसेंच, दीर्घ व्यासंगाचें व सूक्ष्म चिकित्सक दृष्टीचें दर्शन घडतें. "आता या विषयावर लिहिण्याचें कांहीं राहिलें नाही" असें संतवाङ्मयाच्या अध्ययनांत पांगारकरांनी या ग्रंथाबद्दल म्हणावें व "हा ग्रंथ ३०–४० वर्षें तरी या विषयावर प्रमाणभूत मानला जाईल, याविषयीं शंका नाहीं" असा या ग्रंथावर प्रो० रा. द. रानडे सारख्या पट्टीच्या विद्वानानें अभिप्राय द्यावा–यापेक्षा या ग्रंथाचें अलौकिकत्व आणखी तें काय सिद्ध करावयाचें? मी मात्र डॉक्टर साहेबांच्या अंतःकरणांतील महाराष्ट्र–संस्कृतीच्या पूर्ण विकसित झालेल्या अभिमानाला आलेलें परिपक्व फळ या दृष्टीने या ग्रंथाकडे पाहतों. ज्ञानदेव हे आमच्या महाराष्ट्राचे आद्य कवि, आद्य ऋषि, आद्य गुरु, आद्य नेते, आणि, त्यांच्या तत्त्वज्ञानाची सुस्पष्ट ओळख महाराष्ट्राला करून देण्याचें अविश्रांत परिश्रमाचें आणि अविचल निष्ठेचें कार्य महाराष्ट्र संस्कृतीच्या अनन्य भक्तानें पार पाडावें, हें केवळ औचित्यपूर्णच नाही का झालें?

केवळ लिहिण्याकरिता लिहावयाचें म्हणून डॉक्टरसाहेबांनी कधींच कांहीं लिहिलें नाही. कलेकरिता कला किंवा वाङ्मयाकरिता वाङ्मय या मंत्राच्या मोहनीजालांतून ते नेहमी मुक्तच राहिले. संस्कृतिसंरक्षणाच्या आणि संस्कृतिसंवर्धनाच्या दृष्टीनें जें इष्ट असेल, जें पोषक असेल, तेंच आणि तेवढेंच बहुतांशीं त्यांनी लिहिलें. त्यांच्या उपरिनिर्दिष्ट दोन ग्रंथांवरून तर ही गोष्ट दिसून येतेच; पण त्याशिवाय त्यांनी जें स्फुट लेखांच्या स्वरूपाचें बरेचसें लिखाण केलें आहे, त्यावरून सुद्धा हीच गोष्ट सिद्ध होते. या दृष्टीने त्यांचे 'समर्थ रामदास व त्यांचे आक्षेपक' या विषयावरील तीन लेख

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(हे पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले आहेत) अत्यंत महत्त्वाचे आहेत. समर्थ रामदास हे त्या काळांतले जणु टिळकच. दोघांनीहि आपापल्या काळीं महाराष्ट्राला खडबडून जागें करून त्याला कार्यप्रवण केलें. असें असून मुद्दा त्यांच्याबद्दल आक्षेप घेणाऱ्या कांही 'फाटक्या' व्यक्ति निघतातच! असल्या आक्षेपांचें डॉक्टरांनी आपल्या लेखांतून साधार व सडेतोड खंडन करून समर्थचरित्राचें रहस्य व महात्म्य पटवून दिलें, त्यांत त्यांनी एक प्रकारें समाजऋणच फेडलें, असें म्हटलें पाहिजे.

त्यांच्या प्रत्येक लेखाचें अशा रीतीने वैशिष्ट्य स्पष्ट करणें येथे शक्य नाही. त्यांचे एकंदर स्फुट लेख सत्तराच्या जवळपास आहेत. त्यांतल्या कांही निवडक लेखांचीं—'समर्थ रामदास व जोसेफ मॅझिनी', 'मराठी राजकारणाचा आत्मा', 'आपल्या जीवनांत संस्कृतीचें महत्त्व', 'ज्ञानेश्वराचें पुरोगामित्व', 'आमचें भाषाविषयक औदासिन्य', 'महाराष्ट्रांत श्रद्धा का नाही?', 'सायमन सप्तशतीचा अपशकून फळला', 'आश्रित वाङ्मयाचा प्रश्न', 'तीन शतकांचा लढा पुढेहि लढविलाच पाहिजे', 'शिवकालीन संस्कृति व धर्म'—हीं नुसतीं नांवें जरी पाहिलीं, तरी तेवढ्यावरून आपणास त्या लेखांच्या स्वरूपाची आणि त्या लेखांना प्रेरणा देणाऱ्या लढ्याच्या झुंजार मराठा मनांतील स्वदेश, स्वसंस्कृति व स्वभाषा यांच्या अभिमानाच्या अखंड तेवत असलेल्या ज्योतीच्या तेजस्वितेची कांहीशी कल्पना येऊं शकते. डॉक्टरसाहेबांनी काश्मीरचा प्रवास केला, पण त्यासंबंधी लेख लिहिले ते 'काश्मीरांतील हिंदु व त्यांची संस्कृति' या विषयावर!

डॉक्टरसाहेबांनी कांही ललित वाङ्मयकृतींचीं परीक्षणेंहि लिहिलीं आहेत (उ. मुक्तात्मा, मोत्याची माळ, सुशीलेचा देव वगैरेंचीं परीक्षणें); तसेंच कांही व्याकरणविषयक (उ० 'अनुस्वारांची कैफियत,' 'मराठी शुद्धलेखनाचा फेरविचार') आणि कांही शिक्षणविषयक लेखहि (उ० 'प्राथमिक शिक्षणांतील शिक्षेचें स्थान,' 'दुय्यम शिक्षणाची पिछेहाट') त्यांनी लिहिले आहेत; पण त्यांच्या एकंदर लेखनसंभाराच्या मानाने अशा लेखांचें प्रमाण बरेंच अल्प आहे.

सार्वजनिक संस्थांचे कार्यकर्ते ह्या नात्यानेहि डॉक्टरसाहेबांची कामगिरी उल्लेखनीय आहे. ते नागपूर विद्यापीठाच्या मराठी बोर्डाचे अध्यक्ष असून सर्वांत जुने सभासद आहेत. महाराष्ट्र-साहित्यपरिषदेच्या नागपूर येथील शाखेचे ते अध्यक्ष आहेत. मध्यप्रांत-संशोधन-मंडळाच्या कार्यकारी मंडळावरहि त्यांनी काम केलें आहे. नागपुरास भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते.

* * *

डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या गुणविशेषांचा आणि कार्यकर्तृत्वाचा हा स्थूल परिचय झाला, पण त्यांत एक मोठी उणीव राहिली; त्यांच्या जीवनाच्या एका भूषणाची थोरवी मांडावयाचीच राहिली. तें भूषण म्हणजे त्यांचें अभिजात वक्तृत्व. गीतेंत किंवा ज्ञानेश्वरींत अठराव्या अध्यायाचें जें स्थान, तेंच डॉक्टरांच्या गुणसंभारांत त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वाचें स्थान. 'सुदुर्लभाः सुमनोरमा गिरः' या कोटींतली त्यांची वाणी. प्रत्येक शब्दाचा नव्हे, अक्षराचा स्पष्ट, शुद्ध, रेखीव उच्चार, खणखणीत आवाज, सुसंबद्ध वाक्यांचा अस्खलित प्रवाह त्या प्रवाहांत प्रतीत होणारी लोभनीय लयबद्धता आणि या सर्वांना व्यापून असणारी राष्ट्राच्या संस्कृतीच्या उर्जितावस्थेविषयींची आत्यंतिक आंतरिक तळमळ—इतक्या साऱ्या स्पृहणीय घटकांचें सुमधुर सम्मीलन म्हणजे डॉक्टरसाहेबांचें वक्तृत्व!

अर्थात् जी गोष्ट त्यांच्या लेखनाच्या बाबतींत खरी आहे; तीच त्यांच्या वक्तृत्वाच्याहि

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाबतींत अगदी खरी आहे. आपलें कौशल्य मिरवावयाचें आणि लोकांचीं मनें रमवावयाचीं, एवढ्या संकुचित वृत्तीने त्यांनी वक्तृत्वकलेची कधीच जोपासना केली नाही. या कलेचें कसब कमावतांना त्यांनी ध्येयाच्या श्रवणाऱ्यावरची दृष्टि लवमात्रहि ढळूं दिली नाही. आपल्या देशाच्या, विशेषतः, महाराष्ट्राच्या सांप्रतच्या अवनतीची सोपपत्तिक मीमांसा करून लोकांच्या, त्यांतल्या त्यांत तरुणांच्या, मनांत आपला धर्म, आपली संस्कृति, आपली भाषा यांच्याविषयीं आदरयुक्त प्रेमाची आक्रमक भावना निर्माण करण्याकरिता व तशीच ती सतत प्रदीप्त ठेवण्याकरिताच डॉक्टरांनी आपल्या वक्तृतकलेची सारी करामत कारणी लावली आहे व अजून तशी ते लावीत आहेत. पुण्यास टिळक पुण्यतिथीनिमित्त, आगस्ट १९४३ रोजीं केलेलें भाषण, तेथेच बाजीराव द्विशतसांवत्सरिक दिनानिमित्त केलेलें भाषण, सातारा हायस्कूलच्या संमेलनांत केलेलें भाषण, हिंदुस्थानांतील धार्मिक इतिहासाचें सामान्य निरीक्षण या विषयावर गेल्या वर्षी नागपूर विद्यापीठांत परांजपे व्याख्यानमालेतर्फे दिलेलीं तीन भाषणें (हीं तीन भाषणें पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणार आहेत), तशींच, शाळाकॉलेजांच्या स्नेहसंमेलनांतून केलेलीं भाषणें—हीं ज्यांनी ऐकलीं असतील, ते डॉक्टरांच्या वक्तृत्वाबद्दल मीं केलेल्या विधानांचा पाठपुरावा करतील, अशी खात्री वाटते. ज्या वाशीमच्या हायस्कुलांतून १९०८ सालीं त्यांना काढून टाकण्यांत आलें होतें, त्याच हायस्कूलच्या गेल्या वर्षीच्या संमेलनप्रसंगीं अध्यक्षीय भाषण करण्याचा त्यांना सुयोग प्राप्त झाला होता! पूर्वस्मृतींच्या जागृतीने प्रक्षुब्ध झालेल्या आणि भावनेच्या सूक्ष्म व सुखद लहरींनी आंदोलित झालेल्या मनाच्या अवस्थेंत दिलेल्या त्यांच्या या भाषणांत भावविवशतेमुळे केवळ अलौकिकच माधुरी निर्माण झाली असली पाहिजे!

संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या शैक्षणिक प्रश्नावर अलीकडे डॉक्टरसाहेबांनी आपलें लक्ष विशेषत्वाने केंद्रित केलें आहे. व्यक्तिविकासाच्या आणि राष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीने कवडीमोल असलेल्या प्रचलित शिक्षणपद्धतीवर ते आपल्या भाषणांतून जळजळीत टीका करीत असतात. त्या दृष्टीने मुद्दाम त्यांनी सार्जंट कमिटीच्या रिपोर्टाचा अत्यंत आस्थेवाईकपणें अभ्यास केला आहे. वाङ्मयप्रधान शिक्षणापेक्षा विज्ञानप्रधान शिक्षणाच्या संपादनावरच आजच्या तरुणांनी आपली शक्ति खर्च करावी—हाहि त्यांच्या अलीकडील भाषणांतील प्रतिपादनाचा एक मुख्य विषय होऊन बसला आहे. प्रचलित शिक्षणपद्धतीचें सर्वांगीण परीक्षण करून त्यावर एक ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा विचार आहे, असें ऐकतों; आणि, खरोखरच संकेतानुरूप हा ग्रंथ प्रसिद्ध झाला, तर तो अपूर्व अनुभवसमृद्धि, राष्ट्रहिताचा जिवंत जिव्हाळा, हेतुपूर्वक केलेला खास व्यासंग आणि वक्तृत्वपूर्ण प्रभावी निवेदनशैली—या गुणसमुच्चयामुळे समाजसुधारणेची धुरा वाहणाऱ्या साऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना व अधिकाऱ्यांना मार्गदर्शक झाल्यावाचून निश्चित राहणार नाही!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# मिश्रजींचे 'कृष्णायन'

लेखक—प्रा. विनयमोहन शर्मा, एम्. ए., एल्‌एल्. बी.
अनुवादक—शंकर बाळाजी शास्त्री, बी. ए.

मध्यप्रांताचे कॉंग्रेस-मंत्रि ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र हे जसे राजकारणपटु मुत्सद्दी आहेत, तसेच उत्कृष्ट साहित्यिकहि आहेत. बेचाळीसनंतरच्या तुरुंगवासांत त्यांनी 'कृष्णायन' नामक महाकाव्य लिहिलें असून तें नुकतेंच प्रसिद्ध झालें.

या महाकाव्याचा परिचय करून देणारा प्रस्तुत लेख मूळ हिंदींत प्रा. 'विनयमोहन शर्मा' यांनी लिहिला असून त्याचा मराठी अनुवाद रा. शं. बा. शास्त्री यांनी केला आहे. प्रा. 'शर्मा' म्हणजे नागपूरच्या मॉरिस कॉलेजचे प्रा. तिवारी हे होत. ते 'विनयमोहन शर्मा' या टोपणनांवानें लेखन करीत असतात. ते स्वतः हिंदीचे प्रसिद्ध लेखक आहेत.

या लेखांतील आरंभींची 'महाकाव्या'बद्दलची चर्चा उल्लेखनीय आहे. 'अलीकडे महाकाव्यें कां होत नाहीत?' या विषयावरील वादाबाबत ही चर्चा उपयुक्त ठरेल.

" आनंदाद्धयेवं खल्विमानि भूतानि जायन्ते,
आनंदेन जातानि जीवन्ति, आनन्दं संप्रयन्त्येभिसंविशन्ति । "

उपनिषद्कार म्हणतात, "आनंदापासूनच सर्व उत्पन्न झालें आहे, जिवंत राहतें आणि आनन्दोन्मुख होतें."

मानवी व्यापाराला 'जीवन-लीला' असें म्हणतात, त्याचें कारण बहुधा आनन्दतत्त्वाची ही महत्ताच असावी; कारण 'लीला' शब्दांत उत्समय गतीचा भाव निहित आहे. जर मनुष्याच्या जीवनांत 'लीले'चेंच संदोलन आहे, तर मग दुःखाची अवस्थिति म्हणजे निव्वळ कल्पनाच आहे काय, असा प्रश्न कोणी उपस्थित केल्यास, त्याचें उत्तर 'नाही' असेंच द्यावें लागेल, दुःखाच्या सीकरांनीच आनंदाच्या रसाला अभिषिक्त केलेलें आहे. तसें नसतें, तर दुःखाच्या अभावीं आनंदाचें सुख काल्पनिकच बनलें असतें. आनंदाची निश्चयात्मकताच दुःखाचा ताप सह्य बनविते आणि त्यांत सुखाचा कांहीसा संचारहि करते. म्हणून, आनंद हीच अन्तिम अवस्था आहे.

साहित्याचा उद्भव जीवनापासून होत असल्याकारणाने त्याचें सर्वश्रेष्ठ लक्ष्य स्वाभाविकपणें 'आनन्द' हेंच मानलें गेलें आहे. या आनन्दाच्या पूर्ण अनुभूतीलाच काव्य-शास्त्रांत 'रस' ही संज्ञा आहे.

प्रश्न उत्पन्न होतो, तो असा की, या रसानुभूतीला व्यक्तीपर्यंतच मर्यादित ठेवणें हें काव्याला अभीष्ट आहे की, समष्टीचाहि त्या अनुभूतीवर अधिकार आहे? दुसऱ्या शब्दांत हेंच म्हणावयाचें तर साहित्य हें व्यक्तिगत आहे, की समाजगत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा दोहोंचेंहि समाधान करणारें तें आहे? व्यक्तिगत साहित्याला आपल्याकडे 'स्वान्तःसुखाय' असें म्हटलें जातें आणि पाश्चिमात्य देशांत 'कलेसाठी कला' असें त्याचें वर्णन केलें जातें. परंतु दोहोंचे भाव भिन्न आहेत. आपल्याकडे काव्य 'स्वान्तःसुखाय' ठरतें तें त्यानें लोकहितसाधन केल्यानंतर, आणि पाश्चिमात्य समाजांत 'कलेसाठी कला' या तत्त्वाला धरून निर्माण होणाऱ्या साहित्याला लोकहिताची आवश्यकता नसते. व्यक्तिगत राहूनच कोणतेंहि साहित्य शाश्वत होऊं शकत नाही; त्याला 'जीवित' राहण्यासाठी अनेकांपर्यंत जाऊन त्यांचें रूप आणि व्यापार त्याला स्वतःमध्ये प्रतिबिंबित करावेच लागतील. केवळ इतकेंच नव्हे तर या अनेकांना गतिशील बनविण्याची क्षमताहि त्यांत असणें आवश्यक आहे. अलंकारशास्त्रज्ञांनी रस हा 'अहेतुक' म्हटला असेल परंतु त्याच्या अनुभूतींतून उत्पन्न होणारा प्रभाव हा अहेतुक कसा असूं शकेल! यासाठी 'कलेसाठी कला' या नांवानें ओळखलें जाणारें आत्मगत साहित्य केवळ शब्दजाल आहे. वास्तविकपणें तें आत्मगत नसून सर्वगतच असतें.

ज्या वेळीं कवीच्या हृदयांत एखाद्या सत्याचा उदय होतो, त्या वेळीं तो अदम्य आत्माभिव्यञ्जनेच्या भावानें अस्वस्थ होऊन जातो. यामुळे ही अस्वस्थता घालवून प्रकृतिस्थ होण्यासाठी तो गाऊं लागतो किंवा बोलूं लागतो. त्याचा पहिल्या प्रकारचा प्रयत्न गीताचें (Lyric) रूप धारण करतें आणि दुसरा प्रबन्ध-काव्याचें. त्याच्या सत्याच्या अनुभूतींत विविधता आणि सखोलता असल्यास त्याची मानसिक अभिव्यक्ति बहुशः प्रबन्धकाव्याच्या रूपानेच प्रगट होते. प्रबन्ध-काव्यांत किंवा महाकाव्यांत जीवन आपली पूर्णता धारण करून प्रगट होते; कधी वर चढत, खाली पडत, आणि कधी स्वतःला सावरून धरीत तें आपल्या अभीप्सित ध्येयाच्या रोखानें अग्रेसर होत असतें.

भारतवर्षांत जीवनाचें खंडशः रूप पाहण्याची इच्छा फारशी प्रबल कधी नव्हतीच; त्याचें एकत्र पूर्णत्व हेंच त्याला पाहावेंसें वाटतें. प्राचीन युगांत महाकाव्यांची रचना अधिक प्रमाणांत झाली, याचें हेंच कारण आहे. ज्या वेळीं क्रौंचवधाच्या निमित्तानें आदिकवीला एक महान सत्याची उपलब्धि झाली, तेव्हा निव्वळ एखाद्या गीतांत तीं प्रगट करून त्यांचें समधान झालें नाही, त्या अभिव्यक्तीसाठी एखादें महान् साधन धुंडाळण्यांत ते व्यग्र झाले आणि रामाच्या विशाल लोकहितसाधक चरित्राच्या द्वारें त्यांनी स्वतःला अभिव्यक्त केलें. व्यासानें महाभारतांत कृष्णाच्या आख्यानाच्या द्वारें हेंच केलें. या दोन काव्यांच्या आधारावर त्यानंतरच्या काव्यांत कितीतरी कवींनी अनेक प्रबन्ध-काव्यांची रचना केली आणि ते सर्वच आपापल्या देशकालपरिस्थितीच्या संस्कृतीच्या आणि आवश्यकतांच्या परिवेष्टनांनी आवृत्त असल्या कारणानें नित्य नवेच ठरत असून अजस्ररसाची वर्षा करीत आहेत, ह्यावरूनच या दोन महाकाव्यांनी भारतवासीयांचें जीवन कसें अनुप्राणित आणि उद्वेलित करून सोडलें आहे, तें सिद्ध होईल. महाकाव्यांचें हें जें वैशिष्ट्य आहे, त्याचें कारण, डॉ. जॉन्सनच्या मताप्रमाणें हीं काव्यें मानवी प्रतिभेची महान् अभिव्यक्ति (The Greatest manifestation of human genius) आहेत, हें आहे. महाकाव्यें सदान् कदा होत नसतात, हें खरें आहे; पण जेव्हा जेव्हा तीं अवतीर्ण होतात, तेव्हा तेव्हा तीं निर्जीव समाजांत जीवन भरून सोडतात, तें आलोकित करतात, सघन अंधःकारांत असंख्य विजा चमकल्याप्रमाणें दृष्टि दिपवून टाकतात आणि त्या समाजाचा मार्ग सुस्पष्ट, प्रशस्त करतात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हेंहि खरेंच आहे. युग महाकाव्याचें प्रवर्तन करतें, हें तर खरेंच, परंतु महाकाव्य युग निर्माण करतें हेंहि विसरून चालणार नाही. भाषा काय, विचार काय, दर्शन काय,—प्रत्येक बाबतींत त्याचें स्वत्व असतें. आरिस्टॉटलने महाकाव्यांत भाषा-सौंदर्याला अधिक महत्त्व दिलें आहे; त्याने त्यांत अद्भुत रसाचा अवतारहि उचित मानला आहे. घटनांच्या सुसंबद्ध शृंखलेवरहि त्याचा विशेष भर नाही. परंतु 'साहित्यदर्पण'कार विश्वनाथाने महाकाव्याला शास्त्राच्या नियम–शृंखलांनी असें कांहीं जखडून टाकलें आहे की, हिन्दी काय, किंवा अहिन्दी काय, कोणत्याहि भाषेंतील महाकाव्य त्या कसोटीवर खरें उतरूंच शकत नाही. बाबू द्विजेन्द्रलाल रायनी, महाकाव्य एकापेक्षा अधिक चरितांवर रचलें जातें, असें जें विधान केलें आहे, तें बहुधा ॲरिस्टॉटल-पासून मिळालेल्या प्रेरणेवरूनच असावें. "परंतु चरित्र–चित्रण हें महाकाव्यांत प्रसंगमात्ररूपांतच असतें. त्या प्रसंग-क्रमांतून कवित्वाचें प्रगटीकरण करणें हाच कवीचा मुख्य हेतु असतो. निसर्गाचें घटनांचें, मानवीप्रवृत्तींचें वगैरे वर्णन हेंच महाकाव्यांत कवीचें प्रमुख लक्ष्य असतें. चरित्र हें त्याचें साधन, उपलक्ष्य असतें. महाकाव्यांत घटनांची एकाग्रता किंवा सार्थकता यांचें कांहीं प्रयोजन नाही."—द्विजेन्द्रलाल रायची ही व्याख्या जितकी सत्य, तितकीच ती कवीला अधिक स्वातंत्र्य देणारीहि आहे.

काव्य ही रस वस्तु आहे, असें मानणाऱ्यांच्या कल्पनेप्रमाणे मुक्तक किंवा गीतिकाव्यच रसानुकुल असूं शकतात, त्यांतच रस ओथंबून वाहूं शकतो. प्रबन्ध काव्याचा विषय तर इतिवृत्त हा असतो; त्यांतील रस कथौघांत असूं शकतो, भावनेंत नाही.

प्रबंधकाव्य कथेच्या अनुरोधाने चालतें, हें खरें आहे. म्हणूनच त्यांच्या पंक्तीपंक्तीमधून रस शोधूं पाहणें योग्य नाही. अशा काव्यांत रसोत्पत्ति होते, ती कवीने कल्पिलेल्या स्थल–प्रसंगांतूनच, एखाद्या भावनेमधून किंवा प्रेरणेंतून महाकाव्याची सृष्टि होणें शक्य आहे, पण प्रारंभापासून शेवटपर्यंत तें भावनामयच राहील, हें शक्य नाही. आणि, निव्वळ भावनाच कोणत्याहि साहित्य-कृतीला ग्राह्य ठरवूं शकत नाही. त्यांत जोंपर्यंत बुद्धि–तत्त्वाचा समावेश होत नाही, तोंपर्यंत त्याची खरी अभिव्यक्ति होऊं शकत नाही. प्रबंधकाव्यांत रस कथेंतून निर्माण होतो, असें मानलें, तरी हरकत नाही. गद्यांत लिहिलेली एखादी लघुकथा वाचून काय आमच्या डोळ्यांत कधीं अश्रु उभे राहत नाहीत? असें होणें हें आमच्या हृदयांत करुणरसाच्या अवतारणेचें द्योतक नाही? रसनिष्पत्तीसाठी काव्यांत एखाद्या शास्त्रीय भूमिकेची आवश्यकता आहेच, असें नाही. रसाची स्थिति श्रोता अगर पाठकाचें मन आहे, हें जर खरें, तर काव्याचें प्रबंधात्मक किंवा गीतात्मक रूप हा गौण मुद्दा ठरतो, काव्यांतील कोणती पंक्ति, कोणता शब्द श्रोत्याच्या मनांतील गुप्त संस्कारांना जागृत करून त्याला भावाक्रांत करून सोडतो, हें कोण जाणे? श्रोता किंवा वाचकाच्या संस्कारांच्या गहनतेवर आणि तीव्रतेवर रसनिष्पत्ति अवलंबून असते. परंतु साधारणपणें महाकाव्यांत किंवा प्रबंधकाव्यांत जीवन प्रभावित करणारे सुख–दुःखाचे प्रसंग जितके अधिक असतील, तितकेच ते रसनिष्पत्तीचे साधन बनतील आणि तें काव्य तितकेंच अधिक सरस ठरेल. याच कारणास्तव प्रबंध काव्याचा रचणारा कथावर्णनाची शृंखला जोडीत बसण्याऐवजी प्रभावकारी स्थळांवरच अधिक रमतो; कारण तो स्वतःला आपल्या वाचकापासून निराळा ठेवूं इच्छित नसतो. म्हणूनच तो कधी कधी यथार्थतेचा बळी देऊनहि लोकप्रचलित चमत्कृतींचा समावेश करतो. महाभारत, रामायण, इलियड, ओडेसी, डिव्हाइन कॉमेडी, पॅरॅडाइज लॉस्ट इ. काव्यांत चमत्कार–तत्त्वांचा जो समावेश केलेला आढळतो त्याचें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हेंहि एक कारण आहे. लोक-भावनेची पूर्णपणें उपेक्षा करून कवि स्वतःला लोकापर्यंत पोचवूं शकत नाही.

## प्रबंधकाव्य आणि महाकाव्य

सर्वच महाकाव्य प्रबंधकाव्य असतात, परंतु प्रत्येक प्रबंधकाव्य महाकाव्य असेलच, असें नाहीं. कोणतीहि शृंखलाबद्ध कथा काव्यरूप धारण करून 'प्रबंधकाव्य' म्हटली जाऊं शकते. परंतु 'महाकाव्य' होण्यासाठीं तींत केवळ जीवनाची पूर्णता असणेंच पुरेसें नाहीं. त्यांत त्याची गहनता आणि अंतर्बाह्य संघर्ष हीं असणें अपेक्षित असतें. त्यांत मानव आणि मानवेतर, सृष्टीचा संबंध व त्यांचा समन्वय यांची आकांक्षाहि दृष्टोत्पत्तीस येते. महाकाव्यांत राष्ट्राच्या भावना व इतिहास चित्रित होतात. त्याची संस्कृति त्यांतून उद्‌गीर्ण होते. जें प्रबंधकाव्य जीवनाची विविधता आणि गंभीरता ज्या प्रमाणांत ग्रहण करील, तें त्या प्रमाणांत महाकाव्याच्या जवळ जाऊन पोचूं शकेल. प्रबंध काव्य हें एका युगापुरतेंच असेल, परंतु महाकाव्य युगायुगांसाठीं असतें.

## हिन्दींतील प्रबंधकाव्य

हिन्दीमध्ये प्रबंधकाव्याचा प्रारंभ १३ व्या शतकाच्या सुमारास झाला, असें मानलें जातें. परंतु देशांत ज्या उलथापालथी झाल्या, त्यांत त्याचें अस्तित्वच शिल्लक राहिलें नाहीं. विक्रमाब्दीच्या १६ व्या शतकापासून प्रबंधकाव्यांची परंपरा आपल्याला सापडते. कालक्रमाप्रमाणे प्रबंधकाव्यांची सूची खाली दिली आहे:–

(१) लक्ष्मणसेन पद्मावत की कथा (दामो कवी) सं. १५१६

(२) मृगावती (कुतवन शेख) सं. १५६६

(३) मधु मालती (मंझन कवि) १६ शताद्वि

(४) पद्मावत (मलिक मुहम्मद जायसी) १६०५ सं. वि.

(५) ढोला मारू की कथा (हरराज) १६०७ सं. वि.

(६) माधवानल कामंद कला (आलम कवी) १६४८ सं. वि.

(७) चित्रावली (उस्मान कवि) १६७० सं. वि.

(८) रसरतन (पोहर कवि) १६७३ सं. वि.

(९) ज्ञानदीपक (शेख नबी) १६७६ सं. वि.

(१०) कनकमंजरी (काशीराम) संवत् आनिश्चित

(११) गुणसागर (राजा अजितसिंह) संवत् आनिश्चित

(१२) हंस जवाहिर (कासिम शाह) संवत् अनिश्चित

(१३) इंद्रावली (नूर मुहम्मद) ,, ,,

(१४) कामरूप की कथा (हर सेवक मिश्र) ,, ,,

(१५) हरदौलचरित (बिहारी लाल) ,, ,,

(१६) चन्द्रकला (प्रेमचंद) ,, ,,

(१७) प्रेमरत्न (फाजिल शाह) ,, ,,

(१८) प्रेम पयोनिधि (मृगेन्द) ,, ,,

(१९) मधुमालती की कथा (चतुर्भदास) विसावें शतक

(२०) चित्रमुकुट की कथा (अज्ञात)

(आधुनिक प्रबंध काव्यांची नामावली यांत समाविष्ट नाहीं.)

या यादींत 'रामचरितमानस'चाहि उल्लेख नाहीं, कारण तें केवळ प्रबंधकाव्यच नाहीं, तर महाकाव्यहि आहे. त्यांत हिंदूंच्या जातीयतेचा अमर इतिहास आहे. त्याचा प्रसार भारत वर्षातच आहे, असें नाहीं, तर यूरोपखंडांतहि त्याला प्रवेश मिळालेला आहे. किती तरी भाषांतून त्याचे अनुवाद झालेले आहेत. त्याची रचना विक्रमाब्दीच्या १७ व्या शतकांत झाली. वर दिलेल्या यादींत हिंदु आणि मुसलमान अशा दोन्ही जातींच्या कवींनी रचलेल्या प्रबंधकाव्यांचा उल्लेख आहे. परंतु महाकाव्याच्या जवळ जाऊन पोच-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ण्याचा गौरव त्यांपैकीं एकालाहि प्राप्त झालेला नाही. याचें कारण, त्यांत, वात्सल्य, भागवत आणि दांपत्य रूपानेंच जिचा विकास झालेला आहे अशा मानवजीवनाच्या एका मूलभाव रतीचें विवेचनच अधिकांशाने केलेलें आढळतें. तुलसीदास हा एकच त्या जातींतल्या कवींपैकीं असा होऊन गेला की, ज्याने जीवनाचें त्याच्या विस्ताराच्या समतेच्या आणि विषमतेच्या विभिन्न स्वरूपांसह आकलन केलें होतें. आधुनिक युगांतहि अनेक प्रबंधकाव्यांची रचना झालेली आहे; परंतु तीं अधिकांशानें 'गीतकाव्यें'च ठरतात. त्यांत काव्यमाधुरी भरपूर आहे, रस–विशेषाच्या परिपोषानें वाचकांचें हृदय भारून टाकण्याचें सामर्थ्यहि त्यांत आहे, परंतु जीवनाकडे गंभीर दृष्टीने पाहून त्याचें मोलतोल ठरविण्याचा किंवा प्रचालित समस्यांचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न केलेला त्यांत फारसा आढळत नाही. त्यांचें अनुशीलन करून वाचकांची 'शारीरिक' तृषा शमत असेल, परंतु आत्मा अतृप्तच राहतो; आणि, जर आत्म्याची तुष्टि झाली, तर 'शरीर' अभावाच्या जाणिवेने तळमळत राहतें.

## 'कृष्णायन' चा प्रादुर्भाव

हिन्दी साहित्याच्या या 'गीति-कालांत' पंडित द्वारकाप्रसाद मिश्रांच्या 'कृष्णायन'चा प्रादुर्भाव होत आहे, आणि तोहि 'खडी बोली' मधून नाही, तर अवधी भाषेंतून. ज्या संघर्षपूर्ण परिस्थितींतून त्याचा जन्म झालेला आहे, ती 'कृष्णायना'ला सर्वथैव अनुरुप अशीच आहे. काव्याचा प्रारंभच कसा होतो, पाहाः—

"जन्मेहु बंदीधाम, जो जन जननी मुक्ति हित।
बन्दहुं सोइ घनश्याम, मैं बन्दी, बन्दिनि-तनय ॥"
[बंदी धामीं जन्मला, जो जन-जननी-मुक्तिहित।
श्याम तोचि म्यां वंदिला, बंदिनि-तनयें बंदिनें ॥]

राम आणि कृष्ण यांनी भारतीय कवींना जितकें अनुप्राणित आणि प्रेरित केलें आहे, तितकें दुसऱ्या कोणी केलें असेल की नाही, याची शंका आहे. हे अयोध्याधीश दशरथाच्या पुत्राच्या आणि मथुरेच्या वसुदेव देवकीच्या पुत्राच्या रूपांनी काव्यांत अवतीर्ण होत आलेले आहेत; आणि, केवळ हृदयांतच स्पंदित होणारे 'निरंजन–निराकार' बनून कवींना आत्मविभोर करीत आलेले आहेत. कबीराच्या रामाच्या ठायीं 'निर्गुण ब्रह्म' आणि मीराबाईच्या कृष्णाच्या ठायीं सगुण 'जोगी'चें अधिष्ठान आहे. रीतिकालच्या कवींनी तर स्पष्टच म्हटलें आहे "आमच्या कवितांत राधिका–गोविंद हे परमात्मचिंतनाचेच निमित्त आहेत."

'कृष्णायन' पाहून स्वाभाविकपणेंच आम्हांला दुसऱ्या दोन कवींचें स्मरण होतें. या काव्याचा विषय कृष्णचरित्र हा असल्याकारणाने सूरदासाची आणि तें अवधीभाषेंत दोहा-चौपाई या छंदांत रचलें असल्यामुळे तुलसीदासाची. परंतु सूरदासने काय, किंवा त्यानंतरच्या कवींनी काय, कृष्णाच्या जीवनाचा एक खण्डच काय तो पाहिला. त्याच्या बाल आणि यौवन वृत्तींकडेच त्यांचें लक्ष्य गेलें. आपल्या पूर्ववर्ती जयदेव, विद्यापति आदि कवींच्या परंपरेंत सूरदासाला कृष्णाच्या ज्या 'मधुर रूपाचें' दर्शन घडलें, त्याचें वर्णन त्याने मधुर ब्रजवाणींतून गायिलें. या दृष्टीने पाहतां, आपल्या पूर्ववर्ती कवींच्या पुढे सुरदास जाऊं शकला नाही. त्याच्या पदांतून बालमनोवृत्तींची जी विशद उद्भावना प्रगट झालेली आहे, ती हिन्दी साहित्याच्या अभिमानाचा विषय आहे, यांत शंका नाही. शृंगाराच्या संयोग आणि वियोग यांच्या बाबतींतहि त्याच्या सहृदयतेच्या माधुरीची वृष्टि होऊं लागते, हेंहि खरें. परंतु, आचार्य रामचन्द्र शुक्ल यांनी म्हटल्याप्रमाणे, "जीवनाच्या गंभीर समस्यांकडे तटस्थ दृष्टीने पाहत असल्याकारणाने सूरदासाच्या काव्यांत वस्तुगांभीर्य नाही. श्रीकृष्णाच्या लोकसंग्रहकारी रूपांत त्याची वृत्ति लीन झालेली नाही. बाल्यावस्थेंत ज्या शक्तीने प्रबल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शत्रूंचें दमन केलें, तिच्या उत्कर्षाचें अनुरंजनकारी विस्तृत वर्णन त्यानें केलें नाही.'' सूरदासाने केलेल्या बकासुर, अघासुर, कंस इ०च्या वधाच्या वर्णनांत ओज नाही, हें मान्य करावेंच लागेल. या दृष्टीनें जेव्हा आपण 'कृष्णायन'-कडे पाहूं लागतों, त्या वेळीं, या काव्यांत, सूरदासाच्या गीति-काव्यांत अशा प्रकारच्या पूर्णत्वाच्या चित्रणाला अवकाश नव्हता, तें त्याचें क्षेत्र नव्हतें, हें स्वाभाविकच ठरतें. म्हणूनच मिश्रजींनी स्वतःला गीत काव्याच्या संकुचित सीमेमध्ये बद्ध करून ठेवलें नाही; त्यांनी तुलसीदासाप्रमाणेंच, कृष्णाच्या शील-सौंदर्य आणि शक्तितत्त्व यांना प्रबंधाचें रूप देऊन एका महाकाव्याची सृष्टि केली आहे. कृष्णायनमध्ये विखुरलेलें वात्सल्य सूरदासाच्या रसाची जोड मिळून मधुर बनून गेलें आहे, हें खरें; परंतु कृष्णायनांतील सामर्थ्यशाली कृष्ण सूरदासांत कुठे सामावूं शकला आहे? कृष्णाच्या स्वरूपाची ही अभिव्यक्ति तर सर्वथैव द्वारकाप्रसाद मिश्रांचीच सृष्टि आहे. जर या दोहोंची तुलनाच करायची झाली, तर असें म्हणतां येईल की, सूरदासाच्या काव्यांत माधुर्य अधिक आहे, तर मिश्रजींच्या काव्यांत ओज अधिक आहे. सूरदासानें श्रीकृष्णाचें शक्तितत्त्व जेथे सोडून दिलें आहे, तेथे मिश्रजींनी उत्साहभरानें त्याचीच उद्भावना केलेली आहे. एकच भाव,–विशेषतः शृंगार–घेऊन त्याच्या अंगप्रत्यंगाची अभिव्यंजना करण्यासाठी सूरदासाप्रमाणे मिश्रजी थांबले नाहीत, परंतु जेथे शौर्याचे आणि आणि उत्साहाचे प्रसंग आले, अशा ठिकाणीं त्यांचें मन खूपच रमलें आहे. ह्या कारणासाठीच आम्ही कृष्णायन हें 'शक्तीचें काव्य' आहे, असें मानतों. सूरदासाचें 'सौंदर्याचें' क्षेत्र हें मिश्रजींचें क्षेत्र नाही.

कृष्णायनमध्ये 'प्रबन्धत्व' असल्याकारणानें तें तुलसीदासाच्या रामायणाच्या अधिक निकट जाऊन पोचतें. केवळ प्रबंधत्वामुळेच नाही, तर दोहा, चौपाई इ. छन्दामुळेहि तुलसीदास आणि पं. द्वारकाप्रसाद मिश्र या उभयतांच्या काव्य-मनोवृत्तींमध्येहि पुष्कळच समानता आहे. आपापल्या काळाच्या आवश्यकता अनुभवून दोघांनी लोकरंजनकाव्याची सृष्टि केली,–दोघांच्याहि पुढे राष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि राजनैतिक दुरवस्थेचा प्रश्न उभा आहे. तुलसीदासानें आपल्या रामायणामधून राजनीतीमध्ये रामराज्याचा, धर्मामध्ये सर्व-धर्म-समन्वयाचा आणि समाजामध्ये उदार वर्णाश्रमाचा आदर्श प्रस्तुत केला आहे. कृष्णायनमधून आजच्या परिस्थितीला अनुसरून राजनीतीच्या क्षेत्रांत साम-दाम-दंड भेदाच्या मार्गानें साध्याची साधना, समाज आणि धर्माच्या क्षेत्रांत समन्वय व सामंजस्य यांची स्थापना आणि अनैसर्गिक रूढींचा निषेध इकडे संकेत केलेला आढळतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन येथे दुर्दम्य आशावादानें भरलेला आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा ।

हा ईशावास्योपनिषदांतील संदेश ह्या काव्यांतूनहि दिलेला आहे.

पूर्ण रूपानें जीवनाचा उपयोग करून यशस्वी बनण्याची प्रेरणा कृष्णायन वाचकाला देतें. लोकरंजनाच्या भावनेच्या बाबतींत या दोहोंत जें सामान्यत्व आहे, त्याखेरीज भावना व्यक्त करण्याच्या बाबतींतहि त्यांच्यामध्ये शैलीची समानता आहे. सत्राव्या शताब्दींत व्रजभाषा ही काव्यभाषा होती. परंतु तुलसीदासानें अवधी भाषेला जनकंठांत स्थान मिळावें, असा उपक्रम सुरू केला.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या विसाव्या शतकांत आज 'खडी बोली' ही काव्याची भाषा आहे. परंतु मिश्रजी तुलसीदासाप्रमाणेंच अवधीलाच जन-मन-रंजनाचें साधन बनवूं पाहत आहेत. आपापल्या काळांतील काव्यभाषांशीं दोघेहि सुपरिचित आहेत. तुलसीदासाने व्रजभाषेंतहि कांही मधुर काव्यरचना केलेली आहे, मिश्रजींनीहि खडी बोलीमध्ये पदें रचलीं आहेत. परंतु दोघांनी निरनिराळ्या कारणास्तव शेवटीं अवधी भाषेचीच निवड केली. आपल्या काळांत तुलसीदासला अवधीच प्रबंधकाव्याच्या रचनेसाठीं उपयुक्त वाटली. कारण त्याच्यापूर्वी जायसी इ. कवि अवधि भाषेला पुरेसें परिष्कृत रूप देऊन गेले होते. व्रजभाषेंत एकहि प्रबंधकाव्य नव्हतें. मिश्रजींनीं अवधीची निवड केली, कारण रामायणांतील छंद आज संपूर्ण भारतांत प्रचलित आहेत. वास्तव लोकरंजनकारी संदेश त्याच प्रचलित भाषेंतून आणि शैलींतून लोकांना देणें मनोविज्ञानाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरतें.

तुलसीदासाची भाषा आणि शैली वगळल्यास कृष्णायनमध्ये त्याच्या भावधारेंतील कोणताच अंश आलेला नाहीं; परंतु सूरदासाच्या भाषाशैलीचें येथे मुळीसुद्धा अनुसरण केलें नसतांनाहि त्याच्या भावधारेच्या रसाचे बिंदु इथे-तिथे विखुरलेले दिसतात.

मनाला एकदम आकर्षित करणारा कृष्णायनांतील प्रमुख गुण आहे त्याची भाषा. ही भाषा इतकी परिष्कृत आणि प्रमाणबद्ध आहे कीं, आपण तिला प्रमाणरूप मानून चालण्यास कांहीच प्रत्यवाय नाहीं. कवीने प्रसंगविशेषीं कांहीं भावसंहतिपूर्ण असे शब्दहि नव्याने रचून उपयोजिले आहेत. उदा. श्रुति-उत्सव, नयन-सुख, चक्षुराग, शब्द-कुशल, बतरस इ. ह्यांपैकीं बतरस हा शब्द हिंदींत नवीन नाहीं, हें खरें; परंतु या काव्यांत त्याचा जेथे जेथे प्रयोग झाला आहे, तेथे तेथे त्याच्या योगाने खरोखरीच रस ओसंडूं लागलेला आढळतो. कवीची भाषा संस्कृतप्रचुर आहे, हें खरें आहे. आज अवध प्रांतांत प्रचलित असलेल्या घरगुती बोलीचें रूप कवी जायसीप्रमाणें आपल्या भाषेला देऊं शकत नव्हता, हेंहि खरेंच आहे. आपला संदेश शक्य तितका व्यापक बनावा, म्हणून त्यांना आपल्या भाषेचें हें रूप ठरवावें लागलें आहे. भारताच्या अधिकांश प्रांतांतील भाषा संस्कृतप्रचुर आहेत. यामुळे मिश्रजींनी आपल्या कृष्णायनांत आजच्या प्रचलित अवधीचा प्रयोग न करतां संस्कृतप्रचुर भाषेचा अवलंब केला, हें योग्यच झालें, असें म्हटलें पाहिजे.

कवीने आपल्या प्रबंधकाव्यांत फक्त तीनच छंदांचा उपयोग केला आहे. ते छन्द म्हणजे चौपाई, दोहा आणि सोरठा. ही छन्दोयोजना, आठ चौपायांच्या नंतर दोहा-सोरठा अशा क्रमाने झालेली आहे, आणि शेवटपर्यंत या क्रमाचा कुठेहि भंग झालेला नाहीं. इतका काटेकोर आणि अशा स्वरूपाचा एकच एक क्रम तुलसी-रामायणांतहि साधला जाऊं शकला नाहीं. जायसीने मात्र 'पद्मावत्' आणि 'अखरावर' या आपल्या काव्यांत सात चौपायांनंतर दोहा किंवा सोरठा, अथवा दोहा आणि सोरठा असा क्रम शेवटपर्यंत पाळलेला आढळतो.

काव्यांत वर्णनाचें क्षेत्र दोन स्वरूपाचें असतें. (१) मानव-क्षेत्र, (२) मानवेतर क्षेत्र. या दोन्ही क्षेत्रांत रूपाचें आणि प्रकृतीचें वर्णन येऊं शकतें. मानवक्षेत्रांत प्रकृतिवर्णनाचा अर्थ मानव प्रकृति, तिचे मूळ भाव, घृणा, भय, आश्चर्य इ. हें असतें. आणि, मानवेतर क्षेत्रांत सजीव प्राणी खेरीज करून प्रत्यक्ष सृष्टीचेंच वस्तु-वर्णन, असा त्याचा अर्थ होतो.

महाकाव्याच्या शास्त्रीय पद्धतीप्रमाणे पाहूं जातां, कृष्णायनामध्ये ऋतुवर्णन-सर-सरित्-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समुद्र इ. चें–भरपूर आढळतें. द्वारावतीमध्ये समुद्राच्या पर्वतप्राय लाटांच्या चढण्या–पडण्याचें बाह्य वर्णन तर आहेच, परंतु त्या बरोबरच त्याच्या अंतरंगांतील अवस्थांचें जें वर्णन तेथे आढळतें, तें आधुनिक विज्ञान–शास्त्राच्या माहितीप्रमाणें यथातथ्य स्वरूपांत आलेलें आहे. हें वर्णन हिन्दी साहित्याच्या क्षेत्रांत एक नवी वस्तु म्हणून ओळखलें जाईल. जायसीनेहि समुद्राचें वर्णन केलें आहे, पण तें निव्वळ पारंपरिक (Conventional) स्वरूपाचेंच आहे.

मानवेतर क्षेत्रांत कृष्णायनांत आपल्याला पशुपक्ष्यांच्या स्वभावाचें देखील सूक्ष्म वर्णन केलेलें आढळतें:—

“ शुकहु रीझि शुकि सिर सोहराई ।
प्रकटत मुद–पुट चंचु मिलाई ॥
करत श्वान हू शांति प्रयासू ।
पूंछ नचाय चहत इक आसू ॥
निष्फल यत्न दशा जब पावत ।
रोष करत भूंकत चाढ़ि आवत ॥ ”

श्रीकृष्णाचें जीवन–चरित्र आदिपासून अंतापर्यंत संघर्षानें भरलेलें असल्याकारणानें कृष्णायनामध्ये जागोजागीं युद्धवर्णनेंहि आलेलीं आहेत,–मुष्टियुद्धापासून तों अस्त्र–युद्धापर्यंत आणि व्यक्ति–युद्धापासून तों समष्टियुद्धापर्यंत ! पद्य–साहित्यांत असें सजीव युद्ध–वर्णन फार क्वचित् आढळतें. कृष्णायनांतील युद्धवर्णनांतील शब्दयोजनाहि अशी कुशलतेने केलेली आहे की, ते शब्द कानीं पडून जणूं काय, आपले कानहि युद्ध कोलाहलाने बधिर होऊं पाहतात, असें भासतें !

भयेउ युद्ध संघट्ट जस, तुमुल घोर निर्घोष

ही एकच पंक्ति माझ्या विधानाचें समर्थन करण्यास पुरे आहे. ‘जय कांड’ वाचीत असतां असा भास होतो की, जणूं काय, झंझावाताचें तांडव सुरू आहे, विजा कडाडताहेत, आकाश फाटून खाली कोसळतें आहे ! हें युद्ध रोज–रोज चाललेंच आहे, आणि रोज–रोज नवी नवलाई घेऊन तें येतें. त्यामुळेंच वाचकाचें मन थकत नाही, उबत नाही.

ग्रंथांत सूक्तीहि तुटलेल्या मुक्ताहाराप्रमाणें इतस्ततः विखुरलेल्या आहेत. दोन चार ज्या आठवतात, त्या पाहाः—

(१) चक्षुराग अनुराग न साँचा ।
(२) यह खल रीत सदा संसारा ।
दै विष, धाय करत उपचारा ॥
(३) अशुभ विशंकी सदा सनेहू ।
(४) लोभिहिं प्रीति काहु तें नाहीं ।
(५) जिहि विश्वासु काहु पै नाहीं ।
जियतहु मृतवत सो जग माहीं ॥

आजकालच्या पाश्चिमात्य आलोचना पद्धतीप्रमाणे काव्यांत चरित्र–चित्रणावरहि विशेष भर दिला जात असतो. महाकाव्यांत प्रबंधत्व असल्याकारणाने त्यांत पात्रांची निर्मिति असते, त्यांचे आचार–विचार–व्यवहारहि त्यांत येतातच. यासाठीं त्या पात्रांच्या स्वभावपरिपोषाकडे दृष्टि ठेवणें अप्रस्तुत नाही. परंतु काव्यांत चरित्र–चित्रणाच्या बाबतींत विशेष ओढाताण करण्याचें प्रयोजन नाही, असें माझें मत आहे. महाकाव्यांत तर याची मुळींच गरज नाही. कारण महाकाव्यांत कित्येक व्यक्ती मानवतेच्या सीमा ओलांडून पलीकडे गेलेल्या असतात. अ–मानव पात्रांचे आचार मानवांच्या परिमिततेच्या कसोटीवर कसे पारखले जाऊं शकतील ?

कृष्णचरित्राकडे पाहण्याची कवीने आपली अशी एखादी विशिष्ट दृष्टि कृष्णायनांतून वाचकांना दिली आहे, असें नाही. तें त्याने वाचकांवरच सोपवून दिलें आहेः—

जाकी होय भावना जैसी ।
प्रभु मूरत देखें वे तैसी ॥

जागोजागीं कृष्णाच्या तोंडूनच–तुलसीदासाप्रमाणे–त्याला श्रीविष्णूचा अवतार वदवून

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवीने वाचकाची अवस्था अधिकच कठीण करून सोडली आहे, असें जरी असलें, तरी एके ठिकाणीं कृष्णाने असेंहि म्हटलें आहेः—

" जन्म साथ पुनि मृत्यु विधाना ॥
मर्त्य रूप मैं महि अवतारी ।
नहिं अमरत्व कृष्ण अधिकारी ॥ "

यामुळे, त्याने वारंवार विष्णूचा अवतार असल्याच्या केलेल्या घोषणांना निराळे ठेवून आपण कृष्णाला एक महापुरुष मानून त्याचा स्वीकार करूं शकतों. प्रत्येकच महापुरुष ईश्वराच्या अंशाला साधारणांपेक्षा अधिक प्रमाणांत घेऊन उत्पन्न होत असतो. कोणत्याहि तऱ्हेच्या लघुतेने या महापुरुषाने स्वतःला कधी आक्रान्त होऊं दिलेलें नाही. कृष्णायनांतील कृष्ण एक तेजस्वी, वीर्यवान् पुरुष आहे. त्याच्यावर आपण प्रेम करूं लागतों, त्याच्याबद्दल ईर्षाहि आपल्या मनांत उत्पन्न होते, तो आपल्याला भयभीतहि करून सोडतो. आणि त्याची भव्यता पाहून आपण आपलें मस्तक त्याच्या पुढे नम्र करतों. श्रद्धा आणि भक्ति यांनी भरून जाऊन जयदेव कवीबरोबरच आपल्याहि मुखावाटे उद्गार बाहेर पडतात : "जय जगदीश हरे ! "

स्त्री—पात्रांपैकी राधिका, द्रौपदी, अवन्ती—साम्राज्ञी आणि सत्यभामेचें चारित्र—चित्रण फार चांगलें वठलें आहे. स्त्री—हृदयांतील प्रतिकार—भावना द्रौपदी आणि सत्यभामा यांच्या रूपाने जशी कांही गर्जना करून उठतेसें वाटतें. द्रौपदी एके ठिकाणीं म्हणतेः—

"जबतक दुःशासन जियत, जियत अधम कुरुराज।
तबलग वसुधा पृष्ठ नहिं, शान्ति, अहिंसा काज ॥"

महाभारताचा अग्नि प्रज्वलित करण्याच्या कामीं द्रौपदीच्या नासापुटांतील उष्ण निःश्वासांनी थोडेंथोडकें काम केलेलें नाही !

इन्द्राणीने केलेला अपमान सत्यभामा सहन करूं शकली नाही.

सर्वांत अधिक विलोभनीय चित्र आहे राधा-राणीचें. राधेला काव्यांत प्रथम प्रवेश करावयाला लावलें जयदेव कवीने. तिच्यावर परकीया नायिकेचा आरोप करून त्याने मधुर रसाचे प्रचंड स्रोत वाहविले यांत शंका नाही. स्वकीयांचे बाबतींत रागोन्मेष प्रबल रूप धारण करीत नसतो. विद्यापतीनेहि जयदेवाचेंच अनुकरण केलें. त्याने केलेलें राधिकेचें विरह-वर्णन हृदयस्पर्शी आहे.

"ई भर बादर माह भादर शून्य मन्दिर है मोर"

असे उद्गार काढणाऱ्या विद्यापतीच्या विरहिणी राधेने न सांगण्याजोगेंहि सांगून टाकलें आहे. परंतु रवीन्द्रनाथांच्या शब्दांत सांगावयाचें तर "विद्यापतीच्या राधेंत प्रेमापेक्षा विलास अधिक दिसतो. तेथे नवानुरागाची पागार बनवून सोडणारी लीला आहे. तिचें चांचल्यहि आहे,—गंभीरतेचें अचल स्थैर्य नाही ! "

विद्यापतीनंतरच्या कवींनीहि वैष्णवकविपरंपरेप्रमाणे स्वतःला, राधेचें शरीर व तिचे शारीरिक व्यापार इथपर्यंतच सीमित ठेवलें आहे. परंतु कृष्णायनाच्या कवीने राधेच्या एका अनुपम रूपाची सृष्टि केली आहे. येथे राधा परकीया दिसत असूनहि कृष्णाच्या पूर्व स्मृतींमध्ये स्वकीया बनूनच ती कृष्णायनांत विरहत आहे. कृष्ण आणि राधा यांच्यामध्ये शारीरिक आकर्षण नाही; त्या दोघांची आत्मिक ऐक्य प्रतिष्ठित करण्यासंबंधीची व्यग्रताच या काव्यांत दाखविली गेली आहेः—

" राधा माधव मिलन अनूपा ।
हरि राधा राधा हरिरूपा ॥ "

मायारूपी कृष्णाला राधा देखील एकदा साकार रूप देऊन पुढे उभा करते. राधेची साधना—मूर्ति वाचकांच्या अंतःकरणांत पवित्र भावनाच निर्माण करते. ती बोलते थोडेंच, स्थूल रूपांत आढळतेहि क्वचितच; परंतु वाचकाच्या कल्पना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीपुढून ती अदृश्य अशी कधीच होऊं शकत नाही. आपल्या जन्मजन्मांतरींच्या सहचराची अचानकपणें सृष्टि झाल्यानंतर उत्पन्न झालेला असीम स्वर्गीय आनंद राधेने आपल्या भौतिक जिव्हेने कसा व्यक्त करावा? म्हणूनच ती मुखर बनत नाही, तोंड मिटूनच राहते.

सूरदासाच्या राधा-वर्णनांत 'पीडा' वेदना फार आहे. कृष्णायनांत विरहवर्णन नाही. परंतु विरहाची अनुभूति मात्र फार खोल आहे. एकाच्या 'पीडेंत' जागृत स्वरूपाचें तडफडणें आहे. दुसऱ्यामध्ये पीडेच्या गहनतेमुळे आलेली मूर्च्छना आहे, प्रलय आहे आणि म्हणूनच त्या दुःखाच्या अभिव्यक्तीची शून्यता आहे. अशोभन श्रृंगार कृष्णायनांत कुठेहि आढळत नाही. या दृष्टीने पाहतां, हिन्दींतील काव्यपरंपरेपासून तें सर्वथैव भिन्न आहे.

कृष्णायनांतील कवित्व अलंकार-रसादिकांच्या शास्त्रीय पद्धतीवर आश्रित नाही. या गोष्टी जेथे आल्या तेथे त्या नकळत आपल्या आपणच आलेल्या आहेत. काव्याचें हें नैसर्गिक सौंदर्य आहे, आणि याचा प्रसाद सर्वांनाच सुलभग्राह्य आहे. सर्वच श्रेणींच्या व्यक्तींच्या आकांक्षेची जाणीव येथे ठेवली गेलेली आहे. येथे कोणीहि यावें आणि आपली अभिलाषित वस्तु प्राप्त करून घ्यावी. आपल्या देशांत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हीं चार जीवनाचीं ध्येयें मानलीं गेलीं आहेत. या चारहि तत्त्वांचें आजच्या परिभाषेंत कृष्णायन वाचकाला दान करतें आहे. जीवनाच्या साधारण आणि असाधारण अशा सर्वच समस्यांचें समाधान त्यांत केलेलें आढळतें. धर्माची व्याख्या किती यथार्थ केली आहे, पाहाः—

बाह्य आचरण धर्म न होई।
बसत मनुज-मानस महँ सोई॥

याचप्रमाणे सत्याच्या बाबतींतहि कवीचा विश्वास बुद्धिविवेचनापूर्ण असाच आहेः—

सर्वभूत हितकर जो कारण।
सोई सत्य, न शब्दोच्चारण॥

'प्रसाद' ने सत्याला तर्कबुद्धीचा पिंजरबद्ध शुक म्हणून त्याचें विभिन्नत्व निराळें राहूं दिलें नाही, खरें, परंतु त्यांनी त्याचा एखादा निकषहि दाखविला नाही.

मिश्रजींची अहिंसेची ओळखहि अशीच मौलिक स्वरूपाची आहेः—

प्राणिन देहि अभय जो दाना।
सोइ अहिंसा धर्म महाना॥

मैत्रेयाच्या प्रश्नाचें उत्तर देतांना श्रीकृष्णाच्या मुखावाटे कवीने भारतीय दर्शन-तत्त्वांचें मंथन आणि त्यांचें परस्पर सामंजस्य अत्यंत विशदपणें वदविलें आहे. भारतीय दर्शनांच्या तत्त्वांची तोंडओळख वाचकांना येथे अगदी थोडक्यांतच होऊन जाते. शेवटचें कांड हें तर वास्तविकपणें दर्शनमयच आहे.

कृष्ण आणि कृष्णायन यांचा अंत सुंदर नाटकी पद्धतीप्रमाणेंच झाला आहे. मैत्रेयाशीं बोलतां बोलतांच हें दृश्य उपस्थित होतेंः—

"भये मौन प्रभु कहि वचन निखिल भुवन परित्राण।
खोले उत मैत्रेय दृग, मूँदे इत भगवान॥"

हिन्दींत रामायणाचा अवतार झाल्यानंतर तीनशें वर्षांनी कृष्णायनासारख्या महाकाव्याची सृष्टि झाली आहे. यांत मानवजीवनाच्या सर्व अभिलाषांची पूर्ति झालेली आढळते, त्याचप्रमाणें भारतीय संस्कृतीचें संपूर्ण स्वरूपहि पाहावयास मिळतें.

कृष्णायनाच्या कवीचा प्रादुर्भाव आज उल्कापाताप्रमाणे प्रतीत होत असला, तरी त्याच्या साहित्यसाधनेचा प्रारंभ कृष्णायनापासून झालेला नाही. 'श्री शारदा' मासिकामधून त्याच्या साहित्यिक परिष्कृत सुरुचीचा परिचय हिन्दी विद्वानांना मिळालेला आहे. 'पंतां'च्या ललित-कोमल रचनेमध्ये भावी हिन्दी-कवितेचें बीज त्यांच्या दृष्टीला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किती तरी अगोदरच दिसलेलें होतें. त्या काळीं छायावादाच्या नेतृपदाची बिरुदावली पंतजींच्या मस्तकावर चढलेली नव्हती; परंतु मिश्रजींनी आपल्या 'श्री शारदे'मधून पंतांच्या कवितांचें प्रकाशन ज्या उत्साहाने केलें त्यावरूनच या संपादकाने या भावी कवीला ओळखलें होतें, हें सिद्ध होतें. मिश्रजींच्या या जागरूकपणानेच त्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत साफल्य मिळवून दिलें आहे. चार वर्षांच्या कठिण साधनानंतर आज ते कृष्णायन हिन्दीला देत आहेत. " साहित्याच्या महान् निधीचें दर्शन मला या काव्यांत होतें, " असें जेव्हा मी म्हणतों, तेव्हा, मला वाटतें, हिन्दी जनतेचा कंठस्वरहि माझ्या स्वराला साथ करीत आहे.

---

# ० उपनिषदांतील मानवाचें प्राप्तव्य

डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी, बी. ए., बी. एल्., डी. लिट्.

नागपुरचे डॉ. के. ल. दप्तरी हे अव्वल दर्जाचे प्रतिभाशाली विचारवंत या नात्याने महाराष्ट्रभर मशहूर आहेत. त्यांनी उपनिषदांवर एक अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिलेला असून तो अद्यापि अप्रकाशित आहे. त्यांतील एक स्वयंपूर्ण भाग येथे देण्यांत येत आहे.

डॉ. दप्तरी यांचें अप्रसिद्ध लिखाण मुद्रित करण्याची कांही तरी योजना सत्वर व्हावयास पाहिजे.

उपनिषदांनी जीवाचें प्राप्तव्य काय ठरविलें, याचा येथे विचार करूं. बृहदारण्यक ४–२–१.२ येथे अगदी असंदिग्धार्थ शब्दांनी 'दक्षिणेऽक्षन् पुरुषः' हें प्राप्तव्य सांगितलें आहे. 'दक्षिणेऽक्षन् पुरुषः' म्हणजे काय? ऐतरेयोपनिषदाच्या भाष्यांत (अध्याय ४) तीन आवसथांचें विवरण करितांना श्रीशंकराचार्यांनीहि 'जागरितकाले इंद्रियस्थानं दक्षिणं चक्षुः' असें वाक्य लिहिलें आहे. बृहदारण्यक २।३।५ आणि ४।२।२ येथे 'दक्षिणेऽक्षन् पुरुषः' हे शब्द आले आहेत. या दोन्ही ठिकाणीं जागृतावस्थेंतच डोळे उघडे असतात, म्हणून डोळ्यांतील पुरुष म्हणजे जागृति हा अर्थ स्पष्ट आहे. ब्रह्मोपनिषदांतहि 'नेत्रस्थं जागरितं विद्यात्' (श्लो. २१) असेंच सांगितलें आहे. नादपरिव्राजकोपनिषदांतहि (५।२५) हें सांगितलें आहे. डोळ्यांतील पुरुष म्हणजे जर जागृति, तर दक्षिण डोळ्यांतील पुरुष म्हणजेच जागृतीचा विशिष्ट प्रकार, हें अर्थातच ठरतें. तें वैशिष्ट्य कोणतें, तें दक्षिण शब्दाच्या अर्थावरून ठरेल किंवा बृहदारण्यकांतील ४।२।४ येथीलच वर्णनावरूच ठरेल. दक्षिण म्हणजे 'उजवा' असा जरी अर्थ असला, तरी 'कुशल' (विद्वान) असाहि त्याचा अर्थ आहे; आणि बृहदारण्यक ४।२।४ येथे सर्व दिशांस असलेले प्राण त्याच्या त्या त्या दिशा म्हणजे भाग होत, असें वर्णिलें आहे. यावरून तो सर्व जीवांचे प्राण आपलेच भाग होत, म्हणजे सर्वभूतांचे आणि आपले प्राण किंवा आत्मा एकच आहे, असें मानतो, असें ठरतें. म्हणजेच तो अद्वैतज्ञ आहे. म्हणून त्याच्या



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जागृतीलाच 'दक्षिणेऽक्षन् पुरुषः' म्हटलें आहे, असें ठरतें. छांदोग्य ४।१५ आणि ८।७।४ या ठिकाणींहि 'य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यते एष आत्मेति होवाचैतदमृतमभयं ब्रह्मेति' असे शब्द आहेत. आणि, त्याच शब्दांचें विवरण करणाऱ्या छांदोग्याच्या ८।१२ येथील भागांत, म्हणजे उत्तमपुरुषाच्या वर्णनांत, 'जक्षन् क्रीडन् रममाणः' हें विशेषण त्याला लाविलें आहे. यावरून तें जागृतावस्थेचें वर्णन आहे, हें उघड आहे. शिवाय छांदोग्य ८।७–१२। येथील प्रकरणांत केवळ शरीराचें स्वप्नावस्थेचें व निद्रेचें अभोग्यत्व टरविलें, तसें जागृतीचें ठरविलें नाही. यावरूनहि हेंच ठरतें की, छांदोग्य ८।१२ येथे जागृतीचेंच वर्णन आहे. पण तें वर्णन आपला आत्मा एकाच शरीरांत राहणारा नसून सर्व भूतांच्या शरीरांत राहणारा आहे, असें मानतें. म्हणजे ज्याचा आत्मा एका शरीरांतून निघून सर्व भूतांच्या शरीरांत पसरला व ज्याचा एकाच शरीराविषयींचा अभिमान गळाला, त्या अद्वैतज्ञाच्या जागृतीचें आहे, असें 'एवमेवैष संप्रसादो अस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यते' आणि नोपजनम् स्मरन्निदं शरीरम्' या शब्दांवरून ठरतें. श्रीशंकराचार्यांनीहि 'अस्माच्छरीरात्समुत्थाय' याचा अर्थ 'देहादिवैलक्षण्यमात्मनो रूपमवगम्य देहात्मभावनां हित्वा' असा केलेला आहे व याच शब्दाचा छांदोग्य ८।३।४ येथेहि 'अस्मात् शरीरात् समुत्थाय शरीरात्मभावनां परित्यज्य' असा अर्थ केला आहे; आणि असाच अर्थ करणें योग्य आहे. याचें कारण असें आहे की, 'स वा एष एतेन दैवेन् चक्षुषा मनसैतान् कामान् पश्यन् रमते य एते ब्रह्मलोके' या छांदोग्य ८।१२।५ येथील वाक्यांत उत्तम पुरुषाचें मन व्यापार करीत असतें, असें स्पष्टच म्हटलें आहे; व मनाचा व्यापार जीवंत देहाशिवाय व जागृतीशिवाय होऊं शकत नाही. एकूण ही अवस्था जागृतीच होय. ती अवस्था स्वप्न न ठरण्याचें कारण स्वप्नाचें अभोग्यत्व छांदोग्यांत पूर्वीच दाखविलें आहे, हें होय. ब्रह्मलोक जो वरील वचनांत निर्दिष्ट केला आहे, तो तरी या देहावस्थेंत जागृतींतच प्राप्त होऊं शकतो, हें छांदोग्य ८।३।३ व ८।३।५ येथील 'अहरहर्वा एवं वित्स्वर्गं लोकमेति' या वाक्यावरून ठरतें. कारण मनुष्य दररोज जरी जागृति, स्वप्न व निद्रा यांत जातो, तरी स्वप्न आणि निद्रा अभोग्यच ठरविल्या असल्यामुळे त्यास स्वर्ग म्हटलें असणें शक्य नाही. म्हणून अद्वैतज्ञाच्या जागृतीसच स्वर्ग म्हटलें असणें शक्य आहे. आणि, स्वर्गलोक म्हणजे ब्रह्मलोक हे 'एवमेवेमाः प्रजाः अहरहः गच्छंत्य एतम् ब्रह्मलोकं न विंदंत्यनृतेन हि प्रत्यूढाः' (८।३।२) यांत प्रजा दररोज ब्रह्मलोकांतहि जातात, पण अज्ञानामुळे (अनृतेन) त्याला मिळवीत नाहीत, म्हणजे भोगत नाहीत, असें म्हटलें आहे, यावरूनच ठरतें. एकूण 'अक्षिणि पुरुषः', 'उत्तमः पुरुषः' म्हणजे प्राप्तव्य अवस्था—म्हणजे अद्वैतज्ञाची जागृति हेंच सिद्ध होतें. या अवस्थेंत मनाचा व्यापार चालू असतो, असें म्हटलें असल्यामुळे ती निर्विकल्प समाधीहि नव्हे, हेंहि निश्चित आहे.

हेंच बृहदारण्यकांत ४।३।२०–३३ मध्येहि सांगितलें आहे. येथील मुख्य वाक्य असें 'अथ यत्रैनं घ्नंतीव जिनंतीव हस्तीव विच्छाययति गर्तमिव पतति यदेव जाग्रद् भयं पश्यति तदत्राविद्यया मन्यतेऽथ यत्र देव इव राजेवाहमेवेदं सर्वोऽस्मीति मन्यते सोऽस्य परमो लोकः ॥२०॥...सलील एको द्रष्टाऽद्वैतो भवत्येष ब्रह्मलोकः सम्राट् इति हैनमनुशशास याज्ञवल्क्यः। एषास्य परमागतिः एषास्य परमासंपत् एषोऽस्य परमो लोकः एषास्य परम आनन्दः एतस्यैवानंदस्य अन्यानि भूतानि मात्रामुपजीवंति ॥३२॥'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याचा अर्थ असाः—मला जणूं मारतात, मला जणूं जिंकतात, हत्ती जसा तुकडे करतो तसे जणूं माझे तुकडे दुसरा करवितो, मी जणूं गड्डयांत पडतो, या प्रकारचें जें जें भय मनुष्य जागेपणीं पाहतो तें या जागृतींत ( जागेपणीं हा अर्थ 'अत्र' या शब्दाचा आहे. 'अत्र' याचा अर्थ स्वप्न असा होऊंच शकत नाही. कारण त्याच्या मागे जवळच 'जाग्रत्' असा शब्द आहे, आणि मागील खंडांत तर स्वप्नाचें वर्णन नसून निद्रेचेंच वर्णन आहे व तें या खंडांतील 'लोहितस्य पूर्णा' येथपर्यंत आहे आणि 'अथ' पासून दुसरें वाक्य आणि दुसऱ्या कोणत्या तरी अवस्थेचें वर्णन सुरू झालें आहे. तें 'जाग्रत्' या शब्दावरून जागृतीचेंच वर्णन होय, असें निश्चितपणें ठरतें. शिवाय येथे स्वप्नांतील दुःख वर्णन करण्याचें प्रयोजनच नाही. 'अथ यत्र राजेव' इत्यादि वाक्यांत वर्णिलेल्या विद्येच्या फळाशीं—म्हणजेच जागृतींतील आनंदाशीं —विरोधी असें जागृतींतीलच अविद्येचें दुःखरूपी फळ वर्णणें हेंच येथे प्रयोजन असूं शकतें. ) तो अविद्येमुळे, म्हणजे अज्ञानामुळे, म्हणजे द्वैतबुद्धीमुळेच मानतो. परंतु जेव्हा तो देवाप्रमाणे किंवा राजाप्रमाणे हें मीच आहें, सर्व मीच आहें, असें मानतो, तेव्हा तोच म्हणजे तसें मानण्याची ती अवस्थाच त्याचा परमलोक म्हणजे दुःखराहित्याची व परमानंदाची स्थिती होय. ॥ २० ॥. तो दृश्य वस्तूंना पाहतो (द्रष्टा), पण त्या दृश्य वस्तु स्वतःपासून भिन्न आहेत, असें मानत नाही (अद्वैतः) व सर्वत्र मी एकच भरलेला आहें, असें मानतो (एकः) व लीला म्हणजे आसक्तिरहित कर्में करितो. (सलीलः। आज उपलब्ध पाठ 'सलिल' असा आहे. त्याचा 'सलिलः' असें कोणत्याच शब्दाचें रूप होत नसल्यामुळे पदच्छेदाने 'सलिले' असाच शब्द बनेल आणि त्यापासून समंजस अर्थ कोणताच होत नाही. म्हणून मी 'सलील' असा पाठ घेतों. 'सलीलः' शब्दाचा पाठभ्रंशाने 'सलिलः' शब्द झाला, किंवा परोक्षवादाकरिता ग्रंथकारानेच 'सलिलः' केला, असें मानणेंच बरोबर वाटतें. कारण 'सलील' याचा अर्थ छांदोग्य ८। १२ येथील 'जक्षन् क्रीडन् रममाणः' या शब्दांच्या अर्थाशी पूर्णपणें जुळतो.) हाच सम्राट ब्रह्मलोक होय, असें याज्ञवल्क्याने शिकाविलें. (येथील अर्थ अस्पष्ट असला, तरी तो २० व्या वाक्याच्या स्पष्ट असलेल्या अर्थास अनुरूप असाच केला पाहिजे, हें उघड आहे. म्हणून आम्ही तसें केलें आहे.) हीच त्याची परमगति, हीच त्याची परम संपत्ति, हाच त्याचा परम लोक, हाच त्याचा परम आनंद. या आनंदाचा एखादा अंशच इतर भूतें म्हणजे द्वैत मानणारे जीव भोगून जीवंत राहतात. ॥३२॥. या वचनांत 'अद्वैत ज्ञान' हाच परमलोक अर्थात् प्राप्तव्य असें स्पष्टच म्हटलें आहे. 'मन्यते' हा शब्द निःसंशय अर्थाचा आहे आणि त्याने बोधित केलेली क्रिया जागृतींतच संभवते म्हणून ही परमावस्था अद्वैतज्ञाची जागृतीच होय, हें निश्चितपणें ठरतें.

छांदोग्यांतील 'भूमावस्थेच्या' वर्णनावरूनहि हेंच ठरतें. अध्याय ७ खंड २३ ते २५ याचा अर्थ चांगला समजावून घेतला पाहिजे. "जो भूमा तो सुख म्हणजे अत्यानंद व दुसरें पाहात नाही, तो भूमा". असें तेथे म्हटलें आहे. या भाषेचा अर्थ काय, असा प्रश्न येतो. ही भाषा साधी मानली, तर भूमास्थितींत झोंपेंतल्या स्थितीप्रमाणे कांहींच दिसत नाही, असा अर्थ होईल. ही भाषा अलंकारिक मानली, तर भूमास्थितींत तो जागृतींतच असल्यामुळे सर्व पाहात असूनहि तें सर्व स्वतःहून भिन्न आहे, असें मानत नाही, असा अर्थ होईल. या दोन अर्थांपैकी ग्राह्य अर्थ कोणता? वास्तविक या प्रश्नाचा उहापोह करणें अनावश्यक आहे. उपनिषदानेच आपला अर्थ खंड पंचवीसमध्ये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्पष्ट केला आहे. तेथलि वाक्यें अशीं:–स एवाधस्तात्स उपरिष्टात् स पश्चात् स पुरस्तात् स दक्षिणतः स उत्तरतः स एवेदं सर्वमिति–अथातोहंकारादेशः एवाहमेवाधस्तादहमुपरिष्टाद् अहं पश्चादहं पुरस्तात् अहं दक्षिणतोऽहमुत्तरतोऽहमेवेदं सर्वमिति ॥१॥ अथात आत्मादेश एव आत्मैवाधस्तादात्मोपरिष्टात् आत्मापश्चादात्मा पुरस्तात् आत्मा दक्षिणतः आत्मोत्तरत आत्मैवेदं सर्वमिति स वा एष एवं पश्यन्नेवं मन्वान एवं विजानन्नात्मरतिरात्मक्रीड आत्ममिथुन आत्मानंदः स स्वराट् भवति तस्य सर्वेषु लोकेषु कामचारो भवति ॥ याचा अर्थ असा:–तो आत्माच खाली, वर, पश्चिमेस, पूर्वेस, दक्षिणेस व उत्तरेस आहे. हें सर्व तोच आहे. म्हणून आता म्हणजे ज्ञानावस्थेंत तो भूमा अहंकारादेशच करितो. तो असा मीच खाली, वर, पश्चिमेस, पूर्वेस, दक्षिणेस व उत्तरेस आहे. हें सर्व मीच आहे. ॥ १ ॥ आता तो भूमा आत्मादेशच करितो. तो असा:–आत्माच खाली, वर, पश्चिमेस, पूर्वेस, दक्षिणेस व उत्तरेस आहे. हें सर्व आत्माच आहे. याप्रमाणे पाहाणारा, याप्रमाणें मानणारा, याप्रमाणें जाणणारा, तो हा भूमा आत्मरति असतो. म्हणजे दुसऱ्यावर प्रेम (रति) करतो तेव्हा तो खरोखर स्वतःवरच प्रेम करतो, असें तो मानतो, आत्मक्रीड असतो म्हणजे दुसऱ्याशीं क्रीडा करतांना स्वतःशींच क्रीडा करतो, असें मानतो दुसऱ्यांशी मैथुन करितांना स्वतःशीच मैथुन करतो, असें मानतो. तो आत्मानंद असतो म्हणजे दुसऱ्याचा जो आनंद तो स्वतःचाच आनंद मानतो. त्यामुळे तो स्वतःवरच राज्य करणारा स्वतंत्र होतो व सर्व समाजांमध्ये (लोकेषु) इच्छेस येईल तेथे तो फिरतो. येथे 'एवं पश्यन् एवं मन्वानः एवं विजानन्' हेच शब्द विशेषतः लक्ष्यांत ठेविले पाहिजेत. त्यावरून भूमावस्थेंत मनाचा व्यापार चालू असतो व ती अवस्था म्हणजे अद्वैतज्ञाची जागृतीच होय, हें निश्चितपणें ठरतें.

भूमावस्थेंत निद्रेप्रमाणे दुसरें कांही दिसत नाही, ही कल्पना चुकीची आहे. कारण एक असें की, अशा अवस्थेंत आनंदानुभव नाही, असें बृहदारण्यकांत "स वै नैव रेमे। तस्मादेकाकी न रमते। स द्वितीयमैच्छत्॥ १।४॥ या वचनांत स्पष्ट सांगितलें आहे. आणि, म्हणूनच छांदोग्य ८।११ यांत निद्रेचें अभाग्यत्वच ठरविलें आहे. दुसरें कारण असें की, द्वैत दर्शन जरी सारखेंच असलें, तरी त्याविषयींची समज भिन्न असल्यामुळे फळामध्ये फरक होतो. उदाहरणार्थ, आरशांत लहान मुलाला व मनुष्याला स्वतःचें प्रतिबिंब सारखेंच दिसतें, तरी लहान मुलगा त्या प्रतिबिंबास दुसरा मुलगाच मानतो. त्यामुळे त्या प्रतिबिंबांत दिसणाऱ्या वाकोल्यांनी तो रागावतो; मोठा मनुष्य आरशांत आपलेंच प्रतिबिंब दिसतें, असें समजून त्यावर रागावत नाही व त्याचा गंध लावणें, स्वतःच्या चेहऱ्यांतील गुणदोष समजून घेणें याकडे उपयोग करतो. तोंडांत भाकर घेऊन पाण्यावरून जाणाऱ्या कुत्र्याला प्रतिबिंब हा दुसरा कुत्रा होय, असें वाटेल, तर तो त्या प्रतिबिंबाच्या तोंडांतील भाकर घेण्यास आपलें तोंड उघडील आणि स्वतःच्या तोंडांतील भाकर गमाविल; पण तें आपलेंच प्रतिबिंब आहे, असें तो कुत्रा समजेल, तर तो तसें करणार नाही. एकूण, प्रत्यक्ष दर्शन एकच असलें, तरी समज भिन्न असूं शकते आणि तीमुळे वर्तनही भिन्न प्रकारचें होतें. अर्थात् दुसरें दिसत असूनहि तें मीच आहें, असें समजणाऱ्याच्या संसारदुःखाची निवृत्ति होऊन त्याला अत्यानंदाची प्राप्ति होईल. हेंच भूमाच्या प्रकरणांत खरोखर सांगितलें आहे.

---

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# विराटपर्वांतील द्रौपदीची भूमिका

डॉ. शंकर दामोदर पेंडसे, एम्. ए., पीएच्. डी., एम्. ओ. एल्.

डॉ. पेंडसे यांची वाणी व लेखणी यांचा ओजस्विता हा प्रमुख गुण होय. त्याची चुणूक या चिमुकल्या लेखावरूनहि दिसून येईल. त्यांनी दिग्दर्शित केलेली द्रौपदीची भूमिका चालू परिस्थितींत निःसंशय उद्बोधक ठरेल.

महर्षि व्यासांनी आपल्या दिव्य प्रतिभेने ज्या कांही भारतीय व्यक्ति चिरंजीव केल्या आहेत. त्यांत द्रौपदीची गणना होते. दुःशासनाने ओढलेले केस वारा वर्षें न बांधतां मोकळे ठेवून वावरणाऱ्या आणि दुःशासनाच्या रक्ताने भरलेल्या हातांनीच ते बांधले जातील, ही भावना पतींच्या मनांत सदैव जागृत ठेवणाऱ्या द्रौपदीच्या तेजस्वी स्वभावाचा परमोत्कर्ष, व्यासांनी विराटपर्वांत दाखविला आहे. ज्या व्यक्तींचें स्वभावचित्रण करावयाचें असतें, त्यांची प्रतिमा वाचकांच्या मनासमोर उभी करणें अवश्य असल्यामुळे व्यासांनी द्रौपदीच्या स्वरूपाचें पुढील-प्रमाणे वर्णन केलें आहे. त्यावरून भारतकालीन स्त्रीसौंदर्यविषयक कल्पनाहि कळून येतात; "तिच्या पायाचे घोटे उंच नव्हते म्हणजे ते बाहेर दिसत नसत. तिचे ऊरु म्हणजे मांड्या पुष्ट असल्यामुळे एकमेकांना लागलेल्या होत्या. तिची वाणी, बुद्धि व नाभि गंभीर होतीं. तिचें नाक, नेत्र, कान, नखें, स्तन व घांटी उन्नत होतीं. हंसाच्या कलरवाप्रमाणे तिचें भाषण होतें. तिचे केश व स्तन सुंदर होते. वर्णाने ती श्यामला होती, किंवा उष्णकाळांत ज्यांचें अंग थंड असतें व थंडीच्या दिवसांत ज्यांचें अंग उष्ण असतें, अशा स्त्रियांपैकीं ती होती. तिचे स्तन व कमरेखालचा भाग पुष्ट होते. अशा सुंदर अंगांनी संपन्न असलेली ती द्रौपदी काश्मिरी घोडीप्रमाणे चलाख, तेजस्वी व तरतरीत होती. तिच्या डोळ्यांच्या पापण्याचे केस अविरल होते. तिचे ओठ तोंडल्याप्रमाणे, कंबर बारिक व कंठ शंखाच्या आकाराचा होता. तिच्या अंगच्या शिरा मुळीच दिसत नसत. आणि तिचें मुख पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे आल्हादकारक होतें."[१]

स्त्रीत्वाच्या परिपूर्ण शारीरिक विकासाचें हें सुंदर चित्र व्यासांनी रेखाटलें आहे व द्रौपदीची अव्यक्त प्रतिमा वाचकांच्या समोर उभी केली आहे. मोरोपंतांना आपल्या विराटपर्वांत द्रौपदीच्या सौंदर्याचें वर्णन करण्याचा संकोच वाटला असावा. कारण त्यांनी हें आवश्यक वर्णन गाळलें आहे. शिष्ट वाङ्मयांत स्त्रीसौंदर्याचें वर्णन करणें पंतांना अनुचित वाटलें की काय, कोण जाणे! वस्तुतः व्यासांनी स्वतः केलेलें वर्णन, पंतांनी टाळण्याची कांही आवश्यकता, औचित्याच्या

१ नाचगुल्फा संहतोरुः त्रिगंभीरा षडुन्नता । रक्ता पंचसु रक्तेषु हंसगद्गदभाषिणी ॥
सुकेशी सुस्तनी श्यामा पीनश्रोणिपयोधरा । तेन तेनैव संपन्ना काश्मिरीव तुरंगमी ॥
अरालपक्ष्मनयना बिंबोष्ठी तनुमध्यमा । कंबुग्रीवा गूढशिरा पूर्णचंद्रनिभानना ॥

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीनेहि उत्पन्न झाली नव्हती. कीचकाने विषय-वासनायुक्त होऊन द्रौपदीच्या सौंदर्याचें केलेलें वर्णन मोरोपंतांनी 'त्याचीं आर्यांत गोष्टि न वदावी' असें म्हणून टाळलें, त्याचें समर्थन करतां येईल. पण व्यासांचा हेतु आणि कीचकाचा हेतु यांतील भेद लक्ष्यांत घेऊन तरी विराटपर्वाच्या प्रारंभींच आलेलें द्रौपदीचें वर्णन तिची भूमिका उठावदार करण्याच्या दृष्टीने आवश्यकच होतें. मुक्तेश्वर रसिक असूनहि त्याने हें आरंभींचें वर्णन टाळलें आहे आणि कीचकाने पुढे केलेलें वर्णन मात्र दिलें आहे. त्याला तें व्यासाप्रमाणे साधलेलें तर नाहीच, पण मोरोपंतांची औचित्याची दृष्टीहि त्याने दाखविली नाही, असें म्हणावें लागतें.

व्यासांची किंवा भारत-महाभारतकारांची दृष्टि याविषयीं पूर्णपणें निर्भय दिसते. कलेच्या साम्राज्यांत, इतर कोणत्याहि गोष्टींना प्राधान्य न देतां व्यक्तिचित्रण यथार्थ होण्याकरिता जें वर्णन करावें लागेल, तें निर्भयपणे व निःसंकोचपणे त्यांनी केलेलें आहे. कीचकाची भूमिका योग्य रीतीने रंगविण्याकरिता, द्रौपदी त्याला जशी दिसली व त्यामुळे ज्या भावना त्याच्या मनांत उत्पन्न झाल्या, त्यांचें वर्णन करतांना त्यांनी संकोच मानला नाही. मद्यपी, कामासक्त आणि विषयांध कीचक द्रौपदीला म्हणतोः—"हे शोभनगात्रि, तुझ्या भुवया सुंदर आहेत; तुझे डोळे पद्मपत्राप्रमाणे विशाल आहेत. आणि कोकिल कूजिताप्रमाणे तुझें भाषण गोड आहे; हारालंकारांना योग्य असणारे तुझे दोन्ही स्तन, पुष्ट, वर्तुळाकार आणि एकमेकांना चिकटलेले आहेत. हे सुभ्रू, कमलाच्या कळ्याप्रमाणे असणारे तुझे हे स्तन, मदनाच्या चाबुकाप्रमाणे माझ्यावर प्रहार करीत आहेत. आणि सरितेच्या दोन्ही भागीं पसरलेल्या वालुकाप्रदेशाप्रमाणे दिसणारा तुझा हा सुंदर जघनप्रदेश पाहून, असाध्य असा कामव्याधि मला व्यापून टाकीत आहे."[१]

व्यासांनी हें वर्णन निर्भयपणे व निःसंकोचपणे केलें, याचें कारण या विषयांध कीचकाला बुकलून ठार मारणाऱ्या व त्याच्या शरीराचा चेंदामेंदा करून मांसाचा गोळा बनविणाऱ्या भीमाची भैरव भूमिका आणि पत्नीच्या अपमानाचा बदला घेण्यास भीमाला प्रवृत्त करणाऱ्या द्रौपदीची तेजस्वी भूमिका, कीचकाच्या भूमिकेपेक्षाहि परिणामकारकरीतीने चित्रित करूं, असा त्यांना आत्मविश्वास होता. असें चित्रण-सामर्थ्य ज्यांना असेल त्यांनाच कलेच्या साम्राज्यांत दुष्ट आणि विषयांध लोकांच्या भूमिका निःसंकोचपणें रंगविण्याचा अधिकार आहे, हें उघड आहे.

द्रौपदीचें वर्णन करतांना व्यासांनी तिला काश्मीरी घोडीची उपमा दिली आहे. तसेंच, पुढे अर्जुनाच्या चालण्याचें वर्णन करतांना,—"अर्जुनस्य ऋषभतुल्य गामिनः":—बैलाप्रमाणे चालणारा अशी उपमा दिली आहे. स्त्रीला घोडीची आणि पुरुषाला बैलाची उपमा आज जर कोणी दिली तर तिचा अगदी विपरीत अर्थ होईल. औचित्याच्या कल्पनाहि कशा बदलतात, याचें हें उदाहरण आहे.

द्रौपदीसारख्या सुंदर स्त्रीरत्नाची अज्ञातवासांत काय व्यवस्था करावी, याचा विचार करीत असतां पांडवांनी जे उद्गार काढले आहेत त्यावरून भारतकालीं पत्नीचा दर्जा कोणता होता व पतिकडून तिला कशा रीतीची वागणूक मिळत असे तें लक्ष्यांत येतें:—"ही आमची प्रिय

---

१ नेत्रे सुविमुले सुभ्रु पद्मपत्रानिभे शुभे । वाक्यं ते चारुसर्वांगि परपुष्टरुतोपमम् ॥
हारालंकारयोग्यौ तु स्तनौ चोभौ सुशोभना । सुजातौ सहितौ लक्ष्म्या पीनौ वृत्तौ निरन्तरौ ॥
कुड्मलाम्बुरुहाकारौ तव सुभ्रु पयोधरौ । कामप्रतोदाविव मां तुदतश्चारुहासिनि ॥
दृष्ट्वैव चारुजघनं सरित्पुलिनसंनिभम् । कामव्याधिरसाध्यो मामप्याक्रमति भामिनि ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भार्या आमच्या प्राणापेक्षाहि श्रेष्ठ आहे. हिचे मातेप्रमाणें परिपालन केलें पाहिजे आणि वडील बहिणीप्रमाणे हिला मान दिला पाहिजे" या उद्गारांवरून, पत्नीचा दर्जा केवळ उपभोग्य वस्तु असा नसून पतीपेक्षाहि वरचा आहे. स्वतःच्या प्राणापेक्षाहि ती श्रेष्ठ असल्यामुळे प्रसंगीं स्वतःचे प्राण देऊनहि तिचें रक्षण केलें पाहिजे; कृतज्ञता बुद्धीने आईचें जसें आपण परिपालन करितों, तसें व त्याच बुद्धीने पत्नीचेंहि केलें पाहिजे व वडील बहिणीला जो मान आपण देतों, तोच मान पत्नीलाहि दिला पाहिजे; याची जाणीव पांडवांना झाली होती, असें दिसतें. कुटुंबांतील सर्व व्यक्तींच्या शरीरावरहि कुटुंब-प्रमुखाचें स्वामित्व त्या काळीं असल्यामुळे धर्माने बारा वर्षां-पूर्वी आपल्या भावाप्रमाणें, आपल्या पत्नीलाहि द्यूतांत पणाला लाविली होती. पण त्याबद्दल भीम हा धर्माचे हात जाळावयास निघाला होता व द्रौपदीने भर सभेंत, धर्माला पत्नी पणास लावण्याचा अधिकार आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावरून पतीची पत्नीवर सत्ता किती मर्यादेपर्यंत चालावी, हा प्रश्न भारत-कालींहि वादग्रस्तच होता, असें दिसतें.

द्रौपदीचें अपूर्व सौंदर्य पाहून तिला आश्रय देण्याविषयीं, सुदेष्णा ही साशंक झाली. ती म्हणतेः—"माझ्या घरांत जे हे वृक्ष आहेत, ते सुद्धा तुझ्या सौंदर्यापुढे नतमस्तक झाले आहेत, अशा स्थितींत कोणत्या पुरुषाला तूं मोह पाडणार नाहीस ?" वनस्पतिसृष्टी सुद्धा जिच्या सौंदर्याने मोहित होते तिचें सौंदर्य पुरुषाला भुरळ पाडील यांत काहीच नवल नाही. त्यामुळे द्रौपदीला पाहून विराटराजा आपल्याला सोडून तिलाच पट्टराणी करील, अशी धास्ती सुदेष्णाला वाटली.

आणि, सुदेष्णेची कल्पना तिच्या पतीच्या बाबतींत नाही, तरी तिच्या भावाच्या बाबतींत खरी ठरली. पतीवाचून एकटी हिंडणारी सौंदर्य-संपन्न स्त्री विषयी पुरुषांचें लक्ष्य होते, या नियमाला अनुसरून कीचकाचें लक्ष द्रौपदीकडे गेलें; आणि सामोपचाराने ती वश होत नाहीसें पाहून शेवटीं भर दरबारांत विराट राजाला आणि धर्म व भीम यांच्या देखत तिला लाथ मारून त्याने तिचा भयंकर अपमान केला! या अपमानाने, अत्यंत चिडून गेलेल्या सौंदर्यसंपन्न द्रौपदीची तेजस्विता व्यासांनी ओजस्वी रीतीने प्रकट केली आहे.

आपल्या देखत कीचकाने द्रौपदीला लत्ताप्रहार केला असतांही स्वस्थ बसणाऱ्या राजाची निर्भत्सना करून व तेथे बसलेल्या धर्म-भीमांना त्यांच्या पूर्वचरित्राची आठवण देऊन, "अशा पराक्रमी पतींच्या मानिनी पत्नीला आज भर सभेंत एका हलकट मनुष्याने लाथ मारावी"[३] या विषयीं खेद आणि संताप तिने पुनः पुनः व्यक्त केला. व "एके काळीं बलवान आणि पराक्रमी असणाऱ्या पांडवांचा क्रोध, पराक्रम व तेज आज कुठे नाहीसें झालें की ज्यामुळे आपल्या प्रिय आणि पवित्र पत्नीला एका दुष्टाने लाथ मारिली असतांहि ते नपुंसकाप्रमाणे ही गोष्ट सहन करीत आहेत." अशा शब्दांनी आपल्या पतींची शोभा करून ती राजसभेंतून निघून गेली. पण त्याच वेळीं कीचकाने केलेल्या अपमानाचा सूड घेण्याचा तिने निश्चय केला होता. कीचकाने तिला लाथ मारलेली पाहून संतप्त झालेल्या

१ इयं हिनः प्रिया भार्या प्राणेभ्योऽपि गरीयसी। मातेव परिपाल्याच पूज्या ज्येष्ठेवच स्वसा॥

२ वृक्षांश्चावस्थितान् पश्य य इमे मम वेश्मनि। तेऽपि त्वां सन्नमंतीव पुमांसं कं न मोहयेः॥

३ तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत्॥

४ क्व नु तेषां अमर्षश्च वीर्यं तेजश्च वर्तते। न परीप्संति ये भार्यां वध्यमानां दुरात्मना॥
कथं ते सूतपुत्रेण वध्यमानां प्रियां सतीम्। मर्षयन्ति यथा क्लीबाः बलवन्तः अमितौजसः॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भीमाला धर्मराजानें राजसभेंत आवरलें आणि ती गोष्ट विसरून जाऊन भीम आपल्या पाकशाळेंत स्वस्थ झोंपीं गेलेला जेव्हां द्रौपदीनें पाहिला तेव्हां तिला आश्चर्य वाटलें. कारण आपल्या अपमानाचा बदला घेईल, तर भीमच घेईल, अशी तिची अपेक्षा होती व म्हणूनच रात्रीं ती त्याच्याकडे आली होती. व्यासांनी हें वर्णन सुंदर उपमेनें केलें आहे. 'गहन अरण्यांत निद्रिस्त असणाऱ्या सिंहाला, सिंहिणीनें ज्याप्रमाणें उठवावें, त्याप्रमाणें भीमाला आपल्या बाहूंनी कवटाळून, व "मेल्याप्रमाणें निजलां काय, उठा" असें म्हणून द्रौपदीनें त्याला जागें केलें. यानंतरचें द्रौपदीचें भाषण, त्यांतील वाङ्मयगुणांनी आणि त्यांतील अर्थानें जगांतील सर्व श्रेष्ठ अक्षर वाङ्मयाला भूषणभूत होऊन राहील, अशा योग्यतेचें झालें आहे. तें शक्य तर मुळांतूनच संपूर्ण वाचलें पाहिजे. मोरोपंतांनी मराठींत त्याचा आशय, शैलीसहित उत्कृष्ट रीतीनें आणला असला, तरीहि व्यासांनी मुळांत लिहिलेल्या भाषणाची महति व गोडी कांहीं निराळीच आहे. त्यांतील फारच थोडा भाग येथे देतां येईल.

पांचहि पांडवांच्या पूर्व पराक्रमाचें व पूर्ण वैभवाचें वर्णन करून, त्यांना प्रस्तुतच्या स्थितींत पहातांना तिचें मन संतप्त होतें असें तिनें, भीमाला सांगितलें. "विराटाच्या सभेंत बसून, त्याला प्रिय वाटेल असें बोलणाऱ्या युधिष्ठिराला पाहून माझा संताप निःसंशयें वाढतो," असें म्हणून स्वतःच्या मनःस्थितीची व परिस्थितीची जाणीव पुढीलप्रमाणें तिनें भीमाला करून दिली आहे:--"मनुष्याचें कोणतेंहि कार्य सिद्धीला जाणें किंवा जय-पराजय प्राप्त होणें हें अनियमित आहे. वैभव आणि संकटें हीं एकामागून एक येत असतात हें लक्षांत घेऊन, माझे पति पुनः वैभवसंपन्न केव्हां होतील, याची मी वाट पाहात आहें... सागरपर्यंत पृथिवी जिच्या एके काळीं स्वाधीन होती, ती आज सुदेष्णेला भिकारी दासी झाली आहे! जिच्या पुढे व मागे सुंदर दासी चालत असत ती मी आज सुदेष्णेच्या पुढे मागे चालत आहें. आणि, गंध उगाळून उगाळून माझ्या हातांना, हे भीमा, घट्टे पडले आहेत, असें म्हणून तिनें आपले दोन्ही हात भीमाला दाखविले." तिचें एकंदर भाषण ऐकून व तिचे हात पाहून भीम एवढा धीराचा, पराक्रमी पुरुष पण तो सुद्धां लज्जित व दुःखित झाला "आणि स्वतःच्या बलाचा धिक्कार करून व तिचे घट्टे पडलेले कृश हात आपल्या तोंडावर घेऊन ढसढसां रडूं लागला.

भीमासारख्या शूर पुरुषाला रडावयास लावणें उचित न वाटल्यामुळे बहुधा या गोष्टींचा मोरोपंत-मुक्तेश्वरांनी निर्देश केला नसावा. पण पांडवांनी पत्नीविषयींचें कर्तव्य न केल्यामुळे, स्वतःला आजपर्यंत भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टांचें द्रौपदीनें केलेलें वर्णन इतकें परिणामकारक होतें की, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणून घट्टे पडलेले व वाळलेले हात जेव्हां तिनें भीमाच्या पुढे केले तेव्हां त्याचा धैर्यभेद ढासळून अतीव करुणेनें तो रडूं लागला असें स्वाभाविक पर्यवसान दाखविण्यांत औचित्य आणि रसोत्कर्ष या दोन्ही गोष्टी व्यासांनी साधल्या आहेत. या कारुण्याच्या पार्श्वभूमीवर पुढील भीमकृतींतील वीर आणि रौद्र रसाचा अविष्कार उठावदार झाला आहे.

पति म्हणून आणि क्षात्रिय म्हणूनहि कीचकाला देहान्तप्रायश्चित देणें अवश्यक आहे असें

---

१ बाहुभ्यां परिरभ्यैनं प्राबोधयदनिन्दिता । सिंहं सुप्तं वने दुर्गे मृगराजवधूरिव ॥
उत्तिष्ठोत्तिष्ठ किं शेषे भीमसेन यथा मृतः ॥
("निजलां काय मृतापरि, जागे व्हा, सिंहसे उठा--" मोरोपंत)

२ सदस्यं समुपासीनं परस्य प्रियवादिनम् । दृष्ट्वा युधिष्ठिरं कोपो वर्धते माम् असंशयम् ॥

३ अनित्या किल मर्त्यानाम् अर्थसिद्धिर्जयाजयौ । इति कृत्वा प्रतीक्षामि भर्तृणाम् उदयं पुनः ॥
चक्रवत् परिवर्तन्ते ह्यर्थाश्च व्यसनानि च इति कृत्वा प्रतीक्षामि भर्तृणाम् उदयं पुनः ॥
यस्याः सागरपर्यन्ता पृथिवी वशवर्तिनी । आसीत्साद्य सुदेष्णायाः भीताहं वशवर्तिनी ॥
यस्याः पुरस्सरा आसन् पृष्ठतश्चानुगामिनः साहमद्य सुदेष्णायाः पुरःपश्चाच्च गामिनी ॥
पश्य कौंतेय पाणी मे नैवाभूतां हि यौ पुरा । इत्यस्य दर्शयामास किणबद्धौ कराबुभौ ॥

४ धिगस्तु मे बाहुबलं गांडीवं फाल्गुनस्य च । यत्ते रक्तौ पुरा भूत्वा पाणी कृतकिणाविमौ ॥
ततस्तस्या करौ सूक्ष्मौ किणबद्धौ वृकोदरः । मुखमानीय वै पत्न्या रुरोद परवीरहा ॥

द्रौपदीने भीमाला पटवून दिलें. ती म्हणते:– "भार्येचें रक्षण केल्यामुळे संततीचें रक्षण होते. संततीचें रक्षण म्हणजे आपलेंच रक्षण आहे कारण संततीच्या रूपाने पति स्वतःच पत्नीच्या ठिकाणीं पुनः जन्मतो; म्हणून तिला 'जाया' असें म्हणतात१. शिवाय "क्षत्रिय या नात्यानेहि शत्रूचा निःपात करणें हाच तुझा सनातन धर्म आहे." "म्हणून कामाने उन्मत झालेल्या कीचकाला एखादा कुंभ दगडावर आपटून फोडावा तसा तूं ठार मार." "माझ्या अनेक आपत्तींना कारण झालेल्या कीचकाला, उद्यांचा सूर्य जर जीवंत पाहील, तर मी विषप्राशन करून तुझ्यासमोर जीव देईन. कीचकाला वश होण्यापेक्षा तुझ्यासमोर जीव देणेंच श्रेयस्कर४."

द्रौपदीची शारीरिक व मानसिक स्थिति तिने दिलेली कर्तव्याची जाणीव व तिचा निश्चय हीं पाहून व ऐकून भीमाला आवेश उत्पन्न झाला. आणि, त्याने कीचक–उपकीचकांचा वध केला. द्रौपदीला प्रिय असलेलें हें कार्य करून परत आलेला भीम "एखाद्या मदमस्त हत्तीप्रमाणें महानसाच्या दारात उभा असलेला जेव्हा द्रौपदीने पाहिला, तेव्हा हळूच हसून व खूण करून त्याला ती म्हणाली—"ज्या गंधर्वराजाने मला संकटमुक्त केलें त्याला नमस्कार५ असो." भीमाचा व तिचा पतिपत्नीचा संबंध प्रकट न करितां अप्रत्यक्षपणे तिने केलेलें हें स्वागत भीमाला किती आनंददायक व धन्यतादायक झालें असेल बरें! याच्या उलट बृहन्नडेने जेव्हा द्रौपदीच्या क्षेमकुशलाची चौकशी केली, तेव्हा ती म्हणाली:– "बृहन्नडे, कन्यांच्या अन्तःपुरांत सुखेनैव राहणाऱ्या तुला, सैरंध्रीचें काय झालें, याची चौकशी कशाला६?" द्रौपदीच्या या खोचदार उत्तराने अर्जुनाला किती वाईट वाटलें असेल! नपुंसकवृत्ति धारण करून स्त्रियांच्या व पत्नीच्या संरक्षणाचें कार्य सोडून देऊन, नृत्यगायनादि कलांमध्ये दंग असणाऱ्या कर्तव्यच्युत पौरुषहीनांना द्रौपदीने दिलेला टोमणा अन्वर्थक नाही, असें कोण म्हणेल? भीम आणि अर्जुन यांना उद्देशून द्रौपदीने उच्चारलेल्या या लहान लहान वाक्यांत केवढा अर्थ व केवढें सामर्थ्य भरलें आहे, हें ज्यांच्या लक्ष्यांत येईल त्यांना व्यासांच्या अपूर्व प्रतिभेची व कलाकुशलतेची जाणीव होईल.

द्रौपदीच्या रूपाने व्यासांनी आदर्श स्त्रीचें व पत्नीचें चित्र निर्माण केलें आहे. कुटुंबांत पत्नीचा आणि समाजांत स्त्रीचा दर्जा किती मोठा आहे याची जाणीव द्रौपदीच्या चित्राने त्यांना निर्माण करावयाची आहे. पत्नींचें व स्त्रियांचें संरक्षण हें अत्यंत महत्त्वाचें असें पतींचें व पुरुषांचें कर्तव्य आहे, असें त्यांना सांगावयाचें आहे. पत्नी ही वंशाची आणि स्त्री ही समाजाची प्रतिष्ठा आहे. वंश आणि राष्ट्र त्यांच्यामुळे जगतात आणि वाढतात. त्यांचें संरक्षण करण्याला आणि त्यांची जे अप्रतिष्ठा करतील त्यांना शासन करण्याला पुरुषांनी सदैव सिद्ध असलें पाहिजे. ज्यांच्यांत असें सामर्थ्य नाही, त्यांनी वैवाहिक जबाबदारी पत्करूं नये!

स्त्री हे नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां पाणी
धर्मेचार्थेच असें वदलां, कां प्रथम जोडितां पाणी ॥

असें मोरोपंतांनी द्रौपदीकडून भीमाला विचारविलें आहे, तें यथार्थ आहे. राष्ट्रांतील पुरुष जेव्हा दास्य स्वीकारतात, आणि पौरुषहीन होऊन नाचगाण्यांत दंग होतात, तेव्हा कीचकासारखे सैनिक व सेनापति राष्ट्रांतील स्त्रियांची अप्रतिष्ठा करतात, हें व्यासांना सांगावयाचें आहे. अग्नींतून निर्माण झालेले व अग्निज्वालेप्रमाणे तेजस्वी असणारी द्रौपदी ही भारतीय स्त्रीची प्रतिनिधी आणि प्रतीक झाली आहे व ती आजहि

"निजलां काय मृतांपरि, जागे व्हा सिंहसे उठा!"

असें भारतवर्षातील पुरुषांना म्हणत आहे!

---

१ भार्यायां रक्ष्यमाणायां प्रजा भवति रक्षिता। प्रजायां रक्ष्यमाणायां आत्मा भवति रक्षितः ॥
आत्मा हि जायते तस्यां तेन जाया विदुर्बुधाः ॥
२ क्षत्रियस्य सदा धर्मो नान्यः शत्रुनिबर्हणात् ॥ ३ तमेवं कामसंमत्तं भिन्धि कुंभमिवाश्मनि ॥
४ यो निमित्तं अनार्थानाम् बहूनाम् मम भारत ॥ तंचेज्जीवन्तमादित्यः प्रातरभ्युदयिष्यति ॥
विषमालोड्य पास्यामि मा कीचकवंशागमम् श्रेयो हि मरणं मह्यं भीमसेन तवाग्रतः ॥
५ ततो महानसे द्वारि भीमसेनमवस्थितम्। ददर्श राजन् पांचाली यथा मत्तं महाद्विपम् ॥
तं विस्मयन्ती शनकैः संज्ञाभिरिदमब्रवीत्। गंधर्वराजाय नमो येनास्मि परिमोचिता ॥
६ बृहन्नले किंतु तव सैरंध्र्या कार्यमत्र वै। या त्वं वससि कल्याणि सदा कन्यापुरे सुखम् ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# पादाकुलक वृत्तविचार

वि. ज. सहस्रबुद्धे

'पद्यमीमांसा' पुस्तकाचे कर्ते रा. तात्याबुवा सहस्रबुद्धे हे छंदःशास्त्राचे मार्मिक अभ्यासक आहेत. त्यांचा प्रस्तुत लेख तज्ज्ञांस विचारणीय वाटेल.

कांहीं महिन्यापूर्वी हिंदी 'छंदःप्रभाकर' ग्रंथ वाचून पाहिला. तेव्हा त्यांतील 'पादाकुलक' या मात्रा-वृत्ताचें लक्षण भिन्न प्रकारचें दिसून आल्याने चिंतनीय वाटलें म्हणून त्याबद्दलच येथे थोडा विचार मांडावयाचा आहे.

सदर ग्रंथांत 'पादाकुलक' या मात्रिक छंदाचें लक्षण खालीलप्रमाणे दिलें आहे—

"जिसके प्रत्येक पाद में चार चार चौकल हो, उसे पादाकुलक कहते हैं।"

या लक्षणाची स्पष्टता करण्याकरतां मुद्दाम एक चुकीचें उदाहरण दाखविलें आहे, तें असें—

"राम नाम बिन गिरा न सो है"

या चरणांतील 'राम नाम' या शब्दांचे चतुर्मात्रिक गण पडूं शकत नाहीत व म्हणून हा चरण पादाकुलकाचा म्हणतां येत नाही, असा अभिप्राय देऊन ठेविला आहे.

पुढे पुनः असेंही म्हटलें आहे की,

"जब तक चारों चरणों में चार चार चौकल न मिले, तब तक वह छंद पादाकुलक नहीं कहा जा सकता। उसे चौपाई ही जानो।"

हा मजकूर वाचल्यानंतर साहजिक माझें लक्ष्य मराठी छंदःशास्त्राकडे गेलें. पादाकुलक जातीबद्दल विशेष विचार प्रो. पटवर्धन यांच्या छंदोरचनेंत असेल म्हणून मी 'छंदोरचनें'तील पादाकुलकाचें लक्षण पाहिलें. तेव्हा

[ पादाकुलक ( प । प ) १६ मात्रा ]

असें लक्षण आढळून आलें. 'प' या चिन्हावरून चतुर्मात्रिकच गण असले पाहिजेत, असें ठरत नाही व तशी अपेक्षाही दिसत नाही. कारण जीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं चतुर्मात्रिकच गण पडणारीं नाहीत. कसें तें पहा—

**हीन दीन** मी ब्राह्मण विधवा
तृणसम जन मज टाकि जणुं शवा
**वासना-भुतें** भिवविति जीवा
'छंदोरचना', पान ३९०

**चला आज हा** आला दसरा
पाउल पुढतें टाकायाला
'पद्यप्रकाश', पान ७६

वरील चरणांतील जाड ठशांतील शब्दांचे चतुर्मात्रिक गण पडत नाहीत, हें सहज दिसून येणार आहे. वरील चरण पादाकुलकाचे म्हणून प्रो० पटवर्धन यांना मान्य झाले आहेत. परंतु हिंदी 'छंदःप्रभाकरा'च्या मतें हे चरण निषिद्ध ठरणारे आहेत.

प्रो. पटवर्धन यांनी लक्षणासंबंधीं व नांवासंबंधीं इतरत्र पुष्कळ चिकित्सा केली आहे. अर्थात ते सूक्ष्म भेदाकडे लक्ष देऊं शकतात व तसें त्यांनी इतरत्र लक्ष दिलेलेंहि आहे. परंतु पादाकुलकाकडे त्यांचें लक्ष गेलेलें दिसत नाही.

'छंदोरचने'शिवाय इतर कोठे कांही माहिती मिळते कां, म्हणून शोध केला. कै. गणेशशास्त्री लेले कृत 'साहित्यशास्त्र' नांवाचें पुस्तक मिळालें, त्यांत पान १४९ मध्ये पादाकुलकाबद्दल खुलासा आहे, तो 'मात्रासमक' या वृत्ताच्या लक्षणाच्या पोटीं आला आहे.

मात्रासमकाचें लक्षण असें:—

"याचे चार चरण असतात व प्रत्येक चरणांत सोळा मात्रा असतात. हा मात्रा-छंद असल्याने चार चार मात्रांचा एकेक गण या मानाने चार गणांनी सोळा मात्रांची भरती होते. याचे पांच प्रकार शुद्ध असून सहावा मिश्रित आहे. त्या सहाव्या प्रकाराचें नांव पादाकुलक होय."



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हें लक्षण हिंदी 'छंदःप्रभाकरा'प्रमाणेच आहे. याची वरींच उदाहरणें लेले शास्त्री यांनी दिलीं आहेत. त्या सर्वांमध्ये चतुर्मात्रिकच गण सर्वत्र दिसून येतात. श्री शंकराचार्यांचें 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' हें स्तोत्र पादाकुलकामधीलच आहे.

कै. गोडबोले यांच्या 'वृत्त-दर्पणांत' पादाकुलकाचें लक्षण दिलें आहे. पण त्यांत चतुर्मात्रिक गणाची आवश्यकता मानली नाही. फक्त यति आठव्या मात्रेवर असतो, एवढें जास्त सांगून ठेविलें आहे. ('वृत्तदर्पण', पान ५२।५३)

प्रो. पटवर्धन यांनी हिंदी 'छंदःप्रभाकर' ग्रंथ पाहिलेला होता, असें त्यांच्या 'छंदोरचने'-वरून दिसतें. परंतु पादाकुलकाच्या लक्षणांतील हा सूक्ष्म भेद त्यांच्या दृष्टीला कसा आला नाही ? दृष्टीस पडूनही कदाचित् त्यांना तो महत्त्वाचा वाटला नसण्याचा संभव आहे. कसेंही असलें, तरी मला ही शंका विचारवन्त लोकांपुढे चर्चेसाठी ठेवावीशी वाटते.

याबद्दल माझें मत असें आहे की, हिंदी 'छंदः प्रभाकरा'चें लक्षण हें अधिक शुद्ध ठरत असेल व त्याला प्राचीन परंपरेचा आधार असेल, तर 'छंदोरचनें'तील लक्षण सदोष समजावें. पूर्वीची पारिभाषिक संज्ञा वापरावयाची असेल, तर त्याचें लक्षणही पूर्वीचेंच स्वीकारणें भाग आहे. प्रो. पटवर्धन यांच्या मताप्रमाणे रचना असावयास हरकत नाही, असें कोणी म्हणतील, तर त्यावर उत्तर एवढेंच की, निदान त्या जातीला पादाकुलक असें म्हणूं नका. दुसरें एखादें नवें नांव द्या, म्हणजे नांवामुळे घोटाळा उत्पन्न होणार नाही. प्रो. पटवर्धन यांनी अशीं नवीं नांवें अनेक निर्मिलीं आहेत, तेव्हा तशी हरकत घेण्याचें कारण नाही.

आता आणखी एक शंका येते, तीही विचारार्थ पुढे ठेवितों:—

१ रातराणिचा परिमल सुमधुर
२ करी मनींचा विषाद दूर ऽ
'पद्य प्रकाश', पान २५
३ पवन वाहतां तरु-शिखरावर
४ जेविं थरारे तांबुस मोहर
५ कंपित होई त्यापरि अधर ऽ
'छंदोरचना', पान ४६६

हे चरण पादाकुलकाचे आहेत. प्रत्येक चरणांत सोळा मात्रांचीं भरपूर अक्षरें असावयास पाहिजेत. परंतु चरण दुसरा व चरण पांचवा यामध्ये पंधरा मात्रा प्रत्यक्ष भरतील, एवढींच अक्षरें आहेत.* सोळावी मात्रा चरणाच्या शेवटचा 'अ' कार दीर्घ समजून किंवा दीर्घ उच्चारून भरून काढावयाची आहे; व तें दर्शविण्यासाठीच शेवटच्या अक्षरापुढे ऽ असें अवग्रह चिन्हही देऊन ठेविलें आहे. माझ्या समजुतीला हें चूक वाटतें.† कारण वरील पद्धतीने सदर दोन चरण म्हणून पाहिले, तर तें कानाला कटु लागतें. शिवाय म्हणण्याला अडचणीहि होत आहे. वाचकांनी या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहावा, म्हणजे त्यांना कळून येईल. जेथे मात्रा भरून काढावयाच्या असतात, तेथे गुरु अक्षरच पाहिजे, असा सामान्य नियम आहे. चरणाच्या अंतर्गत ठिकाणीं हा नियम निरपवादपणें पाळला जातो, असें दिसून येईल. अर्थात् तोच नियम चरणान्त्य ठिकाणाला लागू व्हावा, हें इष्ट होय. आता चरणान्तीं अकारच ठेवावयाचा असेल, तर जी मात्रा किंवा ज्या मात्रा भरून काढावयाच्या त्या उपान्त्य अक्षरावर भरून काढतां येतील. मात्र त्यासाठी उपान्त्य अक्षर गुरु असावें लागेल ('पद्य प्रकाश' पान ७८), असा वरील अडचणीवर उपाय सुचवितां येईल. तरी पण हा उपाय सर्वच ठिकाणीं कितपत लागूं पडेल, याबद्दल मोठी शंका आहे. शेवटच्या अक्षरावर मात्रा भरून काढावयाच्या असतील, तर तेथे दीर्घ स्वरच असावा, हा उत्तम मार्ग होय, असें मला वाटतें.

वर दिलेला पांचवा चरण
कंपित होई त्यापरि अधर ऽ

* पंधराच मात्रा भरतील अशीं अक्षरें असणारे पापाकुलकाचे चरण इतरत्र अनेक कवितांमधून आढळून येतात. मात्र त्यांचें प्रमाण कमी आहे.

† पहा : "पादाकुलाच्या अन्तीं आवर्तन पूर्ण होत असल्यामुळे तेथे एकाही मात्रेचा विराम घ्यावयाला कूस नसते." ('छंदोरचना', पा. ३४५)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांत कमी पडणारी एक मात्रा उपान्त्य अक्षरावरही भरून काढण्यास अडचणच आहे. कारण उपान्त्य अक्षर 'ध' हें दीर्घ स्वरयुक्त नाही. म्हणून पांचवा चरण सर्वंच दृष्टीने अशुद्ध ठरतो.

असो–माझी भूमिका शोधकाची व जिज्ञासूची आहे. इतक्या सूक्ष्म चर्चेत शिरल्याबद्दल कित्येकांना इष्ट वाटणार नाही. परंतु शास्त्रीय विषयांत असा आक्षेप घेणें शास्त्राच्या प्रगतीला बाधक ठरेल, इतकेंच मी म्हणेन. या माझ्या म्हणण्याचा तज्ज्ञांकडून विचार व्हावा, अशीच माझी अपेक्षा आहे.

---

# इक्बालचा काव्यकलाप

वसंत अनंत शहाणे, बी. ए., एलएल. बी.

## इक्बालची ओजस्विता

"उठो! मेरी दुनिया के गरीबों को जगा दो!
काखे–उमरा के दरो-दिवार हिला दो !
जिस खेत से दहकाँ को मयसर नहीं रोजी
उस खेत के हर खुशे-गंदुम को जला दो!!"

(अनुवाद : "उठा! माझ्या जगांतल्या गरीबांना जागृत करा! उमरावांच्या राजवाड्यांच्या तटांच्या भिंती हालवून सोडा! ज्या शेतापासून शेतकऱ्याला पोटभर खायला मिळत नाही, त्या शेतांतला गव्हाचा दाणा न् दाणा जाळून टाका!)

याच कवितेचें विस्तृत इंग्रजी भाषांतरः—

"Arise and awake the poor of my world,
Shake up the very foundations of the palaces of the rich
Warm the blood of slaves with life-giving faith—
Give the humble sparrow strength to fight the falcon!
Burn (away) every corn of wheat in that field,
Which does not provide sustenance to the cultivator.
(Modern civilisation is but a glass-blower's work-house
Teach madness to the poet of the East so that he may smash it.)
"*Lenin*"

## इक्बालची अस्मिता

इक्बालने भारतीयांना दिलेला संदेश कवीच्या अस्मितेच्या प्रखर भावनेवर प्रकाश पाडतो. तो मूळ इंग्रजींत उद्धृत करण्याचा मोह अनावर होतो.

इक्बाल बोलतात : "You have learnt and amassed the knowledge of others and brightened your face with rouge borrowed from others. I do not know whether you are yourself or another. Your intellect is chained in the thoughts of others; the very breath in your throat comes from the strings of others. Borrowed speeches are on your tongue and borrowed desires in your heart. Your canaries sing borrowed songs; your cypresses are clad in borrowed mantles, the wine in your cup you get from others, the cup itself you borrow from others. You are a Sun; look for once into your own self and purchase not your light from the stars of others. How long will you dance around the candle of the assembly? Burn in your own light if you have a heart."

## इक्बालची उत्कृष्ट उपमा

इक्बालच्या कल्पना जितक्या मनोरम, तितक्याच व्यवहारांतल्या व सर्वानुभूत असतात. शिशिराच्या आगमनाची बहार पाहा! एखाद्या निद्रित बालकाच्या हातून रंगीत खेळणीं गळून पडावीं, तद्वत्, शिशिर येतांच फुलांच्या पाकळ्या गळून पडूं लागल्या.

"पत्तियाँ फूलों की गिरती हैं
खिजाँ (शिशिर) में इस तरह।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दस्ते-तिफ्ले-खफ्ता से
रंगीं खिलोने जिस तरह !"

### शब्दशूर कवि, कृतिशूर नव्हे

रामदासांनी म्हटलें आहे. 'आधी केलें, मग सांगितलें.' पण इक्बालने स्वतः म्हटल्या-प्रमाणे कवि मोठा उपदेशक खरा, पण केवळ वाणीचा उद्गाता ठरला, कृति करणारा ठरला नाही ! "आपल्या धर्मातल्या तत्त्वांनी उत्स्फूर्त होऊन रात्र रात्र खपून त्यांनी मशीद तर बांधून काढली, पण त्यांचं मन जें पापी होतं, तें नमाजी होऊं शकलं नाही !"

"मसजिद तो बनाई शब (रात्र) भर में
ईमां (धर्मतत्त्व) की हरारत (उष्णता) वालोंने
मन अपना पुराना पापी था,
बरसों में नमाजी बन न सका
इक्बाल बडा उपदेशक है,
मन बातों में मोह लेता है,
गुफ्तार (वाणी) का गाजी बन तो गया,
करदार (कृति) का गाजी बन न सका !"

### इक्बालचें आत्मसंशोधन

"ढूँढता फिरता हूँ ऐ इक्बाल ! अपने आप को
आप ही गोया मुसाफिर ! आप ही मंजिल हूँ मैं !"

(अनुवादः "इक्बाल आपल्यालाच शोधीत हिंडत आहे ! इक्बाल स्वतःच मुसाफिर आहे ! आणि इक्बाल स्वतःच आपलं इच्छित स्थळ आहे !)

### इक्बालचें स्वातंत्र्य-संशोधन

"कैद में आया तो हासिल मुझको आझादी हुई
दिल के लूट जाने से मेरे घर की आबादी हुई।

(अनुवादः "मी कारागृहांत आलों, तोंच मला स्वतंत्रता लाभली. माझ्या हृदयाची लूट झाल्यामुळेच माझें घर आबाद झालें !")

इक्बालचा हा 'काव्यकलाप' मनाला भुरळ पाडणारा नाही, असें कोण म्हणेल ?

---

## आळ

**गो. रा. दोडके, बी. ए.**

**रा. दोडके यांची ही स्वतंत्र कथा बालमनाचे पापुद्रे हलक्या हाताने उलगडून दाखविते. ही कथा आबालवृद्धांस आवडेल, अशी खात्री आहे.**

आप्पांची हाक ऐकतांच माधवचा जीव खालीवर होऊं लागला. त्याला कांही कळेना. इतका करडेपणा, उग्रपणा त्यांच्या शब्दांत कां यावा ? त्यांना राग येण्यासारखं तर आपण कांहीच केलं नाही. मग आपल्याला हाक मारतांना इतका कठोरपणा त्यांच्या आवाजांत का दिसावा ? तो माडीवर एकीकडे अभ्यास करीत बसला होता. त्याला वाटलं, कांही विपरीत प्रकार आपल्याला माहीत नसेल. आधी माईला विचारून घ्यावं आणि मग आप्पांकडे जावं या विचारानं जिना उतरल्यावर तो स्वयंपाकघराकडे वळला. त्याने माईला हाक मारली, विचारलं, "कांही झालंय का ग ? आप्पा रागावले ?"

"का तुला कांही म्हणाले ?"

"नाही मला त्यांनी नुसती हाक मारली, पण आवाजांत रोष दिसतोय म्हणून तुला आधी विचारून घेतलं."

"नाही बाबा, मला तर कांहीच माहीत नाही."

त्याने आपली पावलें वळविलीं. व आप्पां-समोर जाऊन उभा राहिला. माधवची नजर भ्यालेली होती. आप्पांच्या डोळ्याशीं डोळा देणें त्याला शक्य नव्हतें. आप्पा लिहीत असल्यामुळे त्यांची नजर खाली होती. त्याने त्यांच्याकडे पाहून घेतलें. त्यांच्या मुखावर राग स्पष्ट दिसून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येत होता. लिहिणें घाईघाईने चाललें होतें. आणि शब्दाशब्दाची खोडाखोड होत होती. जणू काय राग लिहिलेल्या शब्दांवर निघत होता. या शब्दां- प्रमाणेच कदाचित् आपली गत होईल, हा विचार त्याच्या मनांत येऊन गेला. एकंदर प्रकार पाहून त्याला एवढं कळून आलं, कांहीना कांही तरी आप्पांचं बिनसलंय आणि जिथं बिनसलं आहे तिथं कांही राग काढतां येत नाही. कुणावर तरी तो आता निघणार आणि मीच त्यांच्या रागाला बहुधा बळी पडणार. तेवढ्यांत त्याने आपलें मन तयार केलें. कसाहि प्रसंग प्राप्त झाला तरी निमूटपणें सहन करण्याचा निश्चय केला. आप्पांनी आपलें लिहिणें थांबविलें व मान वर केली. ते म्हणाले, "आलास तूं ? माझ्या पेनमध्ये शाई भर बरें. किंवा असूं दे, परवा तुला पेन दिली ना, तीच आण."

माधवने अपेक्षा केली होती. तीहून वेगळा प्रकार घडून आला. त्याला वाटलं, सुखानं निभा- वतं आहे सगळं, फार झालं तर, पत्र टपालपेटींत टाकायला सांगतील, किंवा आणखी कुणाकडे पोचवून द्यायला सांगतील. मनावरचें दडपण बरेंच हलकें झालें. त्याच मनःस्थितींत तो माईकडे आला. कुतूहलाने तिने विचारलें, "काय झालं रे ?"

"कांही नाही, आप्पांना माझी पेन पाहिजे आहे लिहायला"

"किल्ल्या खुंटीला टांगल्या आहेत."

चारपांच दिवस झाले असतील, आप्पांनी माधवला एक झरणी बक्षीस दिली होती. लहान मुलांच्या हातांत ती लागूं नये, व मोलाची वस्तू म्हणून आईने त्याला कुलूप दिलें होतें. आपल्या लांकडी फडताळांत पेन ठेवून माधवने त्याला कुलूप घातलें होतें. माधवने खुंटीवरच्या किल्या घेतल्या. फडताळाजवळ जाऊन त्याने तें उघडलें. आणि, पेन त्याने ठेवली होती तेथे तो बघूं लागला. पण त्याच्या बोटांना पेनचा स्पर्श झाला नाही ! तो चपापला. आपल्याशींच म्हणाला, "अरे, इथंच तर ठेवली होती मी पेन." आणि, कप्पा शोधायला आरंभ केला. त्याच्या कानावर लगेच शब्द येऊन आदळले, "अरे, आणना पेन."

"आणतों, आप्पा," त्याने धीराने शब्द उच्चारले व तो कप्पा शोधूं लागला. पण त्याच्या दुर्दैवाने आज त्याचा अंत पाहावयाचा निश्चय केला होता. त्याने दुसरा कप्पा शोधला. तिसरा शोधला, कोटाचे खिसे चाचपून पाहिले. लहान लहान बहीणभाऊ दिसले, त्यांनाहि त्याने हलक्या आवाजांत भीतभीत विचारून घेतलें. माईलाहि "पेन कुठं पाहिलीस का ग ?" म्हणून रडकुंडीला आलेल्या आवाजांत विचारलें. परंतु पेनसंबंधी कांहीच माहिती मिळाली नाही. पुनः आप्पांचे शब्द ऐकूं आले, "काय रे ? का नाही आणीत पेन ? बाजारांत विकली की काय ? चल इकडे ये माधव, ये म्हणतोना !"

माधवला त्यांच्यासमोर जाणें अशक्य झालें. तो होता तेथेच उभा राहिला. पुन्हा गर्जना कानावर आली, "अरे, ये म्हणतोना," लगेच खुर्ची मागे ओढल्याचा आवाज आला. लगेच आप्पांची स्वारी त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. लहान लहान मुलेंहि दाराजवळ आलीं. माईहि स्वयंपाकघराच्या दारांतून चाललेल्या प्रकाराकडे बघूं लागली. माधवचा जीव चिमून गेला ! कानाच्या पाळ्या लालीलाल झाल्या. कपाळ ओलें- चिंब झालें. तो थरथर कापूं लागला. लहान लहान बहीणभावांसमोर आता आपली अप्रतिष्ठा होणार, या विचाराने त्याच्या अंतःकरणांत घृणा उसळून आली ! मोठेपणाचा अधिकार तो ज्यांच्यावर गाजवी, तींच आता त्याला हसतील, चिडवतील, याचें त्याला वाईट वाटूं लागलें. परंतु या सगळ्या प्रसंगांतून त्याला सुटायला कोणताच मार्ग नव्हता. पेन सापडत नव्हती. एका क्षणांत त्याच्या मनांत येऊन गेलें. आपल्याला पेन सापडावी; कुणा लहान भावंडानं धावत यावं आणि म्हणावं, "ही बघ पेन :" माईकडे कांही बायका बसायला याव्या : आप्पांकडे कांही पक्षकार यावे आणि त्यांनी घासाघीस न करतां आप्पांना भरभक्कम फी द्यावी. पण त्याची एकहि इच्छा पूर्ण झाली नाही.

"कुठं आहे परवां दिलेली पेन ?" आप्पांनी गडगडाट केला आणि लगेच माधवचा कान धरला. त्याचे पाय थरथर कापायला लागले. उभें तरी राहतां येईल की नाही आपल्याला, याविषयीं- हि तो साशंक झाला.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"बोलना, मढयासारखा उभा का राहिलास ?" दुसराहि कान त्यांनी बोटाच्या चिमटींत धरला व चुरगळायला आरंभ केला. आप्पांच्या पाठीमागे उभी असलेल्या मिरेने "म्याऊं, म्याऊं" चा अभिनय करून दाखविला. त्याला मेल्यापेक्षाहि मेल्यासारखें झालें. आप्पांच्या हातांतून सुटल्यावर मिरेचा सूड घ्यावयाचा त्याने ठरविलें. परंतु यासंबंधीं फार वेळ त्याला विचार करतां आला नाही. त्याला अवसर कुठे होता ? आप्पांनी विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देणें भाग होतें. पण तें देणें त्याला साधेना. जिव्हेंतलें त्राण हरपलें होतें. ओठ थरथर कापत होते. "काय केलंस पेनचं ? " त्याला प्रश्न झाला आणि लगेच गालावर चापट बसली. त्याचे कान झणाणले व डोळयापुढे काजवे चमकले. त्याने हात गालावर घेण्याचा प्रयत्न केला पण आप्पांनी त्याचे दोन्ही हात आपल्या एका मुठींत आवळून धरले. आणि, फाडफाड त्याच्या गालावर चापटा मारूं लागले. शेवटीं त्यांनाच मारण्याचा त्रास आला. त्याचा हात सोडून दिला. त्याला बोलण्याला अवसर द्यायचें ठरविलें. व नरम आवाजाने प्रश्न विचारायला आरंभ केला. "कुठं ठेवली होती पेन ?"

त्याने डोळयांतील आसवें पुसत, हुंदके देत, गाल चोळीत फडताळांतील कप्प्यांकडे अंगुलिनिर्देश केला. आप्पांनी आपल्या हाताने फडताळ उसकटून पाहिलें. त्यांना पेन आढळून आली नाही. सुडाची भावना आता ओसरली होती. राग कायम होता, परंतु त्यांतील तीव्रपणा नाहीसा झाला होता. ते उद्गारले, "इथं दिसत नाही. गेली कुठं मग ?"

माधवने कांहीच उत्तर दिलें नाही.

" कुणाला दिलीस तूं ? "

" नाही. "

" मग काय विकलीस ? " या प्रश्नाचा माधवला अतिशय संताप आला. बाप झाला म्हणून काय झालं ? मुलाविषयीं असा संशय घेणं तरी चांगलं कां ? एकाएकीं त्याला वाटलं, आपण उसळून म्हणावं, " हो, हो विकली. आणि त्या गंगाबाईच्या रघ्याप्रमाणें नाटक सिनेमा पाहायला गेलों होतों. " पण मनापेक्षा वाणी जास्त संयमी होती. तिने मनाची इच्छा पूर्ण केली नाही. तो शांत राहिला.

" हे बघ, माधव सायंकाळीं कोर्टांतून येण्याच्या आंत पेन आणून ठेव. न आणलीस तर तुझ्या पाठीचीं सालटीं काढल्याशिवाय राहणार नाही. चांगला फोडून काढीन. कुठं ठेविली असेल तर घेऊन ये. कुणाला दिली असेल, तर मागून आण. नंतर त्यांनी दीर्घ श्वास घेतला आणि पुनः बोलायला सुरवात केली. मरसतोंवर मारीन. मग आई रडेल, गयावया करील; हातापायां पडेल,— कांहीएक मी ऐकणार नाही. ध्यानांत ठेव. " दरडावणी दाखवून आप्पा निघून गेले. ते जातांच माई त्याच्याजवळ आली. तिने मायेनें, रागावून, दरडावून, भीति दाखवून, लालूच दाखवून, पेनविषयीं विचारलें. पण त्याच्या उत्तरांत मुळीहि फरक झाला नाही. त्याने तिला एकदा सांगून टाकलें, "आई मी इथं ठेवली होती, नाही दिसत ती, आणखी काय सांगूं ? " माईची मध्यस्थी फुकट गेली. तासादोन तासाने सगळें स्थिरस्थावर झालें. आप्पा कोर्टांत निघून गेले होते. माई स्वयंपाकघरांत आवराआवर करीत होती. माधवच्या मनांतील विषण्णता मावळली होती. गोंधळलेलें मन शांत झालें होतें. कसाहि प्रसंगाला तोंड देण्याची त्याची तयारी झालेली असल्यामुळे त्याचें मन बेफिकीर झालें होतें.

त्याच्या मनांत विचार आला. पेन आपण कुणाला दिली नाही, ती लिहायला बाहेर काढली नाही. ती फडताळांतच असायला हवी. कदाचित्, मला वाटतं, त्या ठिकाणाहून वेगळया ठिकाणीं ठेवली असेल. बघून तर घ्या. त्याने फडताळांतील वस्तू बाहेर काढून पाहिली. आणि त्याला नवल वाटलें. त्याची पेन देखील त्याला आढळून आली. तिच्याच पायीं त्याला मार खावा लागला होता. अपशब्द सहन करावे लागले. मानखंडना सोसावी लागली होती. त्याला नवल वाटलं, मघा का नाही दिसून आली आपल्याला ? मघा आपण गोंधळून गेलों होतों. आप्पांच्या शब्दांची सारखी भीति वाटत होती. डोळयांपुढे असून देखील कदाचित् मघा दिसली नसेल. त्याने पेन हातांत घेतली. माईला ती दाखवावी व आपल्यावर आलेला दोषारोप धुवून काढावा, ही कल्पना त्याच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मनांत आली, पण मग त्याच्या मनांत विचार आला, आपण प्रामाणिक आहों. पण आई आणि आप्पा आपल्याला कशावरून प्रामाणिक समजतील ? ते म्हणतील, तुला धाक घातला, भीती दाखविली, आमिषं दाखविलीं आणि म्हणून तूं पुनः पेन मिळवून आणलीस, तिचं तूं कांहीतरी वाईट खात्रीनं केलं होतंस. ते म्हणणार तूं विकली होती, कुणाशीं अदलाबदल केली होती, कुणाला दिली होती.

मी किती म्हणालों तरी माझ्यावर त्यांचा विश्वास बसायचा नाही. भलभलत्याच कल्पना नकोत कुणाच्या माझ्याविषयीं व्हायला, मग काय होईल तें होवो !

त्याने ती पेन फडताळाखाली टाकून दिली !

---

# इस टोपी को सलाम !

मूळ लेखक : **यशपाल**
अनुवादक : **शं. बा. शास्त्री, बी. ए.**

(श्री. यशपाल हे आधुनिक वाङ्मयातील एक अत्यंत तेजस्वी लेखक म्हणून विख्यात आहेत. आपल्या तारुण्याच्या ऐन पूर्वार्धांत हे क्रांतिकारकांच्या गटांत सामील होते. पुढे त्यांच्या राजकीय मतांत परिवर्तन घडून येऊन आता ते कट्टर साम्यवादीमताचे प्रभावी पुरस्कर्ते बनले आहेत. समाज-जीवनाचें अत्यंत सूक्ष्म व वास्तवतापूर्ण निरीक्षण करून त्याचें चित्रण यथातथ्यतेने आपल्या कादंबऱ्यांतून आणि लघुकथांतून, मतप्रचाराच्या अभिनिवेशाचा वासहि न येऊं देतां, कलात्मकपूर्ण शैलीने रेखाटणें हा त्यांचा एक अनन्यसाधारण विशेष गुण आहे. गद्याप्रमाणे पद्यांतहि त्यांनी कल्पनेच्या, विषयाच्या, मांडणीच्या आणि शैलीच्या बाबतींत अभूतपूर्व क्रांति करून दाखविलेली आहे. सध्या कागदाच्या टंचाईमुळे बंद पडलेलें, परंतु अनेक वर्षेपर्यंत हिंदी वाङ्मयांत विलक्षण खळबळ उडवून देणारें 'विप्लव' नियतकालिक यांच्याच संपादकत्वाखाली लखनौला निघत असे. 'गांधीवादाची शवचिकित्सा' हा त्यांचा दीर्घ प्रबंध सुप्रसिद्ध आहे. त्यांनी लिहिलेल्या 'दादा कॉमरेड' या प्रख्यात कादंबरीचें रा. शास्त्री यांनी केलेलें मराठी रूपांतर लवकरच प्रसिद्ध होणार आहे. यशपालांच्या लेखनशैलीचे सर्व विशेष त्यांच्या या लघुकथेंतहि वाचकांच्या प्रत्ययास आल्याशिवाय राहणार नाहीत.)

उन्हाळ्याच्या तापामुळे त्रस्त होऊन, किंवा शरीरस्वास्थ्यासाठी म्हणून आलेल्या लोकांमुळे नैनीतालची शोभा वाढत नाही. अशीं माणसें ओंठ बंद करून नाकाने लांबच लांब श्वासोच्छ्वास करण्याचा प्रयत्न करीत, हातांत काठी घेऊन शून्य रस्त्यांवरून फिरत असलेले तरी दिसतील, नाही तर, वर्तमानपत्र, पुस्तक-वगैरे हातांत घेऊन पलंगावर किंवा खुर्चीवर पडून तरी राहतील. फारच झालं, तर तलावाच्या काठीं जाऊन, एखाद्या बाकावर बसून, ते दुसऱ्यांचा मनोविनोद पाहून स्वतःची करमणूक करून घेतील, एवढेंच !

उन्हाळ्याच्या दिवसांत उन्हाचा त्रास तर होतोच. पण पूर्वीच्या काळांत—साहेबी पद्धत सुरू होण्याच्या पूर्वीच्या काळांत-थंड हवेच्या ठिकाणीं कोण जात होतं ? पण इंग्रजांना उन्हाळ्याचा त्रास फार जाणवतो. म्हणून उन्हाळ्याने घाबरून जाणें म्हणजे साहेबीपणाचें म्हणा, किंवा मोठेपणाचें म्हणा, लक्षण होऊन बसलें आहे. या खेरीज, नव्या संस्कृतीचे किंवा साहेबी पद्धतीचे क्रीडाविलास, जिथे साहेब लोक असतील तेथेच आढळणार, हेंहि उघडच आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत साहेब लोक आणि मोठीं मोठीं माणसें लांबलांबच्या ठिकाणांहून मसूरी-नैनिताल सारख्या 'दिल

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्टेशन्स' वर गोळा होतात, आणि मग हीं ठिकाणें साहेबी पद्धतीच्या विलासांचे अड्डेच बनून जातात! शोकीन लोक दूर दूरच्या ठिकाणाहून तिकडे येऊन दाखल होतात. वर्षभर अंतःकरणांत दाबून ठेवलेल्या ऊर्मि ते या ठिकाणीं येऊन महिना पंधरा दिवसांत शांत करून घेतात. एखाद्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर जातेवेळीं, किंवा नोकरी-साठी इंटरव्ह्यूला जाते वेळीं, ज्याप्रमाणे अगदी उत्तमोत्तम कपडे घालण्यांत येतात, वेळप्रसंगीं त्यांची उसनवारीहि करण्यांत येते, तीच गोष्ट नैनितालच्या संबंधांतहि समजावी.

मुरारी हा अशाच पैकीं नैनितालला आलेला प्रवासी होता. आज दोन प्रहरापासूनच आपल्या खत्री नांवाच्या मित्राला बरोबर घेऊन "कॅपिटल" मध्ये सिनेमा पाहायला जायचें, असें त्याने ठरविलें होतें. त्यासाठी दाढी करून त्याने चुडीदार पायजामा व अचकन अंगांत चढवून कडक इस्त्रीची एक गांधी-टोपी डोक्यावर ठेवून दिली. त्याच्या भरदार रुंद छातीवर अचकन सूटपेक्षा किती तरी अधिक शोभून दिसत होती. ते दोघे तल्लीतालहून मल्लीतालला जाण्यासाठी निघाले. खत्रीहि मोठा रुबाबदार दिसत होता.

बाजारचा उतार उतरून तलावाच्या समोर पोस्ट ऑफिस शेजारीं ते दोघे आले, पण पुढे रिक्शावाल्यांनी रस्ताच अडवून धरलेला त्यांना दिसला. या ठिकाणीं बहुधा अशी गर्दी नेहमी असतेच. उजवीकडून वरच्या बंगल्यांमधून आणि आर. ए. एफ. मधून साहेब क्लबमधून खाली येतात. जवळच, खालून येणाऱ्या मोटरींचा तळ आहे. आणखी इकडून तिकडून येणारे कांहीं रस्ते याच ठिकाणीं 'माल रोड'ला येऊन मिळतात. आणि साहेब लोकांचा,-विशेषेंकरून अमेरिकन किंवा दुसऱ्या गोऱ्या लोकांचा-घोळका दिसला रे दिसला की, रिक्शेवाले त्यांच्या रोखाने असे धावत सुटतात की, जशा गुळावर माशा! आणि मग, रिक्शे एकमेकांत अडकतात, गुंततात अन् रस्ता बंद होऊन जातो.

मुरारी आणि खत्री यांनी पाहिलें, समोर हाच प्रकार चालू होता. त्यांनी पाहिलें, तीन गोरे इसम मधोमध उभे होते, आणि पांच-सात रिक्शे त्यांना घेऊन उभे होते. कांहीं कुली त्या गोऱ्या इसमांच्या सामानाची ओढाताण करीत ओरडत होते, "हजूर, या इकडे!-साहेब, इकडे या!-मीच पहिल्यांदा हाक मारली होती!-नाही, हजूर, पहिल्यांदा मी!-साब, हा पहा रिक्शा!-यांत ठेव रे सामान!-" असें वाटत होतें, जणू काय, हाडकाच्या एका तुकड्यावर कुत्र्यांचें एक टोळकें तुटून पडलें आहे; प्रत्येकच तें हाडुक घेऊन पळण्याच्या प्रयत्नांत असून दुसरे तें त्याच्या तोंडांतून हिसकावून घेण्याची खटपट करीत आहेत! गोऱ्या साहेबांची सेवा करण्याची संधि मिळावी, म्हणून सारेच कुली व्याकुळ होऊन आपआपसांत झगडत होते!

अशा ओढाताणीमुळे बेजार होऊन एक गोरा साहेब शेवटीं चेकाळला. कुलींना हाताने बुक्क्या आणि थापडा लगावून तो दूर हट-विण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानंतर, ज्याप्रमाणे एखाद्या गाढवाला किंवा म्हशीला हाताने मारणें व्यर्थ वाटूं लागतें, तसेंच त्या गोऱ्या इसमाला वाटायला लागून त्याने आपल्या वजनदार लष्करी बुटांच्या ठोकरांनी त्या कुलींना मागे हटविण्यास प्रारंभ केला. पण एकमेकांत गुंतून पाडलेल्या रिक्शांचें तें कडबोळें इतक्या लवकर कसें उघडणार? त्यामुळे साहेबाचा क्रोध अधिकच उग्ररूप धारण करूं लागला आणि त्याचे हात आणि पाय अधिक तीव्रतेने आपलें कार्य करूं लागले!

साहेबांची सेवा करायला आतुर असलेले कुली एका हाताने आपलें डोकें वाचवीत, पाठीवर मार खात पळ काढण्यासाठी वाट शोधीत होते. परंतु त्यांचे रिक्शे एकमेकांत गुंतून अडखळून पडल्यामुळे त्यांना निसटतांहि येत नव्हतें.

हें दृश्य पाहून मुरारीचें रक्त खवळलें. खत्रीकडे पाहून तो इंग्रजींत म्हणाला, "हा काय जुलुम? हे गोरे हिंदुस्थानी लोकांना असें का पिटताहेत? हेंच का काँग्रेसचें राज्य?"

उत्तराची वाटहि न पाहतां तो रिक्षे-वाल्यांच्या घोळक्यांत शिरला आणि त्या चिडलेल्या इंग्रजाच्यासमोर उभा राहून उंच स्वरांत इंग्रजींत ओरडला "दुसऱ्यांना अशा रीतीने मारमुदाड करण्याचा कुणालाहि हक्क नाही. वाट-ल्यास तुम्ही जाऊन पोलीसकडे फिर्याद करा!"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खत्रीहि त्याच्याबरोबर होता.

त्या गोऱ्या इसमाचे हात आणि पाय एकदम थांबले. त्याने एकवार खत्री आणि मुरारी यांचें आपादमस्तक निरीक्षण केलें आणि बोटें नाचवीत तो आपल्या 'इंग्रज' इंग्रजींत पुष्कळच कांहीतरी बडबडून गेला! त्याच्या बरोबर दुसऱ्या दोघांनीहि त्याला साथ द्यायला सुरवात केली.

बी. ए. पर्यंत इंग्रजी शिक्षण घेतलें असूनहि त्यांपैकी एकहि शब्द मुरारी समजूं शकला नाही. कुणालाहि दुसऱ्याला मारसुदाड करण्याचा हक्क नसल्याबद्दलच्या आणि पोलीसकडे जाऊन फिर्याद करण्याच्या आपल्या विधानाची त्याने पुनरावृत्ति केली. खत्रीहि तेंच म्हणाला ते तिघे गोरे इसम बाजूला झाले आणि पुनः "रिक्षा, रिक्षा!" म्हणून ओरडूं लागले. रिक्षेहि तावडतोब समोर येऊन उभे राहिले. आणि, ज्या कुलींवर लाथा बुक्क्यांचा वर्षाव झालेला होता, तेच बहुधा सर्वात पुढे होते.

गोरे लोक रिक्षांत बसून चालते झाले. परंतु मुरारीच्या शरीरांत आग लागल्यासारखी झाली. तलावाच्या काठाने चालतां चालतां त्याने पोलिसांना उद्देशून एक शिवी हासडली आणि म्हटलें, "हें···आपल्या गोऱ्या बापांना असे भितात की, त्यांच्या विरुद्ध तोंडांतून कधी एक शब्द सुद्धा काढणार नाहीत."

"बोलतील काय?" खत्री म्हणाला. "पोलीसवाले इंग्रज सरकारचे नोकर आहेत की, हिंदुस्थानी लोकांचे? त्यांना न्याय-अन्यायाशीं काय करायचं आहे?"

ग्लानीयुक्त स्वरांत मुरारी म्हणाला, "हे साले रिक्षेवालेच पशू आहेत. खरं म्हणजे यांच्याठायीं माणुसकीचा लवलेशहि जरि असता, तरी यांनी गोऱ्या माणसाला कधी रिक्षामध्ये बसविलंच..."

"रिक्षेवालेच कशाला—" खत्री मध्येच म्हणाला, "अरे, जिथे पहाल तिथे हेंच. कुठे कोणच्याहि हॉटेलमध्ये जाऊन पहा. मोठयांतल्या मोठया हिंदी माणसाला सोडून फडतुस गोऱ्या इसमाकडे तिथल्या बेअररसचं सारं लक्ष. त्यांना हव्या असतात टिप्स. हिंदुस्थानी माणसांनी अधिक बक्षिस जरी दिलं, तरी यांच्या डोक्यांत तर साहेबाशीच लाळघोटेपणा करणं भरलं आहे ना! याला कोण काय करणार?"

मुरारीने एक लांबच लांब निःश्वास टाकला, आणि नंतर तो म्हणाला, "अरे, एवढी गोष्ट जर नसती तर स्वराज्य नसतं कां मिळालं? असहकारितेचा अर्थ तरी काय आहे दुसरा? पण तें होईल तेव्हा ना!"

"व्हाव तरी कसं?" खत्रीने उत्तर दिलें. "या इंग्रजांनी सर्वांनाच जसं कांही वेगळं वेगळं विकत घेऊन ठेवलं आहे.— याच देशाच्या पैशाने याच देशांतल्या लोकांना विकत घेऊन ठेवलं आहे. प्रत्येक जण दुसऱ्याचा गळा कापतो आणि इंग्रजाचे जोडे चाटतो.— इच्छा एकच मी मोठा व्हायला पाहिजे! हिंदुस्थानवासियांच्या दृष्टीने कुणी विचारच करीत नाही!"

तलावाच्या पृष्ठभागावर उसळणाऱ्या लहरीकडे दृष्टी फेकीत मनांत भडकलेल्या क्रोधाच्या आवाजांत ओठ चावून मुरारी म्हणाला, "प्रत्येकाला आपल्या पोटाची येऊन पडली आहे! अशानं कां कुठं स्वराज्य मिळतं? पहिल्यांदा मनांत विचार यायला पाहिजे तो आपल्या राष्ट्रीयत्वाचा!"

ते दोघे भिन्न राष्ट्रीयत्वाच्या भावनेच्या आवश्यकतेबद्दल इंग्रजींतून चर्चा करीत पुढे चालले होते. असल्या शब्दांचा प्रयोग मातृभाषेंतून करण्याची आपल्याला सवय नाही. या गोष्टी इंग्रजी वर्तमानपत्रांतून आणि पुस्तकांतूनच बहुधा आढळतात. आपल्या मातृभाषेंतून हे विचार प्रगट करतांना तितकासा जोर चढत नाही!

ते थोडे पुढे गेले; समोर यॅच क्लबची इमारत आली. खत्री म्हणाला—"या क्लबचा मेंबर हिंदुस्थानी होऊं शकत नाही म्हणतात."

मुरारी म्हणाला, "अरे बाबा मी तर असं ऐकलं आहे की, एके काळीं या नैनितालमध्ये हिंदी लोकांना या मालरोडवर जाण्यायेण्याची सुद्धा बंदी होती! जनावरांच्या बरोबरच हिन्दी लोकहि त्या खालच्या रस्त्यावरून जा-ये करीत असत. आता हिन्दी मंत्र्याच्या मोटारी या रस्त्यावरून हिंडतांना पाहून इंग्रजांच्या अंतःकरणांतील आग भडकत असेल! समोरच कॉंग्रेस सरकारने दुसरा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक क्लब उघडावा आणि इंग्रजांना आंत पाय ठेवण्याची सुद्धा परवानगी देऊं नये."

"कॅपिटॉलच्या रेस्टरॉमध्ये जाऊन इंग्रजांच्या समोरासमोर आपणहि बसूं या. हें काय ? जी जी म्हणून चांगली जागा असेल, तीवर या साल्यांनीच हक्क लावून ठेवला आहे की काय ! पाहूं या आपल्याला मनाई करण्याची छाती आहे ? रणवीर आणि निगम यांसहि बरोबर घेऊन जाऊं या. आज जें काय व्हायचं असेल, तें होऊनच जाऊं दे ! पाहून घेऊं."

मुरारी आणि खत्री दोघेहि मारामारीला भिणारे गडी नव्हते. आणि रणवीर आणि निगम तर दोन पावलें त्यांच्याहि पुढे होते. चौघेहि दोस्त बरोबरच कॅपिटॉलमध्ये एका टेबलाशी जाऊन बसले. पहिल्यांदा त्यांनी चहा मागविला, त्यानंतर आणखीहि कांही पदार्थ! जेव्हा कुणी एखादा इंग्रज इसम आंत येई, तेव्हा हे चौघेहि त्याच्याकडे आव्हानाने भरलेल्या उग्र दृष्टीने पाहात. परंतु त्यांच्या या पाहाण्याची कुणीच पर्वा केली नाही ! एखाद्यानें तिकडे लक्ष्य गेलेंच, तर कुठली तरी ओळख असेल अशा समजुतीने तो हसून 'Good evening' म्हणे आणि आपलें सौजन्य प्रकट करून पुढ चालता होई.

बाहेर पावसाचे थेंब यायला लागले होते. म्हणून हे चौघे तसेच बसून राहिले. दोन तास उलटून गेले. मनांतला आवेश आता बराचसा थंडावला होता. खत्री म्हणाला, "आता आलोंच आहोंत, तर सिनेमाचा दुसरा शो पाहूनच परत परत जाऊं, झालं. खालच्याच मजल्यावर सिनेमा आहे" दोघेहि तेथे जाऊन बसले. चित्रपट संपायला आला. इतक्यांत खत्रीने आपल्या सोबत्यांना बाहेर चलण्याची खूण केली गर्दीबरोबर बाहेर पडल्यानंतर मग रिक्षे मिळाले नसते आणि थंडीहि चांगलीच जाणवायला लागली होती.

सिनेमागृहाच्या समोर पोलीसच्या शिपायाने एके बाजूने रिक्षे आणि दुसऱ्या बाजूने डोलीवाले ओळींत उभे केलेले होते. हेतु हा की, त्यांनी आपसांत तंटाभांडण करूं नये. हे चौघेहि मित्र गेले आणि पहिल्या दोन रिक्षांत बसूं लागले. आणि, इतक्यांतच सिनेमाहि संपला. दोन्हीहि रिक्षांचे कुली या लोकांना न्यायला तयार नव्हते. मुरारीने त्यांना दटावलें. "नाही कसं ? तुम्हाला यावंच लागेल."

"आमचा रिक्षॉ खाली नाही, हुजूर, हा रिक्षॉ 'रिजव' आहे."

मुरारीने पुनः त्याला खडसाविलें, "तें कांही नाही, तुम्हाला चलावंच लागेल. चला, उचला रिक्षॉ ! " आणि, असें म्हणतच तो रिक्षांत चढूं लागला.

त्याला विरोध करीत कुली पुनः म्हणाला, "नही, साब हम नहीं जायगा. हमारा रिक्षॉ गोरासाबका 'रिजव' है. तीन फुल्लीवाला (खांद्यावर तीन स्टार लावणारा कॅप्टन) साबका रिजव है."

मुरारीचा क्रोध आता सीमेपलीकडे गेला. एक शिवी हासडून तो म्हणाला, "चलतोस की नाही ? तुझ्या तीन फुल्लीवाल्या गोऱ्या साहेबाची ऐसी तैसी !"

विरोध करणाऱ्या रिक्षावाल्या कुलीला रणवीरने दोन थपडा दिल्या. कमरेंत एक लाथहि लगावून दिली ! मुरारीने दुसऱ्या कुलीला आपल्या हाताचा प्रसाद दिला. साहेब लोक सिनेमा गृहांतून बाहेर येत होते आणि रिक्षवाले आपापले रिक्षे जबरदस्तीने त्यांच्या पुढे-पुढे नेत होते. हे चौघेहि एकेकांत दोघे-दोघे अशा रीतीने त्या दोन रिक्षांत जाऊन बसले. त्या रिक्षांचे कुली असंतुष्टतेने बडबडत शेवटीं नाइलाजाने त्यांना घेऊन धावूं लागले. मल्लीतालहून तल्लीतालला पोचून बाज़ाराची चढण चढून रिक्षा मुरारीच्या घरापुढे जाऊन उभा राहिला. गोऱ्या साहेबाच्या पुढे मोठ्या प्रतिष्ठीने पहिला रिक्षा घेऊन निघाल्या कारणाने आता मुरारीचें मन बरेंच संतुष्ट झालें होतें. रिक्षवाल्याला त्याचें वाजवी भाडें १ रु. देऊन त्याने वर आणखी दोन रुपये त्याच्या हातावर हातावर ठेवले आणि म्हटलें, "हें घे बक्षीस ! समजलास ! यापुढे कधी आता इंग्रज साहेबाला आपल्या रिक्षांत बसूं देऊं नकोस ! नेहमीं हिंदुस्थानी साहेबालाच रिक्षांत बसवीत जा. समजलास ! आता इंग्रजाचं राज्य नाही. कॉंग्रेसचं राज्य आहे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता इंग्रजाच्या टोपीला सलाम नाही करायचा ! त्यानंतर आपल्या गांधी टोपीकडे बोट दाखवून तो म्हणाला, "अब इस टोपीको सलाम करना ! समझे ! "

तीन फुल्लीवाल्या साहेबाची स्वारी न मिळाल्याचें दुःख आता त्या कुलीच्या मनांत मुळीच राहिलें नव्हतें. विजेच्या दिव्याच्या उजेडांत त्याच्या कपाळावरील घर्मबिंदू आणि डोळ्यांतील प्रसन्नता स्पष्टपणें प्रतीत होत होती. हात जोडून दांत विचकून त्याने उत्तर दिलें,

"आपण म्हणतां तें खरं आहे, साहेब !... आपण आमचे मायबाप आहांत, तेहि आमचे मायबाप आहेत ! बोलून चालून आम्ही तर कुलीच ठरलों ! "

---

# जगावेगळ्या जगांत (लघुतम-कथा)

लेखिका—ऑलिव्ह श्रीनर
अनुवादक—प्रा. भा. म. गोरे, एम्. ए.

[ **लेखिकापरिचय**—दक्षिण आफ्रिकेंत वसाहत करून राहिलेल्या एका जर्मन मिशनऱ्याची ऑलिव्ह ही मुलगी. हिला नीटसें शाळेचें शिक्षण कधी मिळालेंच नाही. बोअर शेतकऱ्याच्या घरीं नोकरी करीत असतां वीस वर्षांच्या वयांत तिने 'The story of African Farm' ही आपली कादंबरी लिहिली. ही प्रसिद्ध झाल्यावर तिच्यांतील स्त्री-हक्कवादी विचारसरणीने इंग्लंडमध्ये खूप खळबळ उडवून दिली ! तिच्या लिखाणापेक्षा तिच्या जीवनाकडे आणि विक्षिप्त मतांकडेच लोकांचें अधिक लक्ष जाई. तिच्या कथांत विचारांपेक्षा भावनांचेंच प्राबल्य अधिक दिसतें. मोकळेपणाने भावनांचा अनुभव आपण घ्यावा, त्यांना जगाच्या भीतीने दडपून टाकूं नये; स्त्री व पुरुष यांच्यांतील भेद आता मागे पडले असून 'मानव' या एका सामान्य दृष्टीने त्यांच्याकडे पाहिलें पाहिजे, त्यांना वाव दिला पाहिजे, हक्क दिले पाहिजेत, स्वातंत्र्य दिलें पाहिजे. या दोन विचारसरणी तिच्या सर्व लेखनांतून प्रामुख्याने आढळतात. ]

दूर ! दूर !—या जगापासून फार दूर अशा एका ग्रहावरच्या जीवनांतली ही गोष्ट आहे.

—तिथे जें घडलें, तें इथे घडत नाही.

त्या जगांत, एक जागीं एकच काम करणारी स्त्री पुरुषांची एक जोडी होती. अनेक वर्षें त्यांचा परिचय होता. अनेक वर्षें ते एकत्र कार्य करीत होते, आणि त्यांची दाट मैत्री होती.

—आपल्या जगांत असं दृश्य विरळाच दिसेल.

पण इथे न असणारी एक गोष्ट तिथे होती.

तेथील एका प्रदेशांत एक गर्द रान होतें: इतकें दाट की, झाडांच्या फांद्या एकांत एक गुंतत, आणि त्यांच्या छतांतून सूर्यप्रकाशहि खाली येऊं शकत नसे. या रानांत एक देऊळ होतें. दिवसभर तें ओसाड पडलेलें असे. पण या देवळांत रात्रीं मात्र कधी कधी कोणाची तरी चाहूल लागे.

कारण या स्थळाचा एक महिमा होता.

रात्रीं एकट्याने इथें येऊन आपल्या छातीवर जखम करून तें रक्त कोणी देवळाच्या पायऱ्यावर सांडलें, तर त्याने इच्छिलेला वर त्याला मिळत असे. इथे घडत नाहीत अशा गोष्टी त्या जगांत घडत, हें मीं सांगितलेंच,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या स्त्रीपुरुषांत स्नेहभाव होताच. स्त्रीला मात्र जास्त तीव्रपणें वाटे की आपण आपल्या मित्राचें कांही विशेष चांगलें करावें.

म्हणून एका चांदण्या रात्रीं ती एकटीच या रानांतल्या देवळांत आली. दरीयावर चंदेरी लाटा उसळत होत्या, झाडांचे शेंडे चांदण्यात तळपत होते. गर्द रानांत मात्र अंधार होता फांद्यांमधून चांदण्याचे तुरळक ठिपके जमिनीवर सांडले होते. पुढे, देवळाजवळ मात्र अगदी अंधार होता.

देवळांत जाऊन तिने हात जोडले. तिथे पडलेला एक दुधारी दगड घेऊन तो आपल्या छातीवर चालविला. रक्ताची एक चिळकांडी उडाली. देवळांतले दगड लाल रंगले.

आंतून एक आवाज आला—'वर माग.'

'माझ्या मित्रासाठी सर्वांत श्रेष्ठ असं सुख मागून घ्यायचं आहे.'

—'माग, कोणतं तें?' आवाजाने प्रश्न केला.

—'तें कोणतं, हें मला ठाउक नाही. पण जें त्याच्या सर्वांत अधिक हिताचं असेल, तें व्हावं.'

—'तथास्तु!' असें उत्तर आलें.

—ती उल्हासाने उठून उभी राहिली. जखमी हृदयावर तिने घट्ट पदर लपेटून घेतला. ती जलद पावलांनी रानाच्या बाहेर आली.

—समुद्रकिनारा चांदण्याने न्हाला होता. त्यावर दूर कुठे तरी एक नाव चाललेली तिला दिसली. सुकाणू धरून तींत एक मनुष्य उभा होता. तो तिचाच मित्र होता. त्याच्या समोर एक स्त्री बसली होती—त्यांची नाव किनारा सोडून कुठे तरी दूर दूर चालली होती.—

हें पाहून ती वेड्यासारखी किनाऱ्याने धावूं लागली—नावेकडे तिने बाहू पसरून हाक फोडली.

मघांचा आवाज कानगुजला—'काय हें!'

ती व्याकुळ होऊन म्हणाली —'काय झालं हें? माझ्या हृदयाचं रक्त सांडून मी या मनुष्यासाठी सर्वांत श्रेष्ठ हितकर असा वर आणला. तो त्याला द्यायला आलें, तर तोच मला सोडून निघाला!'

त्या आवाजाने उत्तर दिलें—'तुझा वर त्याला मिळाला.'

—'वर मिळाला?—तो कोणता?'

—'तुझ्यापासून दूर जाणं हेंच त्याच्या हिताचं होतं!'

ती खाली मान घालून मूकपणें उभी राहिली. नाव दूर, क्षितिजापलीकडे जाऊन अदृश्य झाली.

त्या आवाजाने हळूच विचारलें—'यांत समाधान आहे का तुला?'

तिने निश्चयाने उत्तर दिलें—'होय!'

सागराच्या नागमोडी लाटा तिच्या पायाशीं येऊन तिचे पाय न्हाणून परत जात होत्या—

—दूरच्या, जगावेगळ्या जगाची गोष्ट आहे ही!

---

# गुप्तसरस्वती

वि. ज. सहस्रबुद्धे व गोविंदराव टेंबे

[ 'विविधवृत्ता'च्या सन १९४५ च्या दिवाळी अंकामध्ये 'मानापमान' नाटकांतील पद्याविषयीं रा. गोविंदराव टेंबे यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत "मूळ हिंदी चालीप्रमाणे लघुगुरु आहेत की नाहीत आणि हिंदी मूळ चीजेची ती मराठी प्रतिकृति आहे की नाही, एवढेंच मी पाहत असें"—असें टेंबे यांनी म्हटलें आहे. त्यासंबंधी कांही अधिक खुलासा करून घ्यावा, म्हणून मिरजचे साहित्यिक रा. वि. ज. सहस्रबुद्धे यांनी टेंबे यांना पत्र लिहून विचारलें. मुख्यतः मराठी शब्दांचे उच्चार, अक्षरांची मात्रा-मोजणी व तालाशीं संबंध याबद्दलच सहस्रबुद्धे यांचे प्रश्न आहेत. रा. टेंबे यांनी सहस्रबुद्धे यांच्या प्रश्नास उत्तरें देऊन आपलें म्हणणें कळविलें आहे. त्या पत्र-व्यवहारावरून सहस्रबुद्धे यांनी खालील प्रश्नोत्तरें तयार केलीं आहेत.]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

**प्रश्न**—हिंदींतील उच्चार शिथिल असतात, म्हणजे लघूचा उच्चार लघु व गुरूचा उच्चार गुरु करण्याचें बंधन फारसें पाळलें जात नाही, अशी माझी समजूत आहे. ती बरोबर आहे काय ?

**उत्तर**—होय. गाण्याच्या सोयीकरता शब्द विकृत, सुगम किंवा अपभ्रष्ट देखील करतात.

२ **प्रश्न**—मराठी पदांतील लघुगुरु अक्षरांचे उच्चार लघुगुरुच करण्याची पद्धत बहुत करून आहे, असें वाटतें, तें खरें काय ?

**उत्तर**—होय. कांही लावणीवजा प्रबंधाच्या गायकींत लघु अक्षरें दीर्घ केलीं जातात व मुरकी, खटका, यांसारखे छोटे अलंकारहि त्यांवर वापरतात-अकारान्त अक्षरावर देखील वापरतात.

**प्रश्न**—हिंदी पदांत अक्षरें दिसावयाला लघुगुरु दिसलीं, तरी प्रत्यक्ष तें पद म्हणत असतांना त्यांचे उच्चार कसे होतात, हें पाहावें लागतें व त्या उच्चारावरून लघुगुरु ठरवावे लागतात. आणि मग त्या लघुगुरु-प्रमाणे मराठी प्रतिकृतीमध्ये अक्षरें वापरावीं लागतात, असें मी समजतों. आपलें मत काय आहे ?

**उत्तर**—हिंदींत एकच अक्षर एकदा लघु व एकदा गुरु उच्चारणें याबाबत गाणाऱ्यांवर निर्बंध नाही, मराठी पद्याची रचना यापैकीं एक प्रकार निश्चित ठरवून त्याला धरून करावी लागते.

**प्रश्न**—मराठी पदांतील उच्चार प्रत्यक्ष अक्षरें लघुगुरु दिसतात त्याप्रमाणे करण्याची जबाबदारी गायकावर असावी किंवा नको ?

**उत्तर**—न कळत का होईना, परंतु ही जबाबदारी महाराष्ट्रीय समंजस गायकाला वाटत असतेच, व म्हणून मराठी भाषेंत ख्याल, ठुंबरीची गायकी अमर्याद व मनाजोगी होऊं शकत नाही.

**प्रश्न**—लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन मात्रा, याप्रमाणेच मात्रा-मोजणी करावी लागते. आपण याप्रमाणेच मोजणी करतां किंवा नाही ?

**उत्तर**—होय. लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन किंवा अधिक मात्रा.

**पोटप्रश्न**—उदाहरणार्थ, आठमात्रेचा ताल असलेलें पद केलें, तर चार गुरु अक्षरें घालतां येतील व आठ मात्रा भरून तालाचें एक आवर्तन पुरें होईल. किंवा दोन गुरु व चार लघु मिळूनहि आठ मात्रा करतां येतील. ही गोष्ट तालदृष्ट्या व छंदःशास्त्रदृष्ट्या योग्य होईल किंवा नाही ?

**उत्तर**—मूळ चालीच्या रचनेचें वैशिष्ट्य व सौंदर्य राखण्याकरता लघुगुरूची योजना केव्हाहि अनियमित असणार. वरील दोन प्रकाराखेरीज सर्वच लघु किंवा दोन लघु व तीन गुरु असेंहि करावें लागेल.

**प्रश्न**—ज्या ठिकाणीं अधिक मात्रा भरून काढावयाच्या असतात, अशा जागीं गुरु अक्षरच असावें काय ?

**उत्तर**—होय.

**पोटप्रश्न**—लघु अक्षर लांबवून मात्रा भरून काढल्यावर कानास कटु लागतें. मुख्यतः अशी स्थिति अकारान्त शब्दाबद्दल उत्पन्न होईल, असें वाटतें. आपणांस असेंच वाटतें काय ?

**उत्तर**—होय.

**प्रश्न**—अस्थाई अगर ध्रुवपद यांतील रचना अक्षर-गण-वृत्ताप्रमाणेच असते, म्हणजे मूळच्या लघुगुरुप्रमाणेच प्रतिकृति करावी लागते. अंतरा अथवा कडव्याचा भाग यामध्ये मात्र एकंदरींत आवर्तनाच्या मात्रांची बेरीज साधली, म्हणजे सामान्यतः चालतें. म्हणजे तितकें कडक बंधन पाळावें लागत नाही. थोडी सवड सापडते, इतकेंच. आपलें म्हणणें कसें आहे ?

**उत्तर**—अक्षर-गण वगैरेपेक्षा चिजेचा झोक सांभाळावा लागतो व त्याप्रमाणे लघुगुरु वापरावे लागतात. प्रतिकृति ही एकंदर बांधणीची व स्वरूपाची होय. केवळ लघुगुरूची नव्हे.

अन्तऱ्याच्या बाबतींत आपण म्हटलेलें सामान्यतः बरोबर आहे. परंतु कांही अन्तरे अस्ताईइतकेच विशिष्ट रचनाबद्ध असतात. याकरता अस्ताईप्रमाणेच लघुगुरु योजावे लागतात.

**प्रश्न**—आवर्तनाच्या मात्रा केवळ तितक्या मात्रांची अक्षरें घालून पुऱ्या करून चालत नाही, म्हणजेच पोट-गण सांभाळावे लाग-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तात, असें म्हणतां येईल; किंवा विशिष्ट लघुगुरु सांभाळावे लागतात, होय ना ?

**उत्तर**—चिजेच्या रचनेंतील झोक किंवा तिच्यांतील विशिष्ट सौन्दर्य व स्थळें राखण्याकरता विशिष्ट लघुगुरु सांभाळावे लागतात, असें म्हणणें युक्त होईल.

**प्रश्न**—'संगीताचें मराठीकरण' हा वाद मध्यन्तरीं उत्पन्न झाला होता. त्या वेळीं मत-भेदहि फार झाले होते. माझी दृष्टि काय आहे, तें वरील प्रश्नावरून दिसून येईल, मूळ चिजेंतील लघुगुरु अक्षरांच्या उच्चारावर व मराठी भाषेंतील उच्चारावर सर्व अवलंबून आहे. मराठी अक्षरांचे उच्चार साधारणतः ठरीव आहेत. ते उच्चार वाटेल तसे करून पद म्हणावयाचें झाल्यास छंदःशास्त्राची जरूरच नाही ! उच्चाराबद्दल कांही तरी बंधन अगर नियम ठरविले पाहिजेत; व तसें गृहीत धरून पद्य-रचना-तंत्र ठरवितां येईल, असें एकंदरींत मला वाटतें. आपलें मत कळल्यास निर्णयास साधन होईल.

**उत्तर**—'संगीताचें मराठीकरण' हा शब्द-प्रयोग माझ्या मतें चुकीचा आहे. पद्यांतील शब्द हिंदीऐवजी फक्त मराठी भाषेचे वापरले, म्हणजे संगीतकलेचें किंवा हिंदुस्तानी संगीत-पद्धतीचें मराठीकरण होऊं शकत नाही ! हा विषय बराच व्यापक आहे. ख्याल, टुंबरी वगैरे सारख्या स्वैर गायकीला गण, मात्रा, छंद, इत्यादींचें बंधन घातल्याने व मराठी भाषेची उच्चारशुद्धता राखण्याने स्वर-विलासाची व बोलविलासाची गळचेपी होणार ! उच्चाराबाबत मराठी भाषेची लघुगुरु इत्यादि बंधनें काढून टाकलीं, तर कदाचित् उच्च गायकीकरता मराठींत प्रबंध, ख्याल, वगैरे रचतां येतील. पण ती मराठी भाषा राहणार नाही ! भ्रष्ट मराठी होईल ! मराठी भाषा-सुंदरीवर हिंदुस्तानी (हिंदी-उर्दू) भाषेचे अपरिचित अलंकार व पेहेराव घालण्याने मराठी भाषेची वाणी नाहीशी होईल ! हें पातक का करावें ?

---

# शंका : चर्चा : समाधान

या नवीन सदरांत निरनिराळ्या प्रश्नासंबंधीं अभ्यासकांच्या शंका, चर्चा व समाधान हीं देण्यांत येतील.

## "सह नौ भुनक्तु" आणि कै. माधव ज्यूलियन्

कै. कवि माधव ज्यूलियन म्हणजेच डॉ. माधवराव पटवर्धन, हे श्रेष्ठ कवि व साहित्यिक होते, याबद्दल दुमत नाही. कविता करतांना ते प्रत्येक शब्दन् शब्द अगदी तोलून व घासून-पुसून वापरीत असत, असा त्यांचा लौकिक आहे. त्यांचें 'विरहतरङ्ग' हें काव्य अक्षर वाङ्मयांत मोडत असून कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूत काव्यालाहि मागे टाकील असें 'अभिनव-काव्य-प्रकाश' कर्ते प्रा. जोग यांचें म्हणणें आहे, तर विप्रलंभ शृंगाराचें वर्णन यांत उत्कृष्ट आहे, असें 'रसविमर्श' कर्ते डॉ. वाटवे यांचें मत आहे ! कै. माधव ज्यूलियन हे फार्शी भाषेंत निष्णात होते. त्यांनी थोडेंबहुत संस्कृतचेंहि अध्ययन केलें होतें. असें जरी असलें तरी 'सह नौ भुनक्तु' याचा अर्थ त्यांना नीटसा अवगत न झाल्यामुळे भलत्याच अर्थानें त्यांनी तें वाक्य खालील कवितेंत उपयोजिलें आहे ! ती कविता अशीः—

'खिस्ताचा अनुकार' मी उघडितों
तो एक पानावरी
माझें नांव दिलें तुवां खरडिलें
लीलेंत गोलाक्षरीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूक्तें गाउनि तेधवा कितिकदा
केली सहप्रार्थना !
अन् वाटे '**सह नौ भुनक्तु**' म्हणतां
आता वियोगार्थ ना ?
'विरहतरङ्ग' श्लोक १०

'सह नौ भुनक्तु' हा भाग 'सहनाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु। मा विद्विषावहै। ॐ शांतिः शांतिः शांतिः॥ या सूक्तांतील आहे. हें सूक्त गुरु व शिष्य या दोघांनी म्हणावयाचें आहे. गुरु शिष्याला म्हणतो–(ईश्वरः) सह नौ अवतु–ईश्वर आपल्या दोघांचें रक्षण करो. (ईश्वरः) सह नौ **भुनक्तु**-ईश्वर आपल्या दोघांचें **पालन करो**. पुढील अर्थ स्पष्ट आहे.

या ठिकाणीं 'भुनक्तु' हें रूप भुज् धातूचें अज्ञार्थी तृतीय पुरुषाचें एकवचन आहे. 'ईश्वरः' हा अध्याहृत कर्ता आहे. 'नौ' हें 'अस्मद्' शब्दाचें द्वितीयेचें द्विवचनाचें वैकल्पिक रूप आहे. 'भुज्' धातूचा पाठ 'भुज् पालनाभ्यवहारयोः' असा पणिनीनें केला आहे व परस्मैपदी असतांना त्याचा अर्थ 'पालन करणें असाच आहे. उपभोग घेणें असा अर्थ असेल त्या वेळीं 'भुजो नवने' १।३।६६ या सूत्राने 'अनवन' या अर्थी तो आत्मनेपदी होतो. म्हणजे 'अवन' या अर्थी तो परस्मैपदी असला पाहिजे. 'सिद्धांतकौमुदी'कारांनी खालील उदाहरणें स्पष्टीकरणासाठी दिलीं आहेत.

(१) ओदनं भुङ्क्ते। (२) बुभुजे पृथिवीपालः पृथिवीमेव केवलाम्। (३) वृद्धो जनो दुःखशतानि भुङ्क्ते। इह उपभोगो भुजेरर्थः। पण 'महीं भुनक्ति' परिपालयतीत्यर्थः—

तात्पर्य, कित्येक सुशिक्षित लोकहि प्रवचनांतून व व्याख्यानांतूनहि याचा चुकीचा अर्थ करतात !

सध्या 'विरहतरङ्ग' हें काव्य मुंबई विश्वविद्यालयानें बी. ए. साठी नेमलें आहे. तरी मराठी प्राध्यापकांचें लक्ष या गोष्टीकडे मी वेधूं इच्छितों.

वरील कवितेंत 'भुनक्तु' याचा अर्थ 'उपभोगिणें' या अर्थी उघड उघड केलेला आहे व त्यांत 'भुनक्तु' या रूपाचाहि विचार केलेला दिसत नाही, हें "आता वियोगार्थना'? या वाक्यावरून स्पष्ट आहे.

**—म. दा. साठे, एम. ए., एल. टी.**

## एक व्युत्पत्ति

'गोरा गोरा पान' या वाक्-प्रचारांतील पान-शब्दाची व्युत्पत्ति कशी, अर्थ काय ? भाषातत्त्वविचक्षण इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांनी 'पाण्डुर'पासून प्रस्तुत 'पान'-शब्द व्युत्पादिला आहे. परंतु ही व्युत्पत्ति भलतीच ओढाताणीची आणि अर्थात् न पटणारी अशीच म्हणावी लागते. राजवाड्यांचें भाषेचें ज्ञान विस्तृत आणि सखोल होतें तरी आग्रही स्वभावामुळे त्यांनी कित्येक गोष्टी ठोकून दिल्या आहेत ! प्रस्तुत व्युत्पत्ति त्याचें एक उदाहरण होय. पाणिनि राजवाडे यांच्यासारख्या अतुल बुद्धिमंतांच्या पुरुषांना देखील भाषेचें समग्र व निश्चित दर्शन होणें केवळ अशक्य आहे. भाषा ही वस्तूच अशी अनन्तपार आहे. म्हणूनच त्यांच्या ग्रंथांत त्रुटि आढळतात आणि, कोणाच्या हि ग्रंथांत त्या आढळणारच.

आता 'पाण्डुर' पासून जर 'पान'चें व्युत्पादन चूक तर त्याची दुसरी सयुक्तिक उत्पत्ति कोणती, असा प्रश्न उठतो. 'कर्ण'पासून कान तसा 'पर्ण' पासूनच 'पान' शब्द आला आहे. (मनुष्य दिग्-भ्रम होऊन भलत्या वाटेस लागला, म्हणजे जसजसा चालत जातो, तसतसा उद्दिष्ट स्थानापासून दूरदूरच पडत जातो. राजवाड्यांचेंहि प्रस्तुत प्रकरणीं तसेंच झालें आहे. आपलें म्हणणें सिद्ध करण्यासाठी इंग्लंडचे लोक बोलण्यांत मधेच एखादा उपटसुंभ 'र' कसा आणतात — इत्यादि चर्चा त्यांनी केली आहे. ही गैरलागूच नव्हे, तर हास्यास्पदहि वाटावी.) त्याचा नागवेलीचें पान असा येथे विशिष्ट अर्थ आहे. प्रस्तुत स्थळीं पान हा शब्द उपमान म्हणून आला आहे. गोरा या गुणविशेषणाचा विशेष पान या उपमानाने प्रकट केला आहे. सर्व गोरेपण सारखें नसतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सरस्वती कुंदाचें फूल, चंद्र आणि हिमजलाचा फवारा यांच्यासारखी गोरी वर्णिली आहे. किंबहुना, सरस्वती ही गोरी नसून शुभ्र वा सफेद आहे. मानवी गोरेपण भारतीय सावळेपणापासून तों रशियन सफेदपणापर्यंत अनेक छटांचें आहे. 'गोरा गोरा पान' या प्रयोगांत नागवेलीच्या पिकल्या पानासारखा गोरेपणा वर्णिला आहे. गोरा ह्या गुणविशेषणाचा द्विवार उच्चार गुणाचा अतिशय दाखविण्यासाठी आहे. गुणांचा अतिशय आणि छटा वा स्वगत भेद दाखविण्याची ही एक रहस्यपूर्ण पद्धति मराठींत आणि इतरहि सदृश भाषांत आढळून येते. येथे मराठींतील अशींच इतर कांही उदाहरणें देतों—

(१) पांढरा फटक; काळा कोळसा, काळा ठिक्कर, काळा भिल्ल, काळा डोम, काळा शिद्दी; पिवळें हळकुंड; लाल अंगार, तांबडा भडक; हिरवाचार इत्यादि.

(२) कडू विख, कडू कारलें; गोड अमृत, गोड साखर; आंबट ढाण वा चिंच, तिखट मिरची इत्यादि.

(३) हलका फूल, उंच ताड, इत्यादि.

(४) निर्दय कसाई वा मांग; क्रोधी दुर्वास, लोभी मांजर, ढोंगी बगळा—इत्यादि.

या विभिन्न उदाहरणांत विशेषणांपुढील शब्द उपमानादाखल असून ते व्यक्तिवाचक वा पदार्थवाचक आहेत. फटक म्हणजे स्फटिक, पांढरा कसा ? तर स्फटिकासारखा. अगदी पारदर्शक. याप्रमाणेच इतर सर्व ऊहनीय होत. ठिक्कर—खापराचा तुकडा; भडक—ज्वाला, चार—चारा, हिरवें गवत; इतर शब्द प्रसिद्धच आहेत. कित्येकदा उपमानवाचक शब्द एकएकटेच येतात. जसें—'तो मेला मोठा मांग आहे !' म्हणजे मांगासारखा निर्दय आहे. नव्हे, त्याहूनहि अधिक जोरदार भाव यांत आला आहे. सारखा म्हटल्याने अंतर सूचित होतें. तें येथे नाही. 'प्रत्यक्षच मांग आहे, मूर्तिमत मांग आहे' असा भाव आहे.

सारांश, पान हा शब्द 'पांडुर' पासून लावण्याची यत्किंचित्‌हि आवश्यकता नसून त्याची सयुक्तिक आणि समंजस उपपत्ति तें उपमानपद कल्पिण्यांतच आहे, हें वरील सोदाहरण विवेचनावरून स्पष्ट आहे.

—कुन्दर दिवाण

## ग्रांथिक ओवीचें दुहेरी स्वरूप

ग्रांथिक ओवीचा व्याप फार मोठा आहे. ज्ञानेश्वरांपासून तों महीपतीपर्यंत यच्चयावत् कवींनी आपल्या ग्रंथांत तिचा अवलंब केला आहे. परंतु ती पद्यस्वरूप आहे, अथवा गद्यस्वरूप आहे, यासंबंधीं मात्र अद्यापि विचार झालेला नाही. बहुतेक ठिकाणीं अनियमित पद्य असाच उल्लेख आढळतो.

ज्याला पाद तें पद्य अशी पद्याची सरल व्याख्या आहे. तिच्या अनुरोधाने विचार केला, तर ग्रांथिक ओवीला साडेतीन पाद आहेत, तेव्हा ती विषमपद्य आहे, याविषयीं शंका राहत नाही. परंतु सध्या मराठींत जे वृत्त, जाति व छंद असे तीन पद्यप्रकार प्रचलित आहेत, त्यांपैकी एकांतहि ती बसत नसल्याने तिच्या खऱ्या स्वरूपासंबंधी संशय निर्माण होतो.

वृत्त, जाति व छंद यांची अनुक्रमें अक्षरगण, मात्रागण व नियत अक्षर संख्या यांवर उभारणी झाली आहे. ग्रांथिक ओवीला यांपैकी एकाचीहि बैठक नाही. तिचा अक्षरगणांशी व मात्रागणांशी नांवाचाहि संबंध नाही. मात्र अक्षर संख्येशी तो असावा, असा भास होतो. परंतु ती संख्या नियत नाही. ती सहासात अक्षरांपासून तों बावीसतेवीस अक्षरांपर्यंत अनियत आहे. तेव्हा ग्रंथिक ओवी अर्धवट पद्यस्वरूप आहे, हें उघड आहे.

इतर पद्यांना दोन किंवा चार पाद असतात. आठ अक्षरी गेय ओवीला क्वचित् तीन असतात. ग्रांथिक ओवीला साडेतीन पाद आहेत आणि ते सम किंवा अर्धसम नसून विषम आहेत, हा एक तिचा विशेष आहे. तिचा दुसरा विशेष हा की, तिच्या पहिल्या तीन पादांच्या अंतीं यमक असतें. एकनाथी ओवीच्या चौथ्या अर्धपादाच्या अर्धात एक यमक अधिक असतें. वस्तुतः हें अलंकारशास्त्रांतलें आहे. पद्यशास्त्राशी त्याचा अर्थाअर्थी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संबंध नाही. पण यमकाच्या साहाय्यावाचून ग्रांथिक ओवीचे पाद पडणार नाहीत. तेव्हा तें तिचें एक आवश्यक अंग बनलें आहे. पादांच्या अंतीं येत असल्यामुळे तें यतीचें व एका प्रकारें पूर्ण-विरामाचें कार्य करीत असतें.

ग्रांथिक ओवीच्या पादांतील अक्षरांची संख्या नियत नसल्यामुळे तिला गद्यस्वरूप आलें आहे. इतकेंच की, हें गद्य घावतें व समयक आहे आणि याची रचना कर्ता, कर्म, क्रियापद या क्रमाने झालेली नाही. तेव्हा ग्रांथिक ओवी ही अर्धवट गद्यस्वरूप आहे, हें स्पष्ट आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ग्रांथिक ओवी ही अनियमित पद्य व सयमक गद्य अशा दुहेरी स्वरूपाची आहे.

**--भवानीशंकर श्री. पंडित**

---

# साहित्यसमालोचन

**लांब लांब सावल्या**—( ले॰ य. बा. शास्त्री, प्र॰ नागपूर-प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर किंमत रु. २ )

या पुस्तकांत रा. य. बा. शास्त्री यांच्या दहा कथा आल्या आहेत. या कथा बऱ्याच शिथिल आहेत. कांही ठिकाणीं प्रकट केलेलीं भावदिद्रर्शता कृत्रिम वाटते. तथापि क्वचित् लेखकाचें कौशल्यहि दिसून येतें. उदाहरणार्थ, पान ३१ वरील शेवटच्या परिच्छेदांत आजोबा व आजी यांच्या निःशब्द शोकाचें जें वर्णन केलेलें आहे, तें अतिशय हृदयंगम आहे.

रा. शास्त्री यांनी प्रयत्न केल्यास ते सुंदर लघुकथा लिहूं शकतील, अशी अपेक्षा हा संग्रह उत्पन्न करतो, एवढें म्हणण्यास मात्र हरकत नाही.

---

# संपादकीय

**( लेखन ता. १४ नोव्हेंबर १९४६ )**

'युगवाणी'चा हा चालू वर्षाचा अखेरचा अंक. हा अंक वाचकांच्या हातीं देऊन मी संपादकत्वाच्या कामांतून निवृत्त होत आहें. विदर्भ-साहित्य-संघाच्या घटनेप्रमाणे निर्वेतन संपादक म्हणून माझी निवड फक्त एक वर्षापुरती झाली होती, हें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. या शेवटच्या अंकांत झालेल्या कार्याचा आढावा घेऊन वाचकांशी थोडेंसें हितगुज केल्यास तें अप्रासंगिक होणार, नाही.

## अडचणीच अडचणी

'युगवाणी'ला चालू वर्षी अडचणींशी सतत तोंड द्यावें लागलें ! तिचा प्रथमांक १९४५ मध्ये दिवाळीच्या सुमारास निघावयाचा होता. पण दिल्लीहून कागदाच्या वाट्या ( quota ) ची परवानगी मिळण्यास १९४६ चा जानेवारी महिना उजाडावा लागला ! पुढे मासिक सुरू होण्यास व छापखान्यांत संप वगैरे वारंवार उद्भवण्यास एकच गाठ पडली ! यामुळे अंक वेळच्या वेळीं व सौकर्याने निघणें दुष्कर झालें. जून-जुलै-आगष्टचा अंक 'मायाविवाह' नाटकामुळे तिजोड-अंक म्हणून काढावा लागला असला, तथापि अखेरचे दोन अंक केवळ छापखान्यांच्या अडचणीमुळेच जोड-अंक म्हणून काढावे लागले, हें नाकारतां येत नाही !

आणि, आर्थिक अडचण तर 'युगवाणी'च्या बारशालाच पुजलेली होती ! या अडचणीमुळे मासिक मध्येच बंद करावें लागतें की काय, अशीहि भीति वाटत होती ! परंतु विद्यमान संघाध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांची चिकाटी दांडगी आणि, कार्यकारी मंडळहि मासिक बंद करण्यास नाखूष. यामुळे मासिकाचें कार्य अखेर-



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पर्यंत रेटीत आणतां आलें !

## 'युगवाणी'चें वैशिष्टय

वरील संकटपरंपरेमुळे 'युगवाणी'चे अंक ठराविक तारखांना काढतां आले नसले व कांही जोड-अंकहि काढणें अपरिहार्य झालें असलें, तरी पण जे अंक निघाले, ते उच्च दर्ज्याचे निघाले, असाच सर्वांचा अभिप्राय पडला आहे, हें नमूद करण्यास मला समाधान वाटतें. मासिक आधीच नवीन होतें व तें लेखकांना मोबदला देऊं शकत नव्हतें. अशा स्थितींत लेखनसाहाय्य कसें काय मिळेल, याची मला प्रथम बरीच विवंचना वाटत होती. परंतु मी ज्या ज्या लेखकांस लेखनसाहाय्य मागत गेलों, त्या त्या बहुतेक लेखकांनी कसलीहि अडचण न दर्शवितां निरपेक्षपणें लेखनसाहाय्य केलें, हें नमूद करण्यास मला अत्यानंद वाटतो. या सर्व लेखकांचे मी कृतज्ञतापूर्वक जाहीर आभार मानतों; आणि, 'युगवाणी'ला एकाच वर्षांत वाङ्मयक्षेत्रांत जो दर्जा प्राप्त झाला, त्याचें सर्व श्रेय या लेखकांकडेच जातें, हें त्यांना कळविण्याची परवानगी घेतों.

'युगवाणी' मासिक विदर्भांतील असलें, तरी पण तें सर्व प्रकारच्या संकुचिततेपासून सर्वस्वी अलिप्त होतें. याचें एक गमक असें आहे की, 'युगवाणी'च्या लेखकवर्गांत इंदूर, बडोदें, मुंबई, पुणें, सांगली, हैद्राबाद, व बिलासपुर या दीर्घ परिघांतील लेखक येतात. तसेंच, त्यांत रिया-सतकार सरदेसाई यांच्यासारख्या वयोवृद्ध लेखकां-पासून तों तरुणबांड लेखकांपर्यंत साऱ्या प्रकारचे लेखक आले आहेत. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, सौ. शांताबाई माडखोलकर, सौ. ताराबाई शास्त्री-प्रभृति भगिनींनीहि मासिकाला हातभार लावलेला आहे, याचाहि येथे उल्लेख करावयास पाहिजे.

'युगवाणी'च्या लेखकवर्गांत ज्यांचा स्वतंत्र व खास निर्देश करावयास पाहिजे, असे लेखक म्हटले म्हणजे कविवर्य Bee हे होत. मध्यंतरीं गुप्त असलेली कविवर्यांची प्रतिभा 'युगवाणी'मुळे जागृत झाली, ही गोष्ट मराठी कवितेच्या इति-हासांत कायमची नमूद केली जाईल, याबद्दल मला मुळीच शंका नाही !

'युगवाणी'त कविता, साहित्यिकाचा परि-चय, प्रबंध व ललित गद्य हीं नेहमीचीं सदरें तर होतींच; पण त्यांच्या शिवाय 'ओझरतें दर्शन', 'गुप्त सरस्वती', 'संशोधकाचें पान', 'शंका : चर्चा : समाधान' इत्यादि नवीन सदरेंहि सवडी-प्रमाणे देण्यांत आलीं आहेत. यांपैकी 'गुप्त सरस्वती' (साहित्यिकांचीं पत्रें) हें सदर चांग-लेंच लोकप्रिय झालें. पूर्वोक्त नित्याच्या सदरांपैकी 'ललित गद्य' किंवा 'कथा' या सदरांत परभा-षांतील कांही उत्कृष्ट कृतींचे अनुवाद देण्यांत आले, तेहि रसिकांस फार आवडले. या अनुवा-दांत कथा, लघुतमकथा व एकांकिका हे तीन प्रकार येतात. ललित गद्यांतील कांही भाग स्वतं-त्रहि आहे. 'युगवाणी'तील कविताहि वरच्या प्रतीच्या असतात, असा पुष्कळांनी निर्वाळा दिला आहे.

## 'युगवाणी'चे विशेषांक

'युगवाणी'ने चालू वर्षी फेब्रुवारीचा Bee-विशेषांक' व सप्टेंबर-आक्टोबरचा 'दिवाळी-विशेषांक' असे दोन खास अंक काढले. जून-जुलै-ऑगस्टच्या तिजोड-अंकास 'विशेषांक' असें स्पष्ट म्हणण्यांत आलेलें नसलें, तरी पण त्या अंकास 'मायाविवाह-विशेषांक' म्हणण्यास कांहीच हरकत नाही. याप्रमाणे ज्या मासिकाने एका वर्षांत असे तीन विशेषांक काढले, त्याच्या अनियमित-पणासारख्या वैगुण्याबद्दल सहृदय वाचक खळबळ करणार नाहीत, अशी मला पूर्ण उमेद आहे.

अर्थात् 'युगवाणी'त सुधारणेला अवकाश नव्हता, असें मला ध्वनित करावयाचें नाही. तिच्यांत माझ्या कैक संकल्पित योजना येऊं शकल्या नाहीत, याची मला जाणीव आहे. माझें म्हणणें इतकेंच की, प्राप्त परिस्थितींत 'युगवाणी'-तून उत्तमोत्तम मजकूर देण्याचा मीं यावच्छक्य प्रयत्न केलेला आहे.

## नवीन लेखकांस प्रेमाची सूचना

युगवाणी सुरू झाल्यापासून नवीन लेखकांशी होणारा माझा पत्रव्यवहार पुष्कळच वाढला आहे. या पत्रव्यवहारावरून ठळक गोष्ट नजरेस येते,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती ही की, तरुण वर्गांत वाङ्मयप्रेम दिवसेंदिवस वाढत आहे. केवळ वाङ्मयदृष्ट्या पाहिल्यास ही वस्तुस्थिति स्वागतार्ह ठरेल. परंतु या तरुणांच्या हिताच्या दृष्टीने पाहिलें, तर या वस्तुस्थितीमुळे मनाला आनंद वाटण्याऐवजी दुःखच वाटतें ! वाङ्मयसेवा ही ऐहिक अभ्युदयास कारणीभूत होण्याजोगी परिस्थिति अद्यापि आपल्याकडे निर्माण झालेली नाही. उलटपक्षीं, वाङ्मय म्हणजे दारिद्र्य, उपेक्षा, अवहेलना असाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो ! चार-दोन साहित्यिक वगळ-ल्यास वाङ्मयसेवेमुळे कुणाचा अभ्युदय झाला, असें प्रत्ययास येत नाही ! मग तरुणांनी जाणून-बुजून भिंतीवर डोकें आपटण्यांत काय अर्थ आहे इतर क्षेत्रांत चमकण्याची ज्या तरुणांत धमक आहे, त्यांनी तर वाङ्मयक्षेत्रांत बिलकुल पाऊल टाकूं नये !

बरें वाङ्मयक्षेत्रांत तरी बूज कुणाची होते ! कै. गडकऱ्यांसारख्या अलौकिक प्रतिभावान साहित्यिकाची चहा, त्याची इतर बाजू लंगडी असतांहि होईल. पण हें भाग्य सर्वच साहित्यि-कांच्या वाट्यास कसें येणार ? म्हणून ज्या तरुणांना वाङ्मयक्षेत्रांत प्रवेश केल्यावाचून राहवतच नसेल त्यांनी निदान अन्य बाबतींत वरची पायरी तरी मिळवून ठेवावी ! उदाहरणार्थ, कॉलेजांत शिकणारे कित्येक तरुण अभ्यासाकडे दुर्लक्ष करून लेखन करूं पाहतात, हें सर्वस्वीं गैर आहे ! वाङ्मयसेवा करूं इच्छिणाऱ्याने पदवी संपादन केल्यावाचून सहसा राहूं नये. तसेंच, उच्च प्रतीचा व्यवसाय, किंवा उच्च प्रतीची नोकरी करून त्यांनी स्वतःस प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली पाहिजे. असें कोणतें तरी महत्त्व असल्याखेरीज वाङ्मयसेवेला मोल येणें कठीण असतें, हें तरुणांनी विसरतां कामा नये.

या उपर जे तरुण पैसा, कीर्ति वगैरेला कःपदार्थ समजत असतील, त्यांनी वाङ्मयक्षेत्रांत खुशाल उडी घ्यावी ! मात्र त्यांची ती वाङ्मयसेवा म्हणजे कसलेंहि फल न देणारी कठोर तपस्याच ठरणार आहे, याची जाणीव त्यांनी अहर्निश ठेवावयास पाहिजे ! एवढी ज्यांची तयारी असेल, त्यांना मी अधिक तें काय सांगणार ? आणि, ते तरी माझ्या सांगण्याला काय जुमानणार ?

## 'युगवाणी'चें भवितव्य

कोणतेंहि नवीन नियतकालिक आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभें राहण्यास किमान तीन वर्षांचा कालावधि तरी जावयास पाहिजे. 'युगवाणी'सारख्या वाङ्मयविषयास वाहिलेल्या मासिकाबाबत तर हा नियम विशेषच लागू पडतो. अर्थात् 'युगवाणी'ची आर्थिक स्थिति चालू वर्षी समाधानकारक नसल्यास त्यांत आश्चर्य वाटावयास नको ! या वर्षी 'युगवाणी' कर्जबाजारी झाली आहे, हें सर्वत्रांस विदित आहेच. खुद्द वि. सा. संघासहि अद्यापि आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावयाचें आहे. यामुळे संघावर 'युगवाणी'चा भार किती व कसा टाकावयाचा, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. संघाला तोशीस तर लागूं नये व 'युगवाणी' तर सुरू रहावी, असा प्रयत्न करण्यांत येत आहे. त्यांतून काय निष्पन्न होतें, हें लौकरच जाहीर करण्यांत येईल.

अर्थात् हा झाला भावी काळचा विचार आज 'युगवाणी'वर कर्जाचा जो बोजा आहे, तो तो नाहीसा करण्यासाठी 'युगवाणीनिधि' तातडीने उभारला पाहिजे. या दिशेने पुसदच्या येत्या अधि-वेशनांत कांही भरीव कार्य होईल, अशी अपेक्षा आहे.

आपल्या प्रांतांत धनिकांची उणीव नाही. पण त्यांच्या औदार्याचा ओघ 'युगवाणी'कडे कसा वळवावयाचा, हीच बिकट समस्या आहे ! अपेक्षित ठिकाणाहून मदत आली असती, तर 'युगवाणी'चें भवितव्य आज ठरूं पाहत आहे त्यापेक्षा निराळ्याच तऱ्हेने- म्हणजेच वि. सा. संघाला विशेष अनुकूल अशा रीतीने ठरलें असतें; आणि त्याची परिस्फुटता मला आजच्या या संपादकीयांतच मोठ्या उमेदीने करतां आली असती. पण तो योग यावा कसा ? 'युगवाणी' हें बोलून-चालून वाङ्मयविषयास वाहिलेलें व राजकारणापासून अलिप्त असें मासिक आहे. तें धनिकांना प्रतिसाहाय्य तें काय करूं शकणार ? म्हणून धनिकांवर फारसें विसंबून न राहतां सर्वसामान्य जनतेनेच 'फूल ना फुलाची पाकळी' देऊन 'युगवाणी'चा भार हलका करावयास पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## आभारप्रदर्शन

'युगवाणी'ला निर्हेतुक लेखनसाहाय्य करणाऱ्या लेखकांचे आभार मीं मानलेच आहेत. याशिवाय विद्यमान संघाध्यक्ष माझे मित्र प्रा. श्री. ना. बनहट्टी व सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांचेहि आभार मानणें अवश्य आहे. प्रा. दिवाणजी हे तर 'युगवाणी'चे प्रकाशकच आहेत. या उभयतांनी माझ्या संपादनकार्यांत चिल्कूल ढवळाढवळ तर करावयाची नाही, पण मीं मागितलेली मदत तर बिनबोभाट करावयाची, असें सुवर्णमध्य साधणारें अभिनंदनीय धोरण ठेवलें होतें. यामुळे माझें कार्य अतिशय सुकर झालें. या दोघांना मजकडून जो काय 'उपद्रव' झाला असेल, त्याबद्दल त्यांची मीं खाजगी रीत्या क्षमा मागितलीच आहे. आता तीच क्षमा जाहीर रीतीने मागून मी त्यांना दिलेल्या 'उपद्रवा'चें परिमार्जन करीत आहे ! वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व 'युगवाणी'चे मुद्रक उमरावतीच्या 'सरस्वती' छापखान्याचे रा. पाटील यांचेहि आभार मानावयास हवेत. झालें, मला सांगावयाचें तें सांगून झालें. 'युगवाणी'च्या कामामुळे गेलें एक-दीड वर्ष मला जशी दगदग झाली, तसाच आनंदहि झाला. अनेकांच्या नव्या ओळखी झाल्या. कित्येक जुन्या ओळखी दृढतर झाल्या. माझी ही नम्र सेवा सर्वांनी गोड मानून घ्यावी व उण्या-अधिकाची क्षमा करावी अशी विनंती करून 'युगवाणी'चे लेखक, वाचक आणि माझे उपरोक्त सहकारी यांची मी हस्तांदोलनपूर्वक रजा घेतों.

श्री. भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
36390
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०.२.९४
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ
श्री. भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ